सोलापूर

# तरुण भारत


न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शुक्रवार, ५ जून २०२६ । वर्ष ४ थे अंक ८८ । पाने १२ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



बलाची उपासना करा, शक्तिसंपन्न व्हा असे अतिप्राचीन काळापासून आमच्या पूर्वजांनी सांगितलेले आहे. या जगात समाजाचे परस्परसंबंध भक्ष्य-भक्षक या स्वरूपात असतात. मित्रता व शत्रुता कालमानानुसार चालते किंवा बदलत राहते. म्हणून कोण कोणत्या वेळी भक्षक म्हणून उभा राहील हे सांगणे कठीण आहे. म्हणून आपली नित्य बलसंपन्न स्थिती असली पाहिजे.

**- स्व. श्रीगुरुजी**
रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक

# ‘महायुती’चे राजेंद्र राऊत, ‘महाविकास’चे वसंतराव देशमुख यांच्यात होणार लढत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सोलापूर विधान परिषद मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी एकूण ७ जणांचे उमेदवारी अर्ज वैध ठरले होते. उमेदवारी अर्ज माघार घेण्याच्या शेवटच्या दिवशी (गुरुवार, दि.४ जून २०२६ रोजी) यापैकी तब्बल ५ जणांनी माघार घेतली. त्यामुळे आता ‘महायुती’चे राजेंद्र राऊत आणि ‘महाविकास आघाडी’चे वसंतराव देशमुख यांच्यात दुरंगी लढत होणार असल्याचे स्पष्ट झाले.

महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघाच्या १७ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरु आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या. अर्ज माघारीच्या दिवशी पाच जागा बिनविरोध झाल्या, यात दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी काँग्रेस आणि एका जागेवर भारतीय जनता पार्टीने बिनविरोध विजय मिळवला.




‘महाविकास आघाडी’ने ‘महायुती’च्या उमेदवारांसमोर आव्हान उभे करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मित्रपक्षाकडून सहकार्य मिळत नसल्याचे सांगत ‘महाविकास आघाडी’च्या काही उमेदवारांनी निवडणुकीच्या रिंगणातून काढता पाय घेतला. तर इकडे ‘महायुती’च्या नेत्यांना बंडखोरांना शांत करण्यात यश आले. उर्वरित जागांसाठी दि.१८ जून २०२६ रोजी मतदान तर दि.२२ जून २०२६ रोजी मतम ोजणी होणार आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी ज्या-त्या भागातील उम ेदवारांच्या जवळच्या नेत्यांशी थेट संपर्क ठेवत सोलापूरची जागा बिनविरोध करण्याकामी आटोकाट प्रयत्न केले. परंतु त्यांच्या प्रयत्नांना पुर्णतः यश आले नाही.

या निवडणुकीतून आमदार उत्तम जानकर यांचे पुत्र जीवन जानकर, नागेश अक्कलकोटे, धनंजय डिकोळे, महेश साठे, रमेश बारसकर या ५ अपक्षांनी माघार घेतली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांमधून ही निवडणूक होत असल्याने जिल्ह्यातील राजकीय सम ीकरणांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ‘महायुती’चे संख्याबळ लक्षात घेता राजेंद्र राऊत यांचा विजय निश्चित मानला जात आहे. परंतु ऐनवेळच्या राजकीय घडामोडींचा विचार करता ते किती मताधिक्क्याने विजय संपादन करतील? याविषयी तर्कवितर्क लढविले जात आहेत.

### पक्षीय ताकद, गटबाजी, स्थानिक राजकारण

जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींतील निवडून आलेले सदस्य मतदान करणार आहेत. त्यामुळे पक्षीय ताकद, गटबाजी आणि स्थानिक राजकीय समीकरणांचा निकालावर मोठा प्रभाव पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही उमेदवारांनी मतदारांशी संपर्क वाढवण्यास सुरुवात केली आहे.

### काही लोकांशी मला बोलू वाटलं नाही

विधानपरिषदेची ही निवडणूक कशी लागली आणि कोणी लावली? याविषयी बोलणे आता उचित नाही. ज्या उमेदवारांना बोलणं अपेक्षित होतं त्यांच्याशी बोलणं झालं. पण, काही लोकांशी मला बोलू वाटलं नाही. ज्या उमेदवारांनी अर्ज मागे घेतला आहे ते उमेदवार भाजपाचा उमेदवार जिंकण्यासाठी मदत करणार आहेत, असा दावा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केला.

# महायुतीची घोडदौड; पाच जागा बिनविरोध

### विधान परिषद निवडणूक

- १२ जागांवर रणधुमाळी
- उबाठाला स्वतःच्याच उमेदवारांनी दिला दगा
- पुण्यात राकाँ उमेदवाराच्या माघारीने काँग्रेस संतप्त



अरुण लखानी | विक्रम काकडे | रवींद्र फाटक | अनिकेत तटकरे | दुष्यंत चतुर्वेदी



**बिनविरोध विजयी उमेदवार**

● **अरुण लखानी** (भाजपा) : वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर ● **विक्रम काकडे** (राष्ट्रवादी काँग्रेस) : पुणे ● **रवींद्र फाटक** (शिवसेना) : ठाणे ● **अनिकेत तटकरे** (राष्ट्रवादी काँग्रेस) : रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग ● **दुष्यंत चतुर्वेदी** (शिवसेना) : यवतमाळ ■

◆ **मुंबई, ४ जून**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधानपरिषद निवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी राजकीय भूकंप झाला असून निवडणुकीचा माहोल पूर्णपणे पालटला आहे. महायुती सरकारने चाणाक्ष खेळी करीत १७ पैकी ५ जागांवर बिनविरोध विजय मिळवून मविआला मोठा धक्का दिला. या नाट्यमय घडामोडींमुळे आता उर्वरित १२ जागांवर प्रतिष्ठेची लढत होणार आहे. निवडणूक रिंगणातून प्रतिस्पर्धी उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतल्याने महाविकास आघाडीची गोची झाली आहे.

बिनविरोध विजयी झालेल्या महायुतीच्या पाच विजयी उमेदवारांमध्ये भाजपाचा एक तर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रत्येकी दोन उमेदवारांचा समावेश आहे. आता बिनविरोध झालेल्या ५ जागा वगळता, उर्वरित १२ जागांसाठी येत्या १८ जून २०२६ रोजी मतदान पार पडणार असून, २२ जून २०२८ रोजी मतमोजणी होऊन अंतिम निकाल लागणार आहे.

**कोकणात ‘तटकरे’ किंग; मविआची दमछाक**

कोकणच्या राजकारणात खळबळ उडवत शिवसेनेच्या (उबाठा) बाळ माने यांनी अर्ज मागे घेतला. भाजपा नेते नितेश राणे यांच्या उपस्थितीत माने यांनी माघार घेतल्याने अनिकेत तटकरे यांचा विजयाचा मार्ग मोकळा झाला. या धक्कादायक निर्णयामुळे मविआच्या गोटात खळबळ उडाली असून उद्धव ठाकरे यांनी माने यांना पक्षातून काढून टाकले आहे. विशेष म्हणजे बाळ माने मूळचे भाजपाचेच असून गेल्या विधानसभा निवडणुकीच्या काळात तिकीट न मिळाल्याने ते उबाठात आले होते. ◂*(तभा वृत्तसेवा)*

### ‘आयआरसीटीसी’ किचनवर ‘एआय’ची नजर

(वृत्त पान ३ वर...)

## आता लक्ष १२ जागांकडे

**आता सर्व लक्ष सोलापूर, अहिल्यानगर, जळगाव आणि नागपूरसह उर्वरित १२ जागांवर लागले आहे. नाशिकमध्ये बंडाळी कायम असल्याने तिथे चुरस पाहायला मिळणार आहे.**

- **नागपूर** : डॉ. राजीव पोतदार (भाजपा) वि. अतुल लोंढे (काँग्रेस)
- **सोलापूर** : राजेंद्र राऊत (भाजपा) वि. वसंतराव देशमुख (शरद पवार गट)
- **अहिल्यानगर** : प्राजक्त तनपुरे (भाजपा) वि. दत्तात्रेय पानसरे (अपक्ष)
- **सांगली-सातारा** : धैर्यशील कदम (भाजपा) वि. अभयसिंह जगताप (शरद पवार गट)
- **नांदेड** : अमर राजूरकर (भाजपा) वि. रामदास पाटील (काँग्रेस)
- **छत्रपती संभाजीनगर** : सुहास शिरसाट (भाजपा) वि. गणेश लोखंडे (शिवसेना-उबाठा)
- **नाशिक** : नरेंद्र दराडे (भाजपा) वि. गोकुळ गीते (अपक्ष)
- **गोंदिया-भंडारा** : अविनाश ब्राह्मणकर (भाजपा) वि. नरेश ईश्वरकर (अपक्ष)
- **अमरावती** : प्रवीण पोटे (भाजपा) वि. हर्षजित देशमुख (काँग्रेस) व नीलेश विश्वकर्मा (वंचित)
- **परभणी-हिंगोली** : सईद खान (शिवसेना) वि. डॉ. विवेक नावंदर (शिवसेना-उबाठा)
- **जळगाव** : नंदकिशोर महाजन (भाजपा) वि. शरद तायडे (शिवसेना-उबाठा)
- **धाराशिव-लातूर-बीड** : बसवराज पाटील (भाजपा) वि. महेश देशमुख (काँग्रेस) ■

# भारताला मिळाली एस-४०० ची दुसरी खेप

**नवी दिल्ली :** भारताला रशियाकडून एस-४०० हवाई संरक्षण प्रणालीची चौथी खेप गुरुवारी मिळाली. ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानकडून होणारे हल्ले रोखण्यात या प्रणालीची महत्त्वाची भूमिका होती. रशियाकडून मिळालेल्या संरक्षण प्रणालीला चीन आणि पाकिस्तानच्या सीमेवर तैनात करण्यात येणार आहे.

यामुळे हवाई हल्ले परतवून लावण्याची भारताची क्षमता अधिक सक्षम होणार आहे. भारताने २०१८ मध्ये रशियाकडून सुमारे ४०,००० कोटी रुपयांना पाच एस- ४०० तुकड्या खरेदी करण्याचा करार केला होता. यापैकी तीन तुकड्या सुमारे दोन वर्षांपूर्वी भारतात दाखल झाल्य. रशिया-युक्रेन युद्धामुळे उर्वरित दोन तुकड्यांच्या वितरणास विलंब झाला होता. आता रशियाने चौथी तुकडी भारताला सुपूर्द केली आहे, तर पाचवी तुकडी पुढील काही महिन्यांत भारतात दाखल होण्याची शक्यता आहे. चौथ्या स्क्वाड्रनच्या आगमनामुळे पूर्व लडाखपासून पाकिस्तानच्या सीमेपर्यंत हवाई सुरक्षा अधिक मजबूत होईल. ही घातक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली लवकरच संवेदनशील भागात तैनात केली जाईल अशी माहिती संरक्षण विभागाने एक्सवरील पोस्टमधून दिली.

# पद्मभूषण डॉ. सुभाष कश्यप यांचे निधन



**नवी दिल्ली :** पद्मभूषण डॉ. सुभाष सी. कश्यप यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ९७ वर्षांचे होते. ते एक प्रख्यात घटनातज्ज्ञ, राजकीय अभ्यासक आणि संसदीय कामकाजाचे तज्ज्ञ होते. त्यांचा जन्म १० मे १९२९ रोजी झाला. त्यांनी १९८४ ते १९९० या काळात ७व्या, ८व्या आणि ९व्या लोकसभेचे महासचिव म्हणून काम पाहिले. १९५३ मध्ये संसद सचिवालयात आपल्या कारकीर्दीला सुरुवात केली आणि ते जवळपास ३७ वर्षे संसदेशी संबंधित राहिले. ते भारतीय संविधान, संसदीय कार्यपद्धती आणि घटनात्मक कायद्याचे एक अग्रगण्य तज्ज्ञ मानले जात होते.






# जगाला नवा मार्ग फक्त भारतच देऊ शकतो

### सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन

### कार्यकर्ता विकास वर्ग-द्वितीयचा समारोप




### नव्या जगाच्या उभारणीचा पाया बंधुभावाचा

दोन-तीन दशकात भारत विश्वगुरू होईलही. भारताला अशा प्रकारे उभे राहायचे आहे की, संपूर्ण जगाने त्याकडे पाहून म्हणावे की, ज्या पायावर त्यांनी आपला देश उभारला आहे, त्याच पायावर आम्ही आमच्या निसर्गाच्या आधारावर आमचा देश उभारला आहे. नव्या जगाच्या उभारणीचा पाया बंधुभावाचा, एका कुटुंबाचा व सर्वां ध्ये एकत्व पाहण्याच्या दृष्टिकोनाचा आहे, हे डॉ. मोहनजी भागवत यांनी अधोरेखित केले.

**नागपूर, ४ जून**

जगाला एका नव्या मार्गाची गरज आहे, तो फक्त भारतच देऊ शकेल, असे प्रतिपादन रा.स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी आज येथे केले. यासाठी भारताची वेळ आली आहे. पण, वेळ आपोआप येत नाही, त्यासाठी तयार राहावे लागेल, याकडेही त्यांनी त्यांच्या उद्बोधनातून लक्ष वेधले. रा.स्व. संघाच्या कार्यकर्ता विकास वर्ग-द्वितीयचा सम ारोप रेशीमबाग मैदानावर आज झाला.

प्रसिद्ध उद्योगपती कुमार मंगलम बिर्ला, वर्गाचे सर्वाधिकारी सरदार महेंद्रसिंग मग्गो, विदर्भ प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार, नागपूर महानगर संघचालक राजेश लोया व्यासपीठावर उपस्थित होते. आपल्या उद्बोधनात डॉ. मोहनजी भागवत म्हणाले की, हिंदू जागृतीचा परिणाम समोर आला आहे. ज्या हिंदू समाजाच्या खांद्यावर भारताची जबाबदारी आहे, तो आपली जबाबदारी उचलण्याच्या इच्छेने सतर्क होत आहे, जागृत होत आहे व त्याचे परिणाम अनेक दिशांनी स्पष्ट होत आहेत. भारताला पुढे जाण्यासाठी आपल्या सर्वांकडे अनुकूल परिस्थिती आहे.

इराण-अमेरिका युद्ध व एकंदरितच परिस्थितीचा उल्लेख करून डॉ. मोहनजी पुढे म्हणाले की, या जगाला भारताची गरज आहे, कारण या सर्वांना जोडणारा घटक दुसऱ्या जगाकडे नाही. गरजा योग्यप्रकारे पूर्ण व्हायला हव्यात, हे एकत्र कसे घडू शकते, हे जगाला माहीत नाही. माहिती पुस्तकांमध्ये आहे. जग ते वाचते. प्रत्यक्षात आणायचे असते, तेव्हा सवयीचा प्रश्न निर्माण होतो. एके काळी भारत विश्वगुरू होता. केवळ आध्यात्मिक गुरूच नाही, तर आर्थिक दृष्ट्याही भारत जगातला पहिला देश होता. आम्ही ज्ञान आणि विज्ञानातही सर्वोच्च होतो. येथूनच संस्कृती, सभ्यता आली. अध्यात्मासोबतच शिक्षण, भौतिकशास्त्र, सर्व ज्ञान, आयुर्वेद, गणित, हे सर्व येथूनच आले आहे. पण आम्ही हजार वर्षे गुलामगिरीत होतो. ज्यांनी आम्हाला गुलाम बनवले तेही आमच्यापेक्षा श्रेष्ठ नव्हते. त्यांची संख्या फार नव्हती. ते दूरवरून आले व त्यांनी आमच्यावर विजय मिळवला. आम्ही स्वतःचे रक्षण केले नाही. आम्ही विसरलो, आम्ही आमची तयारी गमावली. हिंदू समाजाने आपल्या भाषा, रंग, पंथ, जाती व श्रद्धा यांची सर्व विविधता जपून एका धाग्यात एकत्र यावे. त्यांनी एक व्हावे व त्यांच्या जीवनात अशी भावना असावी की हा देश माझा आहे, हा समाज माझा आहे, हा धर्म, ही संस्कृती माझी आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अमृतकाळ भारतीय युवांसाठी सुवर्णसंधी

## कुमार मंगलम बिर्ला यांचे प्रतिपादन ● राष्ट्रनिर्माणासाठी युवा शक्तीने पुढे यावे

## रा. स्व. संघाच्या कार्यकर्ता विकास वर्ग-द्वितीय समारोप कार्यक्रमात मार्गदर्शन

◆ **नागपूर, ४ जून**

भारत सध्याच्या 'अमृतकाळा'त विकसित राष्ट्राकडे वाटचाल करीत आहे. हा काळ भारतीय युवांसाठी अभूतपूर्व संधी घेऊन आला आहे. या सुवर्णसंधीचा लाभ घेत देशाच्या सर्वांगीण विकासात मोलाचे योगदान देण्याचे आवाहन प्रसिद्ध उद्योगपती व पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित कुमार मंगलम बिर्ला यांनी युवकांना केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्ता विकास वर्ग-द्वितीयच्या समारोप सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. रेशीमबाग मैदानावर आयोजित या वर्गात देशभरातील सुमारे ८८० स्वयंसेवक सहभागी झाले होते.

युवकांना संबोधित करताना बिर्ला म्हणाले, गेली दोन दशके भारताच्या आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहेत. तंत्रज्ञान, उद्योग आणि नवकल्पनांच्या क्षेत्रात झालेल्या वेगवान प्रगतीमुळे भारत आत्मनिर्भरतेच्या दिशेने दमदार पावले टाकत आहे. आजच्या पिढीसमोर उभ्या असलेल्या संधी पूर्वी कधीच उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे युवा शक्तीने या काळाचे महत्त्व ओळखून राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा.




विचार व्यक्त करताना कुमार मंगलम बिर्ला. व्यासपीठावर सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत व मान्यवर

### सर्व काही भारतासाठीच करा

आत्मनिर्भर भारत ही केवळ संकल्पना नसून, देशाची मोठी ताकद असल्याचे सांगताना बिर्ला म्हणाले, युवकांनी संशोधन, नवोन्मेष किंवा उत्पादन करताना भारतासच विचार करावा. भारतात राहून भारतासाठी आणि भारतातूनच जगासाठी काम करण्याची वृत्ती जोपासली, तर देशाच्या आर्थिक प्रगतीला नवे बळ मिळेल.

यावेळी त्यांनी संघाच्या कार्याचीही प्रशंसा केली. 'सरसंघचालकांची प्रत्येक भेट मला नवी ऊर्जा देऊन जाते. राष्ट्र हितासाठीचे त्यांचे समर्पण प्रत्येक भारतीयाला प्रेरणा देणारे आहे, असे ते म्हणाले.

भारताच्या विकासाचा उल्लेख करताना बिर्ला यांनी सांगितले की, कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीत उद्योगांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मात्र औद्योगिक विकासाच्या वाटचालीत भारतीय संस्कार आणि मूल्ये विसरून चालणार नाहीत. गेल्या शतकभरापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ समाजात याच मूल्यांची जपणूक आणि रुजवण करीत आहे. भारतीय संस्कृतीच्या भक्कम पायावर उभा राहून देश आधुनिकतेकडे झेपावत असल्याचे त्यांनी नमूद केले. (तभा वृत्तसेवा)

### दशकभरात शतकभराची झेप

गेल्या दहा वर्षांत भारताने अनेक क्षेत्रांत शतकभराची प्रगती साधल्याचे सांगताना त्यांनी नमूद केले की, आज संपूर्ण जग भारताकडे आशेने आणि विश्वासाने पाहत आहे. विविध आंतरराष्ट्रीय तज्ज्ञही भारताच्या विकासगाथेची दखल घेत असून येत्या काळात विकसित भारत जगासमोर आदर्श निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# इराणविरुद्ध अमेरिकेचे युद्ध संपले

## मार्को रुबियो यांची माहिती ● होर्मुझ अमेरिकन नौदलाच्या नियंत्रणात

◆ **वॉशिंग्टन, ४ जून**

इराणविरुद्धचे अमेरिका-इस्रायलचे 'ऑपरेशन एपिक फ्युरी' मोहीम संपुष्टात आली आहे.अमेरिकेची सर्व लष्करी उद्दिष्ट्ये साध्य झाल्यामुळे इराणविरोधातील युद्ध संपल्याची घोषणा परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी गुरुवारी काँग्रेसमध्ये केली.

होर्मुझ जलमार्गावर अमेरिकन नौदलाचे नियंत्रण असून शांतता करार होईपर्यंत या मार्गावर नाकाबंदी कायम राहणार आहे. इराणच्या संरक्षण औद्योगिक पायाभूत सुविधा नष्ट झाल्या आहेत. त्यांच्या क्षेपणास्त्र प्रक्षेपक आणि ड्रोन साठ्यांचे नुकसान झाले. वायुदलासह पारंपरिक नौदलही पूर्णपणे उद्ध्वस्त झाल्याचे रुबियो यांनी सांगितले. इराणसोबत सुरू असलेल्या चर्चेबद्दल माहिती माहिती देताना ते म्हणाले, चर्चेचा केंद्रबिंदू इराणचा समृद्ध युरेनियमचा नष्ट करणे अथला हटवणे आहे. यावर अद्याप सहमती झालेली नाही. इराणने शस्त्रास्त्र-दर्जाचे युरेनियम अमेरिकेकडे सोपवावे, अणुकार्यक्रम थांबविण्याची हमी द्यावी आणिहोर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडावी या अटी करारासाठी ठेवण्यात आल्या.

अमेरिकेच्या अटींवर इराणकडून अद्याप अंतिम मंजुरी देण्यात आलेली नाही. यावर डेमोक्रॅटिकचे खासदार सारा जेकब्स यांनी म्हटले की, अमेरिकेची मोहीम यशस्वी होऊनही होर्मुझची सामुद्रधुनी अजूनही बंद आहे आणि आपले सैन्य अजूनही धोक्यात आहे.



### अमेरिकेने गुडघे टेकले : इस्माईल बघाई



रुबियो यांनी युद्ध समाप्तीची घोषणा केल्यावर इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बघाई यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, इराणची लष्करी आणि शस्त्र क्षमता अजूनही बळकट आहे. अमेरिकेने युद्धात सपशेल गुडघे टेकले. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि त्यांचे मंत्री अमेरिकेची दिशाभूल करत आहे. होर्मुझ जलमार्गावर अजूनही इराणचे नियंत्रण असून या संघर्षात अमेरिकेने माघार घेतली आहे.

### युद्धावर १०० अब्ज डॉलर्सची उधळपट्टी

डेमोक्रॅटिक नेते हकीम जेफरीज म्हणाले, इराणविरुद्धचे खर्चिक आणि धोकादायक युद्ध संपलेच पाहिजे. या संघर्षावर १०० अब्ज डॉलर्सची उधळपट्टी करण्यात आली आणि हा पैसा अमेरिकन करदात्यांचा आहे.

**लष्करी कारवाई थांबविण्याचा ठराव मंजूर**

अमेरिकेच्या प्रतिनिधी सभागृहाने (हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्हज) इराणविरुद्धची लष्करी कारवाई मर्यादित करणारा ठराव २१५-२०८ मतांनी मंजूर केला. काही रिपब्लिकन सदस्यांनीही डेमोक्रॅट्सना पाठिंबा दिला.राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यासाठी हा एक मोठा धक्का आहे. आता या ठरावावर सिनेटमध्ये चर्चा होईल. ठराव मंजूर होताच प्रतिनिधी सभागृहातील खासदारांनी जल्लोष केला. (वृत्तसंस्था)


## महत्त्वाचे

### नई जिंदगी परिसरात आढळले पुरुष जातीचे जिवंत अर्भक

**सोलापूर, दि. ४ जून-**

नई जिंदगी परिसरातील चीस्तीनगर भागात सुनसान जागेत पुरुष जातीचे नवजात अर्भक बुधवारी सायंकाळी आढळून आले. लक्ष्मीनगर परिसरातील चीस्तीनगर भागातील एका वीटभट्टीजवळ लहान मुले खेळत होती. खेळता-खेळता त्यांचे लक्ष मुलाच्या रडण्याकडे गेले. तेव्हा तिथल्या एका सुनसान जागेत पडलेल्या पिशवीत म ुलांना एक नवजात बाळ असल्याचे दिसले. तिथून जाणाऱ्या नागरिकांनी पडताळणी करुन तातडीने एमआयडीसी पोलिसांशी संपर्क साधला.एमआयडीसी पोलिस ठाण्याचे अंमलदार इरफान पिरजादे आणि रमेश रोमन घटनास्थळी दाखल झाले. त्यापूर्वीच स्थानिक महिलांनी बाळाला कपड्यात गुंडाळून आपल्या कडेवर घेतले होते. बाळाचे निरागस रूप पाहून महिलांनी बाळ आम्ही सांभाळतो, म्हणत त्याला दत्तक घेण्याची तयारी दर्शवली. पण कायदेशीर प्रक्रिया आणि बाळाची वैद्यकीय तपासणी आवश्यक असल्याने पोलिसांनी त्यांची समजूत काढली. पोलिस अंमलदार इरफान पिरजादे आणि रमेश रोमन यांनी त्या बालकाला तात्काळ ताब्यात घेऊन पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. सध्या बाळावर 'एनआयसीयु'मध्ये उपचार सुरू असून बाळाची प्रकृती स्थिर आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्यात यापप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

### काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचे निधन



**पुणे** : राज्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचे गुरुवारी निधन झाले. पुण्यातील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. उपचारादरम्यान, अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने राजकीय सामाजिक क्षेत्रातून हळहळ व्यक्त केली जात आहे. अनंतराव थोपटे पुण्यातील भोर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार होते. तसेच त्यांनी भोर विधानसभा मतदारसंघाचे अनेक वर्षे नेतृत्व केले होते. ते अनेक वर्षे राज्य मंत्री मंडळात कॅबिनेट मंत्री होते. तसेच ते पुण्याचे पालकमंत्रीही होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर थोपटे काँग्रेसचे विधीमंडळातील गटनेते होते. माजी आमदार आणि भाजपाचे नेते संग्राम थोपटे यांचे ते वडिल होते.

# आग प्रकरणात हॉटेल मालकाला पोलिस कोठडी

## घटनास्थळावरून पलायन; कोणालाही वाचवले नाही

◆ **नवी दिल्ली, ४ जून**

दिल्लीतील मालवीय नगर येथील फ्लोरीश हॉटेलला लागलेल्या आगप्रकरणी मालक लवेकेश बजाज याला पोलिसांनी अटक केली, न्यायालयाने त्याला ४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. आग लागताच बजाज आपल्या गाडीतून जळत्या इमारतीजवळून पळून गेल्याचे चौकशीत समोर आले.

भीषण आगीत पाच मजली इमारत जळून खाक झाली, ज्यात २१ जणांचा मृत्यू झाला. घटनेनंतर काही तासांतच पोलिसांनी बजाज याला अटक केली होती. बजाज याने चौकशीत सांगितले की, तो स्वतः हॉटेलची देखरेख करत नव्हता. इमारतीच्या एका मजल्यावर एक पूर्ण रेस्टॉरंट आणि तळघरात एक व्यावसायिक स्वयंपाकघर चालवत होते, परंतु त्यांच्याकडे वैध परवाना नव्हता. तिथे रेस्टॉरंट सुरू असल्याची महानगरपालिकेला कल्पना नव्हती. बजाजने चतुराईने एमसीडीकडे तळमजल्यावर चहाचे दुकान चालवण्यासाठी परवान्याकरिता अर्ज केला होता. नियमांनुसार, या प्रकारच्या परवान्यासाठी जागेवर प्रत्यक्ष पडताळणीची आवश्यकता नसते. याचा फायदा घेऊन, त्याने चहाच्या दुकानाच्या नावाखाली, कोणतीही परवानगी न घेता एक पूर्ण रेस्टॉरंट आणि मोठ्या एलपीजी सिलिंडर असलेले स्वयंपाकघर उभारल्याचे तपासात समोर आले. (वृत्तसंस्था)



### मृतांच्या कुटुंबियांनी १० लाखांची मदत

दिल्ली सरकारने मृतांच्या कुटुंबि यांना प्रत्येकी १० लाख रुपये आणि जखमींना ५ लाख रुपयांची नुकसान भरपाई जाहीर केली आहे. पोलिसांनी या प्रकरणाच्या तपासासाठी १० पथके तयार केली आहेत. यापैकी पाच पथके फरार हॉटेल व्यवस्थापक जय मिश्रा यांचा शोध घेत आहेत. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी गुरुवारी रुग्णालयात जावून जखमींच्या प्रकृतीची विचारपूस केली.

# प्रतीक्षा संपली... मान्सून केरळमध्ये दाखल

## दोन ते तीन दिवसांत महाराष्ट्रात बरसणार ● भारतीय हवामान विभागाची घोषणा



◆ **मुंबई, ४ जून**

मान्सून केरळमध्ये दाखल झाल्याचा दावा भारतीय हवामान विभागाने केला आहे. परिणामी, पुढील सात दिवसांत केरळ तसेच तामिळनाडू आणि कर्नाटकच्या काही भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.

पुढील ४८ तासांत कोकण आणि दक्षिण महाराष्ट्रात पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून विदर्भातील मान्सूनसाठी १५ जूनपर्यंत प्रतीक्षा करावी लागू शकते, असे सांगितले. पुढील दोन ते तीन दिवसांत मोसमी वारे महाराष्ट्रातील काही भाग व्यापू शकतात, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने दिली.

मान्सूनच्या आगमनासाठी गोवा, महाराष्ट्राचा काही भाग, सोबतच तामिळनाडू, कर्नाटक, बंगालचा उपसागराचा काही भाग आणि ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये अनुकूल परिस्थिती आहे. हवामान विभागाने ओडिशा, राजस्थान, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, दिल्ली आणि तेलंगणा यांसह २४ राज्यांमध्ये पाऊस, मेघगर्जना आणि सोसाट्याच्या वाऱ्यांचा अंदाज वर्तविला आहे.

राजस्थान, हिमाचल आणि उत्तराखंडमध्ये मुसळधार पाऊस, गारपीट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसाठी सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दिल्लीतही दोन दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे.

**यंदा झाला तीन दिवस उशीर**

मान्सून केरळात १ जून रोजी दाखल होत असतो; मात्र यंदा तो ३ जून रोजी दाखल झाला. यंदा मान्सून तीन दिवस उशिरा आला. साधारणपणे तो दीड महिन्यात संपूर्ण देश व्यापून १ जून रोजी केरळमध्ये पोहोचतो. हवामान खात्याने यापूर्वी मान्सून २६ मे रोजी केरळमध्ये पोहोचेल, असा अंदाज वर्तविला होता. (वृत्तसंस्था)

# नौदलाची ताकद वाढविणार 'स्वदेशी युद्धनौका'

## सामील होणार चार युद्धनौका, एक सर्वेक्षण जहाज



◆ **नवी दिल्ली, ४ जून**

भारतीय नौदल या महिन्यात आपल्या ताफ्यात पाच स्वदेशी बनावटीची जहाजे सामील करण्याच्या तयारीत आहे. यामध्ये दोन प्रोजेक्ट १७ए स्टेल्थ फ्रिगेट्स, एक सर्वेक्षण जहाज आणि दोन पाणबुडी युद्धनौकांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे जहाजे 'मेड इन इंडिया' आहेत. ही जहाजे सागरी सुरक्षा, युद्धसज्जता आणि किनारी संरक्षण लक्षणीयरीत्या मजबूत करतील. या समावेशांमधून भारताची अत्याधुनिक नौदल स्वदेशी बनावटीची आणि उभारणी करण्याची वाढती क्षमता दिसून येते. यामुळे विदेशी पुरवठादारांवरील अवलंबित्व कमी होते. नौदलात सामील होणाऱ्या पाचपैकी चार जहाजे गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनीअर्स आणि कोचीन शिपयार्ड लिमिटेड यांनी बांधली आहेत. पाचवे जहाज, आयएनएस महेंद्रगिरी, माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडने बांधले आहे. एकदा औपचारिकपणे सेवेत दाखल झाल्यावर, स्टेल्थ फ्रिगेट्स आयएनएस 'दुनागिरी', आयएनएस 'महेंद्रगिरी', सर्वेक्षण जहाज 'संशुधिकर' आणि पाणबुडी युद्धनौका 'अग्रया' व 'मालवण' या उथळ पाण्यातील नौका नौदलाला वर्धित स्टेल्थ, उत्तम पाणबुडीविरोधी युद्धक्षमता आणि प्रगत सागरी निगराणी प्रदान करतील.

आयएनएस 'दुनागिरी' ही जीआरएसईने बांधलेली प्रोजेक्ट १७ए स्टील्थ फ्रिगेट आहे. ही युद्धनौका आधुनिक सेन्सर्स, अत्याधुनिक शस्त्रप्रणाली आणि नेटवर्क-केंद्रित युद्धक्षमतांनी सुसज्ज आहे. आयएनएस महेंद्रगिरी ही या वर्गातील दुसरी प्रोजेक्ट १७ए स्टील्थ फ्रिगेट आहे. या दोन्ही नौका सुपरसॉनिक ब्रह्मोस क्रूझ क्षेपणास्त्र, बराक-८ जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्र प्रणाली, धोक्याचा लवकर शोध घेण्यासाठी आणि त्याचा मागोवा घेण्यासाठी शक्तिशाली एमएफ-स्टार एईएसए रडार तसेच आधुनिक टॉर्पेडो ट्यूब आणि रॉकेट लाँचरने सुसज्ज असतील. (वृत्तसंस्था)

# विस्तार अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई

## दीड वर्ष गैरहजर राहिल्याने पंचायत समिती गटविकास अधिकाऱ्यांचा आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून**

पंचायत समिती करमाळा येथे कार्यरत असलेले विस्तार अधिकारी (कृषी) श्री. म नोजकुमार देविदास म्हेत्रे यांच्यावर विनापरवाना दीर्घकाळ गैरहजर राहणे, वरिष्ठांच्या आदेशांचे पालन न करणे तसेच वारंवार नोटीस देऊनही समाधानकारक खुलासा न सादर केल्याच्या कारणास्तव निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. याबाबतचा आदेश गटविकास अधिकारी (वर्ग-१) पंचायत समिती करमाळा यांनी जारी केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद सोलापूर येथील प्रशासकीय कामकाज सुरळीत पार पडावे आणि कामाचा समतोल राखला जावा यासाठी श्री. म्हेत्रे यांना १८ सप्टेंबर २०२४ ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत समाजकल्याण विभागात हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यांनी त्या कालावधीत संबंधित विभागात हजेरी लावली. मात्र त्यानंतर पंचायत समिती करमाळा येथे रुजू होणे अपेक्षित असताना त्यांनी ३ ऑक्टोबर २०२४ पासून कोणतीही पूर्वपरवानगी न घेता कार्यालयीन कामकाजावर अनुपस्थित राहिल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

या काळात त्यांनी हजेरीपत्रकावर स्वाक्षरी केली नसून फिरती नोंदवहीतही कोणतीही नोंद केलेली नसल्याचे तपासात आढळून आले. त्याबाबत पंचायत समिती करमाळा, कृषी विकास अधिकारी कार्यालय तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालयामार्फत वेळोवेळी नोटिसा बजावण्यात आल्या. मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणताही खुलासा किंवा समाधानकारक उत्तर प्राप्त झाले नाही.

दरम्यान, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांनीही त्यांच्या वर्तनास गैरशिस्तीचे स्वरूप असल्याचे नमूद करत योग्य ती शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस केली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांनीदेखील यासंदर्भात स्वतंत्र नोटीस बजावली होती. सर्व बाबींचा विचार करून म्हेत्रे यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम, १९६७ मधील नियम ३ चे उल्लंघन केल्याचे निष्पन्न झाल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६४ मधील नियम ३ अन्वये त्यांना २७ मे २०२६ पासून जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. सदर निलंबन आदेशाची नोंद त्यांच्या मूळ सेवा पुस्तकात घेण्याचे निर्देशही प्रशासनाने दिले आहेत. या कारवाईमुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती प्रशासनामध्ये चर्चेला उधाण आले असून शासकीय सेवेत शिस्त व जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

# शिक्षण घेतानाच शिपाई पदाची मान्यता?

## घेरडीतील मॉडर्न हायस्कूलमध्ये नियुक्त्यांवर गंभीर प्रश्नचिन्ह

## शिक्षणविभागाची दिशाभूल केल्याचा आरोप

## संस्थाचालकांवर फौजदारी दाखल करण्याची विश्वस्त यशवंत पुकळे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून**

सांगोला तालुक्यातील घेरडी येथील मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील दोन शिपाई पदांच्या नियुक्त्यांबाबत गंभीर अनियमिततेचा आरोप समोर आला असून संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या मान्यता तत्काळ रद्द करून जबाबदारांवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी घेरडी येथील मॉडर्न एज्युकेशन सोसायटी या संस्थेचे विश्वस्त यशवंत दगडू पुकळे यांनी सोलापूर जिल्हा परिषदेचे सीईओ कुशल जैन आणि माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात सादर केलेल्या निवेदनात पोपट रामा गेजगे आणि इब्राहीम हजरत खलिफा यांच्या शिपाई पदावरील नियुक्त्या खोट्या कागदपत्रांच्या आधारे मंजूर झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. संबंधित नियुक्त्यांना संस्थेची किंवा शालेय समितीची कोणतीही वैध मंजुरी नसल्याचा दावा देखील करण्यात आला आहे.



निवेदनानुसार, ज्या कालावधीत पोपट गेजगे यांना शिपाई पदावर नियुक्त दाखविण्यात आले, त्याच कालावधीत ते नियमित विद्यार्थी म्हणून शिक्षण घेत होते. त्यांची शाळेतील उपस्थिती शंभर टक्के असल्याचा दावा करण्यात आला असून नियुक्तीच्या वेळी ते आवश्यक वयोमर्यादाही पूर्ण करत नव्हते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय, नियुक्ती प्रस्तावात त्यांना दहावी उत्तीर्ण दाखविण्यात आले असताना ते प्रत्यक्षात त्या कालावधीत शिक्षण घेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच इब्राहीम खलिफा यांच्याबाबतही नियुक्ती कालावधीत ते नियमितपणे कनिष्ठ महाविद्यालय व पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत होते, अशी माहिती विविध शैक्षणिक संस्थांकडून मिळालेल्या नोंदींमधून समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, शिपाई पदावरील मान्यता अस्तित्वात असतानाच त्यांना नंतर सहशिक्षक पदासाठीही म ान्यता देण्यात आल्याकडे निवेदनात लक्ष वेधण्यात आले आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणात संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष, सचिव तथा मुख्याध्यापक आणि लिपिक यांनी संगनमताने शिक्षण विभागाकडे चुकीची माहिती सादर करून शासनाची दिशाभूल केली व आर्थिक नुकसान घडवून आणल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधितांवर निलंबनाची कारवाई करून शासनाचे झालेले आर्थिक नुकसान वसूल करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. या निवेदनामुळे सांगोला तालुक्यातील शैक्षणिक व प्रशासकीय वर्तुळात चर्चा रंगली असून शिक्षण विभाग या गंभीर आरोपांची दखल घेऊन चौकशी सुरू करणार का, याकडे लक्ष लागले आहे.

> १८ मे २००९ रोजी याच विषयावर सविस्तर तक्रार करण्यात आली होती. मात्र, त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने पुन्हा एकदा निवेदन करण्यात आले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, अशी आमची मागणी आहे. तसे निवेदन सीईओ कुशल जैन आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्याकडे देण्यात आले आहे.
>
> **-यशवंत पुकळे, विश्वस्त**
> **मॉडर्न एज्युकेशन सोसायटी घेरडी,**
> **तालुका सांगोला**

# वेतन वेळेत मिळण्यासाठी आश्रम शाळेच्या शिक्षकाचे दंडवत आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**

वेतन वेळेत मिळण्यासाठी वैराग येथील एका आश्रम शाळेच्या शिक्षकाने चक्क दंडवत घालत जाऊन संबंधित कार्यालयाकडे निवेदन सादर केले. प्रदीप काशीनाथ पाटील असे त्या शिक्षकाचे नाव आहे. दंडवत आंदोलनाची ही राज्यातील पहिलीच घटना असल्याचे सांगण्यात येते.आदिवासी विकास विभाग अंतर्गत अनुदानित आश्रम शाळा वैराग, या शाळेचे सहशिक्षक प्रदीप काशिनाथ पाटील यांच्यासह काही कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन मागील पाच महिने प्रलंबित आहे व प्रदीप काशिनाथ पाटील यांची शाळा मान्यता रद्द झाल्यानंतर म ेहा आश्रम शाळेतील संस्थापकांनी समायोजन केल्यामुळे त्यांची नऊ महिन्याची प्रतिक्षा कालावधी वाढला आहे, असे या निवेदनात म्हटले आहे.

# सराईत वाळु तस्कराची येरवडा कारागृहात रवानगी

**पंढरपूर,दि. ४ जून -**

पंढरपूर शहर पोलिस ठाणे हद्दीत अवैधपणे वाळू उपसा व बेकायदेशीरपणे विक्री व्यवसाय करणारा वाळु तस्कर महेश तानाजी शिंदे रा. इसबावी, पंढरपूर यास एक वर्षासाठी एम.पी.डी.ए कायद्यांतर्गत स्थानबध्दतेचे आदेश पारित करुन येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे स्थानबध्द केले आहे.सराईत आरोपी महेश शिंदेने वाळुचे कारणावरून जीवघेणे हल्ले करणे, लोकांना दमदाटी, मारहाण करून, गौण खनिज चोरी करणे असे गुन्हे केले आहेत. तो जामिनावर बाहेर राहून अवैध वाळु व्यवसाय करतच होता. म्हणुन पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांनी स्थानबध्दतेचा प्रस्ताव पोलिस अधिक्षकांमार्फत जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांना दिला होता. त्या अनुषंगाने स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले होते. ही कामगिरी पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधीक्षक विजय कबाडे, सहायक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे, पोलिस निरीक्षक संजय जगताप, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण वरिष्ठ पोलिस निरीक्षक दशरथ वाघमोडे, यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी नितीन जगताप, स.पो.फौ. कल्याण ढवणे, शरद कदम, पोलिस नाईक सचिन इंगळे, स्थानिक गुन्हे शाखेचे अनिस शेख, सायबर सेलचे रतन जाधव यांनी केली आहे.

# ग्रेटर निकोबार बेटांचा होणार कायापालट

**९ अब्ज डॉलर्सच्या प्रकल्पाला मंजुरी** | **पायाभूत सुविधा उभारणार** | **लष्करी, हवाई तळाचीही निर्मिती**



**नवी दिल्ली, ४ जून**

ग्रेटर निकोबार बेटांचा कायापालट करण्यासाठी केंद्र सरकारने ९ अब्ज डॉलर्सच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पातंर्गत अंदमान आणि निकोबार बेट समुहांना एक सागरी आणि आर्थिक केंद्रामध्ये रूपांतरित करण्यात येणार आहे.

या बेटांवर मालवाहतुकीसाठी बंदर, लष्करी, हवाई तळ, एक ऊर्जा प्रकल्प, पर्यटनाच्या दृष्टीकोणातून पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्याचबरोबर ३ लाख ५० हजार लोकांची एक टाऊनशिप देखील तयार करण्यात येईल. हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी तीस वर्षे लागणार असून पहिला टप्पा २०२८ पर्यंत पूर्ण होण्याची शक्यता असल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वृत्तसंस्थेशी बोलताना दिली.सध्याच्या घडीला भारतीय बंदरांवर मोठ्या जहाजांसाठी खोल पाण्यात असलेली बर्थ कमी आहेत. त्यामुळे माल कोलंबो किंवा सिंगापूरच्या समुद्री मार्गाने पाठवला जातो. यामुळे भारताचे मोठे आर्थिक नुकसान होते. ज्यावेळी ग्रेटर निकोबार प्रोजेक्ट तयार होईल त्यावेळी १४.२ मिलियन टीईयू असलेले आंतरराष्ट्रीय कंटेनर ट्रान्सशिपमेंट टर्मिनल शिपमेंटबाबतचे भारताचे दुसऱ्या देशांवर असेले अवलंबत्व फक्त संपणार नसून हिंदी महासागरातील एक महत्वाच्या समुद्री रस्त्यावर नजर देखील ठेवता येणार आहे. *(वृत्तसंस्था)*

### राष्ट्रीय सुरक्षेसाठी महत्त्वाची योजना

सामरिक आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या ग्रेट निकोबार बेटाच्या विकासाचा उद्देश हा अंदमान समुद्र आणि दक्षिण पूर्व आशियामधील भारताची उपस्थिती मजबूत करणे हा आहे. ही योजना भारताची राष्ट्रीय सुरक्षा, रणनैतिक आणि संरक्षण उपस्थिती वाढवणार आहे. हे ठिकाण मलक्काच्या अगदी जवळ आहे. मलक्का सामुद्रीधुनीतून वाहतूक करणाऱ्या जहाजांवर नजर ठेवण्यासाठी हे उत्तम ठिकाण आहे.

# गुजरातमध्ये ५०१ बांगलादेशींना पकडले

**उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांची माहिती**



**अहमदाबाद, ४ जून**

अहमदाबाद पोलिस आणि गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने ऑपरेशन डेल्टा हंट मोहीम राबवत राज्यातील विविध भागांतून ५०१ बांगलादेशी नागरिकांना अटक केली. प्राथमिक तपासात हे सर्व बेकायदेशीर बांगलादेशी नागरिक असल्याचे निष्पन्न झाले आहे.

गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांनी गुरुवारी राज्यभरात घुसखोरांविरोधात सुरू असलेल्या ऑपरेशन डेल्टा हंट या कारवाईबद्दल माहिती दिली. त्यांनी सांगितले की, गुरुवार राज्यभरातून ५०१ बेकायदेशीर बांगलादेशी घुसखोरांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी चांदोल, गुलाबनगर आणि खोडियारनगरसह शहरातील अनेक भागांमध्ये घुसखोरांविरोधात मोठी शोधमोहीम राबवली. ही मोहीम अजूनही सुरू असून, राज्याच्या अनेक भागांमध्ये राबवली जात आहे. अनेक घुसखोरांकडे फसवणूक करून मिळवलेली आधार कार्ड होती. यामुळे कागदपत्रांच्या बनावटीच्या नेटवर्कची आणि भारतात त्यांच्या वास्तव्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धतींची सखोल चौकशी सुरू आहे. *(वृत्तसंस्था)*

### आधार कार्ड बनवणाऱ्यांचा शोध

**सह पोलिस आयुक्त शरद सिंघल यांनी सांगितले की, राज्यव्यापी ऑपरेशन डेल्टा हंट मोहीमेत अटक करण्यात आलेल्या ५०१ लोकांची ओळख बांगलादेशी नागरिक म्हणून पटली आहे. यापैकी अनेकांनी बेकायदेशीरपणे भारतीय आधार कार्ड मिळवले होते. ही कागदपत्रे कोणी तयार करून दिली याचा आम्ही तपास करत आहोत. हे लोक भारतात कसे आले, ते काय काम करत होते आणि पैसे पाठवण्यासाठी ते कोणत्या माध्यमांचा वापर करत होते, याचाही तपास केला जात आहे.**

# शस्त्र तस्करी प्रकरणात तृणमूलचा नेता अटकेत

**कोलकाता :** पश्चिम बंगाल पोलिसांनी फसवणूक, खंडणी, भ्रष्टाचार आणि शस्त्र तस्करीच्या प्रकरणात तृणमूल काँग्रेसचा नेता तिलक कुमार चक्रवर्ती याला पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यातील हल्दिया येथून अटक केली. कथित नोकरी घोटाळा प्रकरणातही त्याचा समावेश होता. तिलक यांच्यासह सुरेंद्रनाथ कॉलेज शस्त्रबंदी प्रकरणी तृणमूलचे नेते परितोष दत्ता यांना कोलकाता पोलिसांनी बर्दवानमध्ये अटक केली आहे. शिक्षक भरती घोटाळ्याप्रकरणी माजी शिक्षणमंत्री पार्थ चॅटर्जी आणि इतर अनेकांविरुद्ध शोधमोहीम राबवण्यात आली. कर्मचारी निवड आयोगाच्या (टीएससी) भरती घोटाळ्याप्रकरणी ईडीने बुधवारी कोलकातामधील दोन ठिकाणी शोधमोहीम राबवली. ही शोधमोहीम पार्थ चॅटर्जी यांच्या निवासस्थानी आणि सध्या न्यायालयीन कोठडीत असलेल्या प्रसन्न कुमार रॉय यांच्या कार्यालयात राबवण्यात आली. याशिवाय कोलकाता महानगरपालिकेच्या तीन नगरसेवकांना अटक करण्यात आली आहे.

# बंडखोरांचा नवा खेला; आता खासदारांवर डोळा



**अभिषेक बॅनर्जीविरोधात उघडला मोर्चा**

**नवी दिल्ली, ४ जून**

पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत संघर्ष आता राष्ट्रीय पातळीवर पोहोचत असल्याचे दिसत आहे. बुधवारी, तृणमूल काँग्रेसला २८ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच फुटीचा सामना करावा लागला.



५८ बंडखोर आमदारांनी पक्षातून काढून टाकलेले नेते ऋतब्रता बॅनर्जी यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड करून विधिमंडळ पक्षावर आपले नियंत्रण प्रस्थापित केले. त्यांना सभापतींकडूनही मान्यता मिळाली. त्यामुळे ममता बॅनर्जी यांचा पक्ष स्थापनेपासूनच्या सर्वात गंभीर अंतर्गत संकटात सापडला आहे.

विधानसभेत आपली ताकद दाखविल्यानंतर बंडखोर नेते आता तृणमूल काँग्रेसच्या संसदीय पक्षावर लक्ष ठेवून आहेत. त्यामुळे लोकसभेतही सत्तासंघर्षाची शक्यता निर्माण झाली आहे. बंडखोर नेत्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, त्यांचा लढा ममता बॅनर्जी यांच्या विरोधात नाही, तर त्यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्या वाढत्या प्रभावाविरोधात आहे. त्यांचा प्रभाव कमी करण्यासाठी बंडखोरांकडून नवनवे डावपेच आखले जात आहे. सध्या, लोकसभेत तृणमूलचे २९ खासदार असून अभिषेक बॅनर्जी हे पक्षाचे संसदीय नेते आहेत. जर मोठ्या संख्येने तृणमूल खासदार बंडखोर नेत्यांसोबत सामील झाले, तर संसदीय नेतृत्वात बदलाची मागणी होऊ शकते. त्यामुळे अभिषेक बॅनर्जी यांचे पद धोक्यात येईल. *(वृत्तसंस्था)*

### राष्ट्रीय राजकारणावर होणार परिणाम

असे झाल्यास, हे अभिषेक बॅनर्जी यांच्या नेतृत्वापुढील आतापर्यंतचे सर्वात मोठे आव्हान ठरेल. विधानसभेपुरता मर्यादित असलेला हा वाद जर लोकसभेत पोहोचला तर त्याचा राष्ट्रीय राजकारणावर परिणाम होऊ शकतो. तसेच विरोधी आघाडीतील तृणमूलच्या भूमिकेवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. बंडखोर गट विधानसभेतील यशाची पुनरावृत्ती करू शकतो की नाही हे पाहणे बाकी असले तरी, ही अंतर्गत लढाई आता बंगालच्या पलीकडे जाऊन नवी दिल्लीतील लोकसभेच्या उंबरठ्यावर पोहोचेल हे निश्चित आहे.

# नवी दिल्ली विमानतळावर ३.८ कोटींचे सोने जप्त

**सीमाशुल्क अधिकाऱ्यांची मोठी कारवाई**

**नवी दिल्ली, ४ जून**

दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी एक मोठी कारवाई केली आहे. त्यांनी शारजाहहून आलेल्या विमानातून सुमारे ३.८ कोटी रुपयांचे सोने जप्त केले आहे.

याप्रकरणी एका भारतीय प्रवाशाला अटकही करण्यात आली आहे. ही कारवाई विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आली.

सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी १ जूनला शारजाहहून दिल्लीत आलेल्या प्रवाशाला अडवले. संशयित सोने शोधण्यासाठी विमानाच्या आत कसून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान अधिकाऱ्यांना अंदाजे ३,५५० ग्रॅम वजनाच्या दोन काळ्या पिशव्या सापडल्या. या पिशव्या प्रवाशाच्या आसनासमोरील आसनाखाली चतुराईने लपवून ठेवल्या होत्या. सोन्याची पुनर्प्राप्ती आणि शुद्धीकरण जप्त केलेल्या सोन्याची तपासणी करून ते शुद्ध करण्यात आले. शुद्धीकरणानंतर एकूण २,७५५ ग्रॅम सोने जप्त करण्यात आले. हे सोने पेस्टच्या स्वरूपात लपवून ठेवण्यात आले होते. जप्त केलेल्या सोन्याचे दरमूल्य ३,८०,४८,५२३ इतके ठरवण्यात आले आहे. *(वृत्तसंस्था)*

## चित्रपट वार्ता

### पुन्हा एकत्र दिसणार अहान-अनित




**मुंबई :** 'सैयारा'च्या यशानंतर अहान पांडे आणि अनित पड्डाची जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एकत्र दिसणार आहे. सूत्रांनुसार, यशराज फिल्म्सच्या बॅनरखाली दिग्दर्शक मोहित सूरी या दोन्ही कलाकारांना घेऊन एक नवीन म्युझिकल लव्ह स्टोरी तयार करत आहेत. याचे चित्रीकरण याच वर्षाच्या शेवटी सुरू होईल. सूत्रांनुसार, हा अनटाइटल्ड चित्रपट ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२६ मध्ये प्रदर्शित होईल. चित्रपटाची निर्मिती यशराज फिल्म्सच्या बॅनरखाली होईल आणि निर्माता आदित्य चोप्रा याची मोठ्या प्रमाणावर तयारी करत आहेत. चित्रपटाचे हे नाव निर्मात्यांनी अजून अंतिम केलेले नाही. यशराज फिल्म्स सध्या स्क्रिप्ट, स्टारकास्ट आणि शीर्षकाशी संबंधित सर्व माहिती गुप्त ठेवली आहे.

### फेडरेशनने घेतला असहकाराचा निर्णय मागे



**मुंबई :** फेडरेशन ऑफ वेस्टर्न इंडिया सिने एम्प्लॉइजने रणवीर सिंह यांच्या विरोधात जारी केलेला 'नॉन-कोऑपरेशन डायरेक्टिव्ह' तात्काळ प्रभावाने मागे घेण्याची घोषणा केली. इंडियन मोशन पिक्चर प्रोड्यूसर्स असोसिएशनच्या हस्तक्षेप आणि विनंतीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. चित्रपट उद्योगात एकता, सहकार्य आणि सलोखा राखणे सर्वात महत्त्वाचे आहे. याच उद्देशाने हे प्रकरण चर्चा आणि परस्पर समजुतीने सोडवण्याचा निर्णय घेण्यात आला, असे संस्थेने सांगितले. एफडब्ल्यूआयसीईने कधीही रणवीर सिंह यांच्यावर बंदी घातली नव्हती, असे एफडब्ल्यूआयसीईचे सल्लागार अशोक पंडित म्हणाले. या प्रकरणाला बंदी म्हणून सादर करू नये, कारण यामुळे गोंधळ निर्माण होतो, असे आवाहन त्यांनी माध्यमांना केले.

### आमिर तिसऱ्यांदा चढणार बोहल्यावर



**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता आमिर खान आणि त्यांची गर्लफ्रेंड गौरी स्प्रॅट लवकरच विवाहबंधनात अडकणार आहेत. ते ५ जुलै रोजी एका खासगी समारंभात लग्न करणार आहेत. लग्नाचा कोणताही भव्य सोहळा होणार नाही. ते एका 'साइनिंग सेरेमनी'द्वारे लग्न करणार आहेत. आमिर खानने २०२५ मध्ये त्याच्या ६० व्या वाढदिवशी गौरीसोबतच्या त्याच्या नात्याची कबुली मीडियासमोर दिली होती. आमिर खानचे हे तिसरे लग्न आहे. आमिरने पहिले लग्न १९८६ मध्ये चित्रपट निर्माती रीना दत्तासोबत केले होते. २००२ मध्ये रीनापासून वेगळे झाल्यानंतर, आमिरने २००५ मध्ये दिग्दर्शिका किरण रावसोबत दुसरे लग्न केले होते. २०२१ मध्ये किरण आणि आमिरचा घटस्फोट झाला होता. आमिर आणि गौरी मागील एका वर्षापेक्षा जास्त काळापासून एकत्र आहेत.

## निर्माते पहलाज निहलानी यांचे निधन

**मुंबई, ४ जून**

दिग्दर्शक, निर्माते आणि सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशनचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांचे ७६ व्या वर्षी निधन झाले. ते अनेक दिवसांपासून यकृताशी संबंधित आजाराला लढा देत होते.

मुंबईतील नानावटी रुग्णालयात त्यांना दाखल करण्यात आले होते. तिथे त्यांच्यावर उपचार सुरू होते. पण, मृत्यूशी त्यांची झुंज अखेर अपयशी ठरली. गुरुवारी मुंबईतील त्यांच्या राहत्या घरी त्यांची प्राणज्योत मालवली.



पहलाज निहलानी हे चित्रपट निर्माते होते. त्यांनी शत्रुघ्न सिन्हा आणि रिना रॉय अभिनित 'हथकडी', गोविंदा आणि दिव्या भारती अभिनित 'शोला और शबनम', गोविंदा आणि चंकी पांडे अभिनित 'आंखें', अनिल कपूर आणि करिश्मा कपूर अभिनित 'अंदाज', अक्षय आणि करिना कपूर अभिनित 'तलाश', राय लक्ष्मी अभिनित 'जूली २' आणि गोविंदा अभिनित 'रंगीला राजा' यांसारख्या चित्रपटांची निर्मिती केली आहे. अनेक अभिनेत्यांच्या कारकीर्दीत पहलाज निहलानी यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. १९८६ मध्ये त्यांनी 'इल्झाम' या चित्रपटाद्वारे गोविंदाला चित्रपटसृष्टीत आणले आणि यानंतर 'आग ही आग' या चित्रपटाद्वारे चंकी पांडेला क्षेत्रात आणले.

निहलानी यांनी शाहिद कपूर अभिनित 'उडता पंजाब' चित्रपटात कथितरीत्या ६९ कट्स लावण्यास सांगितले होते, जे खूप चर्चेत राहिले होते. नंतर मुंबई उच्च न्यायालयाने सीबीएफसीचा निर्णय चुकीचा ठरवला आणि चित्रपट फक्त एका कटसह प्रदर्शित झाला होता. *(वृत्तसंस्था)*

# रुग्णालयाला आग; चौघांचा मृत्यू, २० हून अधिक जण भाजले

**रुग्णांना सोडून पळाले कर्मचारी**

**मुझफ्फरनगर, ४ जून**

बिहारमधील मुझफ्फरपूरमध्ये एका खासगी रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये आग लागल्याने चार जणांचा मृत्यू झाला. तर, २० हून अधिक लोक भाजले. हा अपघात बुधवारी रात्री सुमारे ३ वाजता झाला.





आग लागल्यानंतर अग्निशमन दलाचे पथक रुग्णालयात पोहोचले आणि आगीवर नियंत्रण मिळविले. स्थानिक लोकांच्या मते मृत्यूचा आकडा वाढू शकतो. आयसीयू वॉर्ड पाचव्या मजल्यावर आहे. यामुळे बचाव कार्यात अडचण आली. अग्निशमन दलाच्या जवानांनी आयसीयू आणि इतर वॉर्डमध्ये अडकलेल्या रुग्णांना खिडक्या आणि दरवाजे तोडून बाहेर काढले. पोलिसांनी घटनास्थळावरून मृतदेह घाईघाईने हलवले, असा आरोप प्रत्यक्षदर्शींचा आहे. तसेच, रुग्णालयातील एका नर्सवर मृतांना जिवंत असल्याचे सांगण्याचा आरोपही करण्यात आला आहे. आग लागल्यानंतर वेळेवर पाण्याची व्यवस्था केली असती तर मृतांची संख्या कमी झाली असती. आयसीयूमध्ये दाखल होते. अचानक वॉर्डमध्ये धूर येऊ लागला. मी लगेच माझा ऑक्सिजन मास्क काढला आणि वॉर्डमधून बाहेर आले.

बाहेर येऊन गार्डला आत आग लागल्याची माहिती दिली, असे आयसीयूमध्ये दाखल असलेल्या राधा देवी यांनी सांगितले. आग लागल्यानंतर रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचारी रुग्णांना वेदनेत सोडून पळून गेले, असा आरोप कुटुंबीयांचा आहे.

पथक घटनास्थळी पोहोचले, तेव्हा रुग्णालयातील बहुतेक कर्मचारी तिथे उपस्थित नव्हते, असा दावा अग्निशमन दलाच्या एका अधिकाऱ्याने केला आहे. निष्काळजीपणा केल्याप्रकरणी रुग्णालयावर कारवाई केली जाईल. काही नातेवाईकांचा त्यांचे रुग्ण वॉर्डमधून हरविले असल्याचा आरोप आहे. प्रत्येक पैलूची चौकशी केली जात आहे, असे मुझफ्फरपूरचे जिल्हाधिकारी सुब्रता कुमार यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

# पीए हत्या प्रकरणात मोनूचे आत्मसमर्पण

**हत्येत वापरलेली कार खरेदी केल्याचा आरोप**

**बलिया, ४ जून**

पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांचे पीए चंद्रनाथ रथ हत्या प्रकरणात कार खरेदी करणारा बलिया जिल्ह्यातील शीतल दौनी गावचा रहिवासी ज्ञानेंद्र सिंग मोनू गुरुवारी न्यायालयात हजर झाला. मोनूची पत्नी महिमा सिंग यांनी याला दुजोरा दिला आणि सांगितले की, तिच्या पतीला खोट्या आरोपांमध्ये गोवण्यात येत आहे. हत्येमध्ये वापरलेली कार खरेदी केल्याचा आणि नवीनला शस्त्रे पुरवल्याचा आरोप ज्ञानेंद्रवर आहे.

यूपी एसटीएफ आणि सीबीआयची पथके बऱ्याच काळापासून ज्ञानेंद्रचा शोध घेत होती. त्याने तपास यंत्रणांना चकमा दिला आणि एका चालू असलेल्या गँगस्टर प्रकरणात न्यायालयात हजर झाला. ही माहिती मिळताच तपास यंत्रणा सक्रिय झाल्या. ज्ञानेंद्र सिंह मोनूने न्यायालयात हजर होण्यापूर्वी फेसबुकवर एक पोस्ट केली. त्यात त्याने पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांना चंद्रनाथ रथ हत्या प्रकरणात आपल्याला खोट्या आरोपांत गोवण्यात येत असल्याचा आरोप करत या प्रकरणाची चौकशी करण्याची विनंती केली होती. रथ हत्या प्रकरणात मोनूची काय भूमिका होती, हे केवळ तपासानंतरच कळेल.

आरोपी ज्ञानेंद्र मोनूवर बन्सडीह रोड, छत्तीसगड आणि झारखंडसह अनेक राज्यांमध्ये आणि पोलिस ठाण्यांमध्ये १२ हून अधिक गुन्हेगारी खटले दाखल आहेत. २०२२ मध्ये गावातील मुकेश सिंग यांच्यासोबत जमिनीच्या वादातून गोळीबाराची घटना घडली होती, ज्यात मोनू आणि इतरांवर विविध कलमांखाली आरोप ठेवण्यात आले होते. *(वृत्तसंस्था)*

# 'आयआरसीटीसी' किचनवर 'एआय'ची नजर

## अस्वच्छता केल्यास दोन तासांत होणार कडक कारवाई

**मुंबई, ४ जून**

रेल्वे स्थानकांवर आणि चालत्या गाड्यांमध्ये मिळणाऱ्या जेवणाच्या दर्जाबाबत व अस्वच्छतेबाबत प्रवाशांच्या नेहमीच तक्रारी असायच्या. मात्र, आता प्रवाशांना दर्जेदार, सकस आणि शुद्ध जेवण मिळावे यासाठी 'इंडियन रेल्वे कॅटरिंग अ‍ॅण्ड टुरिझम कॉर्पोरेशन'ने (आयआरसीटीसी) एक अत्यंत मोठे आणि हायटेक पाऊल उचलले आहे. देशभरातील रेल्वेच्या मुख्य बेस किचनवर आता थेट 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (एआय) कॅमेऱ्यांद्वारे २४ तास कडक नजर ठेवली जाणार असून, दिल्लीतील केंद्रीय वॉर रूममधून या संपूर्ण प्रक्रियेचे थेट मॉनिटरिंग केले जात आहे.

पाटणा-टाटानगर वंदे भारत एक्सप्रेसमध्ये खराब दर्जाचे दही दिल्याबद्दल रेल्वे मंत्रालयाने 'आयआरसीटीसी'वर १० लाख रुपयांचा मोठा दंड ठोठावला आहे. एवढेच नव्हे तर, संबंधित ट्रेनमध्ये अन्न पुरवठा करणाऱ्या मुख्य कंत्राटदार कंपनीला ५० लाख रुपयांचा प्रचंड दंड ठोठावण्यात आला होता, त्यापृष्ठभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे.

देशभरात पसरलेल्या आयआरसीटीसीच्या ८०० पेक्षा जास्त बेस किचनमध्ये तब्बल २ हजार ३९४ 'एआय-आधारित कॅमेरे' बसवण्यात आले आहेत. हे कॅमेरे केवळ साधे 'सीसीटीव्ही' सारखे चित्रीकरण करत नाहीत, त जेवण बनवताना आचाऱ्यांकडून किंवा कर्मचाऱ्यांकडून होणाऱ्या ९ प्रकारच्या विशिष्ट चुका किंवा अस्वच्छता स्वयंचलितपणे शोधून काढतात. या तंत्रज्ञानाची अचूकता इतकी जबरदस्त आहे की, जेवणा पडलेला अवघा ७ ते ८ मिलीमीट इतका लहान कीटक किंवा केसही हे कॅमेरे सहज पकडू शकतात. या 'एआय' प्रणालीची कार्यपद्धती अत्यंत वेगवान आहे. सर्वसाधारणपणे चूक आढळल्यास दोन तासांच्या आत जबाबदार व्यक्ती किंवा अन्न पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारावर कडक दंडात्मक कारवाई केली जाईल. सध्या देशातील १ हजार ४५३ ट्रेनमध्ये जेवणाची सेवा दिली जात असून, वर्षाला सुमारे ६० कोटी प्रवासी र सेवेचा लाभ घेतात. *(तभा वृत्तसेव)*

### या गोष्टींवर असणार कॅमेऱ्यांची नजर


- स्वयंपाकी आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी डोक्यावर हेअरनेट न घालणे.
- कर्मचाऱ्यांनी हातामध्ये पारदर्शक सुरक्षित ग्लव्स न घालणे.
- किचनमधील अस्वच्छता आणि जमिनीवर योग्य प्रकारे पोछा न मारणे.
- अन्न उघड्यावर किंवा अस्वच्छ ठिकाणी ठेवणे.
- किचनच्या आवारात उंदीर, माश्या, झुरळे किंवा इतर कीटकांचा वावर असणे.



# तिऱ्हे गावाजवळ दुचाकीला अपघात; सोलापूरच्या डॉक्टराचा मृत्यू

**सोलापूर, दि. ४ जून-**

गाडीवरचा बाबा सुटल्याने भरवेगातील दुचाकी घसरून झालेल्या अपघातात सोलापूरच्या एका तरुण डॉक्टराचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना मंगळवेढा - सोलापूर मार्गावर तिऱ्हे गावाजवळ आज गुरुवारी दुपारी एकच्या सुमारास घडली. डॉ. निखिलेश नागेश मठ (वय ३६ वर्ष, रा. कन्ना चौक , सोलापूर) असे मृत डॉक्टरांचे नाव असून ते मंगळवेढा येथील एका खासगी रुग्णालयात सेवा देत होते. ते आज गुरुवारी दुपारच्या सुमारास दुचाकीवरून आपल्या घराकडे परतत होते. सोलापूर-मंगळवेढा रस्त्यावरील तिऱ्हे गावाजवळ आले असता, अचानक त्यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटून दुचाकी घसरली. या भीषण अपघातात डॉ. निखिलेश हे गंभीर जखमी झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी रुग्णवाहिकेतून त्यांना तातडीने जखमी अवस्थेत येथील शासकीय



रुग्णालयात दाखल करण्यात आले असता त्यांचा उपचारादरम्यान थोड्याच वेळाने मृत्यू झाला. दरम्यान अपघाताची माहिती समजताच वैद्यकीय क्षेत्रातील सहकाऱ्यांनी व नातेवाईकांनी सिव्हिल मध्ये गर्दी केली होती . त्यांच्या पश्चात आई, वडील, डॉक्टर पत्नी आणि लहान मुलगी, दोन बहिणी असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली .

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# ममतांचे चिंतन आणि भविष्याची चिंता

गेल्या सुमारे तीन वर्षांपासून महाराष्ट्रात घुमत असलेल्या एका रडगाण्याचे सूर आता थेट पश्चिम बंगालपर्यंत पोहोचले आहेत. आमचा पक्ष चोरला, चिन्ह चोरले, बाप चोरला असा टाहो महाराष्ट्रातील जनता तीन वर्षांपासून ऐकत आली आहे. या काळात पुढे महाराष्ट्रात झालेल्या अनेक निवडणुकांमध्ये पक्षचोरीच्या रडगाण्याला जनतेनेच चोख उत्तर दिले. आता पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीनंतर अपेक्षेप्रमाणे पक्षचोरीचे रडगाणे तेथे घुमू लागले आहे. जेव्हा एखाद्या राजकीय पक्षाच्या नेतृत्वाच्या क्षमतेवर प्रश्नचिन्हे उमटतात, तेव्हा ती पुसण्यासाठी अशा रडगाण्यांचे सूर कामी येतात, असे आता महाराष्ट्रापाठोपाठ पश्चिम बंगालमधील राजकारणातून स्पष्ट दिसू लागले आहे. ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसची पाळेमुळे पश्चिम बंगालमधून पुरती उखडली गेली आहेत आणि पक्षाला बंडखोरीच्या साथीने ग्रासले आहे.

ममता बॅनर्जी यांनी ज्या नेत्यास पक्षातून निलंबित केले, त्याच नेत्याच्या पाठीशी या पक्षाच्या तब्बल ५८ आमदारांनी आपली ताकद उभी केली आणि ममता बॅनर्जी व त्यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांना एकाकी पाडून तृणमूलचा ताबा घेतला. गेल्या सुमारे १५ वर्षांपासून पश्चिम बंगालवर सत्ता गाजविणाऱ्या तृणमूल काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षात ही उभी फूट पडल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी महाराष्ट्रातील हे रडगाणे तिकडे आळविण्यास सुरुवात केली आहे. पश्चिम बंगालच्या विधानसभेत विजयी झालेल्या ८० पैकी ५८ आमदारांनी स्वतंत्र गट स्थापन करून ऋतुब्रत बॅनर्जी यांची गटनेतेपदी निवड केल्यानंतर त्यांची विरोधी पक्षनेतेपदी झालेली निवड हे ममता बॅनर्जी यांच्या गेल्या २८ वर्षांच्या एकहाती नेतृत्वास दिले गेलेले आजवरचे सर्वात मोठे आव्हान ठरले आहे. बंडखोर गटाने पक्षावर दावा केला आहे आणि ममता बॅनर्जी यांनी पक्षाच्या कारभारापासून दूर राहून केवळ सल्लागाराची भूमिका बजावावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील घडामोडींची पुनरावृत्ती सुरू झाल्यानंतर ममता बॅनर्जी यांना आत्मचिंतनाचा साक्षात्कार झाला असून त्याआधी पक्षातील सर्व विभाग विसर्जित करण्यात आले आहेत. या काळात आपल्या पाठीशी कोण आहे, हे वळून पाहण्याची त्यांना गरजही नाही. निवडणुकीत वाताहत झाल्यानंतर लगेचच ममता बॅनर्जी यांनी निमंत्रित केलेल्या पहिल्या चिंतन बैठकीकडे नऊ आमदारांनी पाठ फिरविली. आजमितीस ८० पैकी ५८ आमदारांनी ममता बॅनर्जींचे नेतृत्व नाकारले आहे. गेल्या महिनाभरात या पक्षात पडद्यामागे अनेक नाट्यमय घडामोडी घडल्यानंतर आता बंडखोर गटास विधिमंडळातील अधिकृत तृणमूल काँग्रेस म्हणून मान्यता मिळाली आहे आणि ममता बॅनर्जी यांनी पक्षावरील ताबा गमावला आहे. ममता सरकारच्या काळात पक्षाला मुठीत ठेवणाऱ्या अभिषेक बॅनर्जी यांना या राज्यातील जनतेपाठोपाठ या गटानेही खड्यासारखे दूर केले. पुढच्या काळात ममता-अभिषेक यांच्या राजकीय नेतृत्वाचे भवितव्य काय असेल, ते स्पष्ट होणार आहे. कारण पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसभोवती घोंघावणारे हे वादळ केवळ विधिमंडळापुरते मर्यादित नाही. संसदेतील या पक्षाच्या खासदारांच्या भूमिकेवर आणि विरोधकांनी भाजपाला रोखण्यासाठी स्थापन केलेल्या इंडिया आघाडीतील तृणमूल काँग्रेसच्या अस्तित्वावरही अनिश्चिततेचे सावट दाटले आहे.

पश्चिम बंगालमध्ये तब्बल १५ वर्षे सत्तेवर असलेल्या तृणमूल काँग्रेसमध्ये वेळोवेळी निर्माण होणारे मतभेद, नाराजीचे सूर काही नव्या बाबी नाहीत. मात्र, आता पडलेल्या फुटीची कारणे वेगळी आहेत. या घडामोडींमुळे ममता बॅनर्जी यांनी स्थापन केलेल्या पक्षाचे संघटनात्मक आरोग्य, ममतांची नेतृत्वशैली आणि त्यांच्यासमोरील भविष्यातील राजकीय आव्हाने स्पष्ट झाली आहेत. कोणत्याही प्रादेशिक पक्षाची प्रतिमा ही त्याच्या नेत्याच्या व्यक्तिगत प्रतिमेशी जोडली गेलेली असते. महाराष्ट्रात शिवसेनेवर बाळासाहेबांच्या प्रतिमेची तर राष्ट्रवादी काँग्रेसवर शरद पवार यांच्या प्रतिमेची छाप होती. तृणमूल काँग्रेसचा तंबू ममता बॅनर्जी यांच्या एकखांबी नेतृत्वावर उभा होता. अशा प्रादेशिक व कुटुंबकेंद्रित पक्षांमध्ये संघटनात्मक नेतृत्वापेक्षा व्यक्तिकेंद्री नेतृत्व अधिक प्रभावी असते. असे दीर्घकाळ चालत राहते, तेव्हा अन्य नेत्यांमध्ये नाराजी मूळ धरू लागते. निर्णयप्रक्रियेत सहभाग मिळत नसल्याची भावना वाढीस लागते, नेतृत्वाच्या संधीचे प्रश्न निर्माण होतात, स्थानिक नेत्यांमध्ये हितसंबंधांचे संघर्ष वाढतात आणि सत्तेतील स्पर्धेतून फुटीची बीजे रुजू लागतात. महाराष्ट्रापाठोपाठ पश्चिम बंगालमध्ये आता तसेच घडताना दिसू लागले आहे. यातूनच काही नेते भाजपामध्ये गेले, काहींनी स्वतंत्र भूमिका घेतली तर काहींनी पक्षांतर्गत नाराजी उघडपणे व्यक्त केली. या घटना पाहता, ममता बॅनर्जी यांच्या अजेय प्रतिमेला मात्र मोठा तडा गेला आहे. २०११ पासून बंगालच्या राजकारणात ममता बॅनर्जी यांचे वर्चस्व निर्विवाद राहिले आहे. या मोठ्या फुटीनंतरही शिल्लक राहिलेल्याच्या निष्ठावंतांचा ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वावर विश्वास आहे. ममता म्हणजेच तृणमूल अशी त्यांची भावना आहे. पक्षातील असंतोषाच्या उद्रेकात हा विश्वास डळमळीत झाला, तर ही भावनाही कमकुवत होऊ शकते. ममता यांचा उत्तराधिकारी मानल्या जाणाऱ्या अभिषेक बॅनर्जी यांच्यावरील जनतेच्या रोषाचा उद्रेक पश्चिम बंगालने नुकताच अनुभवला. आता बंडखोर गटाने तर पक्षाच्या नोंदीतून त्यांचे नाव हटविले आहे. या पक्षाचा जनाधार मानल्या जाणाऱ्या ग्रामीण भागातील जनतेने आणि अल्पसंख्यक पाठीराख्यांनीही ममता बॅनर्जी यांचे नेतृत्व नाकारले, तर या पक्षाचे पक्षचोरीचे रडगाणे कोणीच ऐकून घेणार नाही. त्यामुळे ममता जेव्हा पराभवाचे चिंतन करण्यासाठी सज्ज होतील, तेव्हा त्यांना अन्य राज्यांतील अशा घडामोडींकडे वळून पाहावे लागेल. एकूणच भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांतील फूट किंवा बंड हा अपवाद नाही, तर जवळपास नियमच ठरला आहे. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेतील बंडानंतर पक्षाची शकले झाली आणि राजकीय समीकरणे बदलून गेली. बिहारमध्ये नितीश कुमार यांच्या पक्षात अनेकदा अंतर्गत संघर्ष झाले, पण ते शमवून पक्षसंघटना टिकविण्यात त्यांनी यश मिळवले. आंध्र प्रदेशात चंद्राबाबू नायडू यांच्या पक्षातही विविध टप्प्यांवर गटबाजी झाली. परंतु मजबूत संघटनात्मक चौकट असल्याने ती नियंत्रित राहिली. उत्तर प्रदेशातील मुलायम-अखिलेश यांच्यातील संघर्ष हे कौटुंबिक नेतृत्वाच्या वादाचे आणि मर्यादांचेही उदाहरण ठरले होते तर तामिळनाडूमध्ये जयललिता यांच्या निधनानंतर अखिल भारतीय अण्णाद्रमुकमध्ये नेतृत्वाचा संघर्ष उफाळला होता.

पक्षफुटीच्या आणि बंडखोरीच्या या राजकीय घडामोडींमागे काही कारणांचे समान धागे दिसतात. व्यक्तिकेंद्रित नेतृत्वातून निर्माण होणाऱ्या वारसा हक्काचा वाद आणि सत्तेच्या वाटपातील अन्य नेत्यांचा वाटा अशीच काही कारणे बंड आणि फाटाफुटीस कारणीभूत ठरतात असे दिसते. तरीही फूट पडल्यावर किंवा बंड उफाळल्यानंतर त्याचे खापर भाजपावर फोडण्याचा महाराष्ट्रातून सुरू झालेला पायंडा आता थेट पश्चिम बंगालपर्यंत पोहोचला आहे. ममता बॅनर्जी यांनी तेच करण्यास सुरुवात केली असली, तरी त्या जेव्हा पराभवाची मीमांसा करतील आणि पक्षांतर्गत नाराजीची कारणे शोधण्याकरिता चिंतन करतील, तेव्हा त्यांना प्रामाणिकपणे पक्षसंघटनेतील बाबींचाच विचार करावा लागेल. पक्षांतर्गत असंतोष, लोकशाही प्रक्रियेचा अवलंब, नेतृत्वावरील विश्वास टिकविण्याची शैली यामध्ये त्यांना याची बरीचशी उत्तरे सापडतील. भाजपावर आरोप करणे हे राजकीयदृष्ट्या सोयीचे स्पष्टीकरण असू शकते; परंतु ते संपूर्ण सत्य नसते, हे वास्तवही त्यांना स्वीकारावे लागेल. अनेकदा फुटीची कारणे पक्षाच्या घरातच दडलेली असतात. त्यामुळे तृणमूल काँग्रेसमधील फुटीकडे केवळ पश्चिम बंगालमधील एक राजकीय घटना एवढ्याच नजरेने पाहता येणार नाही. भारतीय प्रादेशिक पक्षांतील संघटनात्मक लोकशाहीचा अभाव ही समस्या यातून पुन्हा उघड झाली आहे. कोणताही प्रादेशिक पक्ष जोपर्यंत एका व्यक्तीभोवती केंद्रित झालेला असेल, तोपर्यंत फूट, बंड, गटबाजी आणि उत्तराधिकारी संघर्ष हे अटळ राहतील.

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# भाडे करार करताना कोणता पर्याय योग्य?

आजच्या काळात घर, फ्लॅट, कार्यालय, दुकान, गोडाऊन, औद्योगिक जागा किंवा व्यावसायिक मालमत्ता भाड्याने देताना किंवा घेताना 'भाडे करार' हा शब्द सहजपणे वापरला जातो. अनेक वेळा मालक, भाडेकरू आणि अगदी काही व्यवहारांमध्ये मध्यस्थ रजा आणि परवाना, भाडेपट्टा आणि भाडे करार या संज्ञा एकाच अर्थाने वापरताना दिसतात. प्रत्यक्षात या तिन्ही संकल्पनांमध्ये कायदेशीर, आर्थिक आणि व्यावहारिक दृष्टिकोनातून मोठा फरक आहे.

आज अनेक मालमत्ता वाद, ताब्याचे प्रश्न, कर संबंधित अडचणी, स्टॅम्प ड्युटीचे विवाद आणि न्यायालयीन प्रकरणे केवळ चुकीचा करार निवडल्यामुळे निर्माण होतात. त्यामुळे 'भाडे करार' करणे हा फक्त दस्तऐवज तयार करण्याचा विषय नसून भविष्यातील जोखीम व्यवस्थापनाचा विषय आहे. सर्वात आधी रजा आणि परवाना करार समजून घेणे आवश्यक आहे. हा असा करार आहे ज्यामध्ये मालक (परवानाधारक) दुसऱ्या व्यक्तीस (परवानाधारक) मालमत्तेचा वापर करण्याची मर्यादित परवानगी देतो. येथे मालमत्तेवर कोणताही मालकी हक्क किंवा हितसंबंध निर्माण होत नाही. म्हणजेच, वापरण्याचा अधिकार दिला जातो; परंतु मालकी, नियंत्रण आणि अंतिम अधिकार मालकाकडेच राहतात. यामुळेच महाराष्ट्रात निवासी फ्लॅट, छोटे कार्यालय, दुकाने, सर्व्हिस अपार्टमेंट्स, तात्पुरत्या व्यावसायिक जागा आणि आयटी ऑफिसेससाठी रजा आणि परवाना करार मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. विशेषतः भविष्यात जागा परत मिळविणे तुलनेने सोपे व्हावे, यासाठी अनेक मालक हा पर्याय पसंत करतात.

अनेकांना एक मोठा गैरसमज असतो की, रजा आणि परवाना करार फक्त ११ महिन्यांसाठीच करता येतो. प्रत्यक्षात कायद्यात अशी कोणतीही अट नाही. ११ महिने हा केवळ बाजारातील प्रघात आहे. व्यवहाराच्या गरजेनुसार १ महिना, २ वर्षे, ३ वर्षे किंवा त्याहून अधिक कालावधीचे रजा आणि परवाना करार पूर्णपणे वैध असू शकतात. मात्र, कालावधी वाढत जाईल तशी मसुदा तयार करणे अधिक मजबूत असणे आवश्यक ठरते.

दुसरीकडे लीज डीड हा केवळ वापराचा करार नसून तो मालमत्तेतील काही प्रमाणात हितसंबंध (मालमत्तेचे व्याज) निर्माण करू शकतो. लीजमध्ये पट्टेदारला अनेक वेळा अनन्य ताबा मिळतो. यामुळे लीज हे लायसन्सपेक्षा अधिक मजबूत हक्क निर्माण करणारे साधन ठरते. म्हणूनच औद्योगिक युनिट्स, कारखाने, गोडाऊन, हॉस्पिटल्स, शैक्षणिक संस्था, मोठ्या व्यावसायिक जागा किंवा दीर्घकालीन वापरासाठी लीज अधिक प्रचलित आहे.



अनेक वेळा ९ वर्षे, २९ वर्षे, ६० वर्षे किंवा ९९ वर्षांच्या लीजदेखील पाहायला मिळतात.

सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, रजा आणि परवानामध्ये वापरण्याची परवानगी दिली जाते; तर लीजमध्ये काही प्रमाणात ताबा आणि हक्क निर्माण होऊ शकतात. म्हणूनच भविष्यात जागा रिकामी करून घेणे, नूतनीकरणाचे हक्क, हस्तांतरण किंवा सबलेटिंग यासारखे मुद्दे लीजमध्ये अधिक महत्त्वाचे ठरतात.

याठिकाणी 'भाडे करार' या शब्दाबद्दल स्पष्टता आवश्यक आहे. अनेकांना भाडे करार हा स्वतंत्र कायदेशीर प्रकार वाटतो. प्रत्यक्षात भाडे करार हा फक्त सामान्य व्यवहारातील शब्द आहे. अनेक वेळा रजा आणि परवानाला भाडे करार म्हटले जाते. काही ठिकाणी लीजला त्याच नावाने ओळखले जाते. त्यामुळे दस्तऐवजाचे नाव न पाहता त्यातील कलम रचना समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते.नोंदणी हा आणखी एक महत्त्वाचा विषय आहे. अनेक वेळा खर्च वाचवण्यासाठी किंवा घाईत लोक नोंदणी टाळतात. मात्र, भविष्यात वाद निर्माण झाल्यास नोंदणीकृत करार मोठा आधार ठरतो. नोंदणीमुळे कराराचा पुरावा मजबूत होतो, न्यायालयीन प्रक्रियेत मदत मिळते, पोलिस पडताळणी सुलभ होते आणि ताब्याचे प्रश्न सोडविणे तुलनेने सोपे जाते. आजकाल रजा आणि परवाना कराराची ऑनलाईन नोंदणी मोठ्या प्रमाणावर सुरू झाले आहे. मसुदा तयार करणे, आधार पडताळणी, बायोमेट्रिक प्रक्रिया आणि नोंदणी ही प्रक्रिया अनेकदा घरबसल्या पूर्ण करता येते. त्यामुळे अनुपालन करणे पूर्वीपेक्षा अधिक सोपे झाले आहे.

भाडे करार करताना कर परिणामदेखील दुर्लक्षित करता येत नाहीत. अनेकांना वाटते की भाडे व्यवहार म्हणजे फक्त मासिक भाडे आणि डिपॉझिट. प्रत्यक्षात घराच्या मालमत्तेच्या उत्पन्नावर आयकर लागू होऊ शकतो, व्यावसायिक मालमत्तावर जीएसटीचे परिणाम येऊ शकतात, काही व्यवहारांमध्ये टीडीएस लागू होऊ शकतो आणि सुरक्षा ठेवचे वेगळे कर परिणाम असू शकतात. विशेषतः कंपन्या, भागीदारी संस्था किंवा मोठे व्यावसायिक व्यवहार करताना अनुपालन आवश्यकता वाढू शकते.

व्यवहारात आणखी एक मोठी चूक म्हणजे इंटरनेटवरील सामान्य स्वरूप वापरणे. प्रत्येक व्यवहार वेगळा असतो. म्हणून मालमत्तेचे वर्णन, अनामत रकमेच्या अटी, लॉक-इन कालावधी, वाढीव दराचे कलम, सूचना कालावधी, समाप्तीचे अधिकार, देखभालीची जबाबदारी, सुविधा, नूतनीकरणाच्या अटी आणि डिफॉल्ट क्लॉजेस यांसारख्या तरतुदी काळजीपूर्वक मसुदा करणे अत्यंत आवश्यक आहे. समजा एखादा व्यक्ती ११ महिन्यांसाठी निवासी फ्लॅट देत असेल तर रजा आणि परवाना हा पर्याय योग्य ठरू शकतो.

परंतु जर एखादे गोदाम १५ वर्षांसाठी वापरासाठी देत असेल तर लीज अधिक योग्य ठरू शकते. त्याचप्रमाणे हॉस्पिटल, शाळा किंवा उद्योगासाठी दीर्घकालीन जागा देताना लीज स्ट्रक्चर अधिक सुरक्षित मानली जाते. शेवटी, भाडे करार हा केवळ भाडे ठरविणारा दस्तऐवज नसून भविष्यातील आर्थिक, कायदेशीर श मालमत्तासंबंधित जोखमींपासून संरक्षण देणारी व्यवस्था आहे. रजा-परवाना आणि लीज यातील फरक समजून घेतल्यास भविष्यातील वाद, आर्थिक नुकसान आणि अनावश्यक न्यायालयीन प्रक्रिया मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतात. योग्य मसुदा तयार करणे, योग्य नोंदणी आणि व्यवहाराला अनुरूप योग्य करार हाच सुरक्षित व्यवहाराचा पाया आहे.

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# ग्रेट ग्रीन वॉल अन् डेथ वॉरंट!

उन्हाळा सपाटून तापतो, पाऊस बेसुमार पडतो, हिवाळा झाला तर असह्य नाही तर तसाच निघून जातो! पाऊस मात्र आता बाराही महिने अधूनमधून पडत असतो. एकंदरीत हे सारं का होतं आहे, याचं भाषण आज ५ जून या पर्यावरण दिनापासून आपणा सर्वांना ऐकायचं आहे. आपण जे पर्यावरणाला ओरबाडतो त्याचे पाप 'याचि जन्मी याची डोळा' बघतो आहोत, अनुभवतोही आहोत. आज पर्यावरण दिन. रोहिणी नक्षत्र सुरू आहे अन् चार दिवसांनी मृग नक्षत्र लागणार आहे. रोहिणीत तुरळक पाऊस येतो आणि मृगात बरसतो. पण, सद्यस्थिती पार बदलली आहे. मृगात आला तर आला, नाही तर पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहण्याशिवाय पर्याय नसतो. एखाद वेळी मृगात बरसतो, शेतकरी पेरणी करतो; पण पाऊस गायब होतो आणि दुबार-तिबार पेरणीची वेळ येते. पुढे शेतकरी आत्महत्या वगैरे वगैरे... पण, या सर्व गोष्टीला कारणीभूत कोण ठरते आहे तर सर्वज्ञानी असलेला मनुष्य! ओरबाडण्यातून आता कोणतेही क्षेत्र सुटले नाही. सर्व ओरबाडून झालेले आहे. त्याचे प्रत्यक्ष आणि भयंकर दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. पण, त्यातून काही बोध घेईल तो मनुष्य कसला? आता हेच बघा नं, आपल्या सह्याद्री पर्वत रांगांप्रमाणे अरावली पर्वतरांग आहे. भारतातील सर्वात प्राचीन पर्वतरांग म्हणून तिची ओळख आहे. तिचा विस्तार प्रामुख्याने उत्तर-पश्चिम भारतात ७०० किलोमीटरपर्यंत आहे. अरावलीतील सर्वात उंच शिखर 'गुरुशिखर' माऊंट अबू येथे असून त्याची उंची १ हजार ७२२ मीटर म्हणजे ५ हजार ६५० आहे. ही पर्वतरांग राजस्थानातील वाळवंटाचा विस्तार पूर्वेकडे होण्यापासून थांबवण्यास मदत करतात आणि उत्तर भारताच्या पर्यावरणीय संतुलनात महत्त्वाची भूमिका बजावतात. राजस्थानपासून दिल्ली आणि पुढे गुजरातपर्यंत पसरलेली ही पर्वतरांग उत्तर भारताच्या हवामान, पर्यावरण आणि जीवन व्यवस्थेचा एक भाग आहे. अरावली पर्वतरांग आधी कुरतडली जात होती. हळूहळू ती पोखरली गेली आणि आता ती शेवटच्या घटका मोजण्यात आली असताना जनआंदोलन उभे झाले. न्यायालयानेही या पर्वतरांगांविषयी चिंता व्यक्त केली, सरकारला जाब विचारला! ती पर्वतरांग पर्यावरणाच्या दृष्टीने विचार केल्यास दिल्लीची ढाल आहे. तज्ज्ञांच्या मते या पर्वत रांगेमुळे राजस्थानातील अनेक भाग पूर्णपणे वाळवंट होण्यापासून रोखतात. या टेकड्या मान्सूनच्या वाऱ्याचा वेग कमी करतात. त्यामुळे पाऊस पडतो. आपण आता अनुभवत असलेले कडक उन्ह, रात्रीचे उष्ण वारे, दिल्लीकडे आलेले वाळूचे वादळ यासोबतही या पर्वतरांगांचा संबंध आहे. ही पर्वतरांग थारच्या वाळवंटातून येणारी धूळ आणि उष्णवारे दिल्लीकडच्या भागात येण्यासाठी थांबवते. जैववैविधतेचे रक्षण करते. येथे विविध औषधी वनस्पती आढळून येतात. एकंदरीत नैसर्गिकदृष्ट्या संपन्न या पर्वतरांगा आता नेस्तनाबूत होण्याच्या मार्गावर आल्या आहेत. अवैध वृक्षतोड अरावलीत होते आहे. काही भागात बेकायदेशीर खाणकाम व बांधकाम होते आहे. या पर्वतरांगेतून खनिज संपत्तीचे 'दोहन' सुरू असल्याने त्या पर्वतरांगा छोट्या छोट्या होत चालल्या आहेत. ऑक्टोबर २०२५ च्या अहवालानुसार राजस्थानातील १२ हजार ८१ टेकड्यांपैकी १ हजार ४२ टेकड्या (अर्थात पर्वत) १०० मीटरच्या मानांकनाला पूर्ण करते आहे. त्यामुळे न्यायालयाने चिंता व्यक्त करीत समितीची स्थापना करण्याची सूचना केली. ३१ ऑगस्ट २०२५ मध्ये त्या समितीला आपला अहवाल सादर करावा लागणार आहे. ज्या अरावली पर्वत रांगेने दिल्ली आणि उत्तर भारताचे रेतीच्या वादळापासून संरक्षण केले, तीच आता स्वतःच्या अस्तित्वासाठी धडपडत आहे. ही अरावली पर्वतरांग वाचवण्यासाठी समाजमाध्यमांवर जनआंदोलन सुरू आहे. न्यायालयातही दाद मागितली जात आहे. आंतरराष्ट्रीय वाळू कलाकार अजय रावत यांनी वाळू कलाकृतीतून अरावली पर्वतरांगेचे जनत करण्याचा संदेश दिला आहे. विदर्भात उन्हाचा पारा पुढील वर्षी ५० अंशाच्या घरात जाण्याची घंटी यावर्षी ४७.८ अंश सेल्सिअस तापमानाने वाजवली आहे. पुढील वर्षी ते अर्धे शतक पूर्ण केल्याशिवाय राहणार नाही. पर्यावरण दिनापासून पुढील काही महिने वृक्षारोपणाची चळवळ सुरू राहणार आहे. शासन, प्रशासन, सामाजिक संघटनाही सक्रिय सहभाग घेतील. फोटो काढतील, वृत्तपत्रांना फोटो आणि बातम्याही देतील. पण, लावलेली झाडं जगवण्याची जबाबदारी कोणी घेणार आहे का? बेसुमार पाऊस सहन करता येईल. हिवाळ्यात गरम कपडे घालून हिवाळ्याचा आनंद लुटता येईल. पण, उन्हाचे चटके सहन करणे शक्य नाही. ते शेकवल्याशिवाय राहत नाही. अरावली पर्वत रांगेला 'ग्रेट ग्रीन वॉल' म्हटले जाते. या ग्रेट ग्रीन वॉलला धक्का लागल्याने तिचा आता 'डेथ वॉरंट' निघाला आहे. प्रगतीच्या महामार्गावर धावताना आपण आपल्याच विनाशाचा मार्ग प्रशस्त करतो आहोत. त्या मार्गावर आता हिरवळ निर्माण करत स्वतःच्या मतलबासाठी किमान पर्यावरण शाबूत राखण्याची जबाबदारी आपण स्वीकारू या!

९८८१९०३७६५

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# संतुलित आणि दूरदर्शी करार

भारत-न्यूझीलंड मुक्त व्यापार करार (एफटीए) याकडे केवळ आयात-निर्यात सुलभ करणारा करार म्हणून पाहणे हे त्याचे महत्त्व कमी करून पाहणे ठरेल. हा करार प्रत्यक्षात भारताच्या आर्थिक विचारसरणीत झालेल्या बदलाचा तसेच जागतिक अर्थव्यवस्थेत आपले स्थान नव्याने निश्चित करण्याच्या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. विशेष म्हणजे, हा करार 'संतुलित आणि दूरदर्शी' आहे. कारण तो केवळ आजच्या व्यापाराला चालना देत नाही, तर भविष्यातील आर्थिक, तांत्रिक आणि मानवी संसाधनांच्या गरजांनाही ओळखतो. भारताने दीर्घकाळ स्वतःच्या बाजारपेठेचे संरक्षण करण्यावर भर दिला. त्यामागे ऐतिहासिक आणि सामाजिक कारणे होती. कृषिप्रधान अर्थव्यवस्था, मोठ्या प्रमाणावर असंघटित क्षेत्र आणि रोजगाराचे स्वरूप लक्षात घेतले, तर संरक्षणवाद हा काही अंशी अपरिहार्य होता; मात्र जागतिकीकरणाच्या नव्या टप्प्यात हा दृष्टिकोन बदलणे आवश्यक होते. भारत-न्यूझीलंड 'एफटीए' हा त्या बदलाचा परिपक्व आविष्कार आहे. या करारातून भारताने एक स्पष्ट संदेश दिला आहे, तो म्हणजे भारत आता जगाशी स्पर्धा करण्यास तयार आहे; पण आपल्या मूलभूत हितांचे संरक्षण करत. या कराराचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील 'कॅलिब्रेटेड ओपनिंग' म्हणजेच नियंत्रित उदारीकरण. भारताने सर्व क्षेत्रे एकदम खुली न करता, टप्प्याटप्प्याने आणि निवडक क्षेत्रांमध्येच बाजार उघडला आहे. कृषी क्षेत्रातील संवेदनशील उत्पादने, जसे की दुग्ध व्यवसाय, डाळी, साखर यांना संरक्षण दिले आहे. हे केवळ आर्थिक निर्णय नाही तर सामाजिक स्थैर्य राखण्याचा प्रयत्न आहे.

भारताने ज्या क्षेत्रांमध्ये आपली ताकद आहे, त्या क्षेत्रांसाठी दारे मोठ्या प्रमाणावर उघडून घेतली आहेत. वस्त्र-परिधान, औषधनिर्माण, अभियांत्रिकी, सेवा क्षेत्र या सर्व क्षेत्रांना न्यूझीलंडच्या बाजारात अधिक संधी मिळणार आहेत. भारताची अर्थव्यवस्था हळूहळू उत्पादन आणि सेवांच्या निर्यातीवर आधारित होत आहे. न्यूझीलंडने भारतात २० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचे आश्वासन दिले आहे. हे आश्वासन केवळ आकड्यांपुरते मर्यादित नसून त्यामागे पायाभूत सुविधा, हरित ऊर्जा आणि उत्पादन क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढविण्याचा व्यापक हेतू आहे. भारतासाठी ही गुंतवणूक अत्यंत महत्त्वाची आहे. मानवी संसाधनांच्या दृष्टीने पाहिले, तर हा करार एक नवा आदर्श निर्माण करतो. बहुतेक 'एफटीए'मध्ये वस्तू आणि सेवांवर भर दिला जातो; परंतु या करारात व्यक्तींच्या हालचालींनाही महत्त्व दिले गेले आहे. भारतीय विद्यार्थ्यांसाठी आणि व्यावसायिकांसाठी 'व्हिसा' सुलभता ही त्याची मोठी जमेची बाजू आहे. आजच्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेत मानवी भांडवल ही सर्वात मोठी ताकद आहे. त्यामुळे अशा प्रकारचे प्रावधान भविष्यातील व्यापार करारांसाठी एक नवीन दिशा ठरू शकते. या पृष्ठभूमीवर न्यूझीलंडसोबतचा करार हा केवळ द्विपक्षीय नाही, तर व्यापक प्रादेशिक रणनीतीचा भाग आहे. तथापि, या कराराच्या यशासाठी काही आव्हानेही आहेत. सर्वप्रथम, भारतीय उद्योगांनी जागतिक दर्जाची गुणवत्ता आणि कार्यक्षमता साध्य करणे आवश्यक आहे. शुल्कमुक्त प्रवेश मिळाल्याने स्पर्धा वाढेल आणि त्यात टिकण्यासाठी नवकल्पना, संशोधन आणि विकास यावर अधिक भर द्यावा लागेल. दुसरे म्हणजे, सरकारने धोरणात्मक स्थैर्य आणि सुसंगतता राखणे आवश्यक आहे. वारंवार बदलणारी धोरणे गुंतवणूकदारांचा विश्वास कमी करू शकतात. तिसरे म्हणजे, या कराराचे फायदे सर्व स्तरांपर्यंत पोहोचविणे महत्त्वाचे आहे. केवळ मोठ्या उद्योगांना नव्हे, तर लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) या संधींचा लाभ मिळायला हवा. यासाठी वित्तीय सहाय्य, तांत्रिक प्रशिक्षण आणि बाजारपेठेची माहिती उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. अन्यथा, उदारीकरणाचा फायदा काही मोजक्या घटकांपुरताच मर्यादित राहण्याचा धोका आहे.



भारत-न्यूझीलंड 'एफटीए' हा एक असा करार आहे, जो भारताच्या नव्या आर्थिक युगाचे प्रतीक आहे. तो दाखवतो की, भारत आता केवळ स्वतःच्या बाजारपेठेचे रक्षण करणारा देश राहिलेला नाही, तर तो जागतिक अर्थव्यवस्थेत सक्रिय आणि आत्मविश्वासपूर्ण भूमिका बजावू इच्छितो; मात्र हा आत्मविश्वास आंधळा नाही, तर तो वास्तववादी आणि संतुलित आहे. या संधीचे यशस्वी रूपांतर करण्यासाठी आवश्यक ते धोरणात्मक निर्णय, सुधारणा आणि अंमलबजावणी यांची जोड देणे तितकेच आवश्यक आहे. भारताच्या आर्थिक इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. या कराराचा दुसरा महत्त्वाचा स्तंभ म्हणजे गुंतवणूक. न्यूझीलंडने पुढील १५ वर्षांत भारतात २० अब्ज डॉलर्स गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. ही गुंतवणूक प्रामुख्याने पायाभूत सुविधा, उत्पादन क्षेत्र आणि नवीकरणीय ऊर्जा यामध्ये होणार आहे. भारतासाठी ही मोठी संधी आहे. कारण या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर भांडवल, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन कौशल्याची गरज आहे. परकीय गुंतवणुकीमुळे रोजगारनिर्मिती, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि उत्पादन क्षमता वाढीस मदत होईल. यात एक महत्त्वाची तरतूद म्हणजे 'रीबॅलन्सिंग क्लॉज.' ठरवलेली गुंतवणूक प्रत्यक्षात आली नाही, तर भारताला सुधारात्मक उपाययोजना करण्याचा अधिकार असेल. ही तरतूद भारताच्या हितसुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. अनेकदा मोठ्या गुंतवणुकीच्या घोषणा केल्या जातात; पण प्रत्यक्षात त्या पूर्ण होत नाहीत. या पृष्ठभूमीवर हा संरक्षणात्मक उपाय योग्य म्हणावा लागेल. मानवी संसाधनांच्या दृष्टीनेही हा करार अत्यंत लाभदायक आहे. भारतीय विद्यार्थ्यांसाठी न्यूझीलंडने व्हिसा मर्यादा काढून टाकली आहे. शिक्षण घेताना आठवड्याला २० तास काम करण्याची आणि शिक्षणानंतर चार वर्षांपर्यंत राहण्याची परवानगी देण्यात आली आहे. हे पाऊल भारतीय तरुणांसाठी मोठी संधी निर्माण करणारे आहे. परदेशी शिक्षण, कामाचा अनुभव आणि जागतिक दृष्टिकोन या तिन्ही गोष्टी एकत्र मिळण्याची शक्यता यामुळे वाढेल. तसेच आयटी, आरोग्यसेवा आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील व्यावसायिकांसाठी पाच हजार विशेष व्हिसांची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय योग प्रशिक्षक, आयुष चिकित्सक, भारतीय शेफ आणि संगीत शिक्षक यांसारख्या विशिष्ट क्षेत्रांनाही संधी दिली आहे. यामुळे केवळ आर्थिक नव्हे, तर सांस्कृतिक देवाणघेवाणही वाढेल. 'पीपल-टू-पीपल' आणि 'बिझनेस-टू-बिझनेस' संबंध अधिक मजबूत होतील. रणनीतिक दृष्टिकोनातून पाहिले तर, न्यूझीलंड हा भारतासाठी ओशियानिया आणि प्रशांत प्रदेशातील प्रवेशद्वार ठरू शकतो. या भागात भारताची उपस्थिती अद्याप मर्यादित आहे. या करारामुळे त्या प्रदेशात भारताची आर्थिक आणि राजनैतिक उपस्थिती वाढेल. जागतिक पुरवठा साखळ्यांमध्ये भारताचे स्थान अधिक बळकट होईल.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

### वसुलीत भेदभाव नको

'लाडकी बहीण झालेले पुरुष अडकणार' ही बातमी वाचली. इंग्रजीमध्ये एक म्हण आहे. ...तुम्ही सर्व लोकांना, सर्वकाळ समाधानी ठेवू शकत नाही! जनतेला काहीही कष्ट न करता विनाश्रम, घरपोच पैसा पुरवणाऱ्या लाडकी बहीणसारख्या तत्सम सरकारी योजना राज्याला आर्थिक दिवाळखोरीकडे नेणाऱ्या आहेत, हे पाचवीत शिकणारा विद्यार्थीही सांगू शकतो. त्यातही सरकारी योजनांचा गैरफायदा घेण्यासाठी लागणारी अफाट बुद्धी परमेश्वराने माणसाला दिली आहे; यात महिलाही मागे नाहीत. दुसरे म्हणजे महिलांना अधिकार, हक्क देताना सरसकट सगळे पुरुष म्हणजे नरपशू आणि सरसकट सगळ्या महिला म्हणजे गाई, असा अजब समज समाजात दृढ होताना दिसतो आहे. अशा प्रकारच्या कोणत्याही फुकटचा फायदा देणाऱ्या योजना सुरू करण्यापूर्वी, पात्र लोकांनाच त्या योजनेचा लाभ होईल याची खात्री करणे, हे सरकारचे कर्तव्य होते. आता अपात्र पुरुषांकडून वसुली करताना, अपात्र महिलांकडून वसुली होईल का?

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### उदासीनता टाळा, झाडे लावा, पर्यावरण वाचवा!



ती बोलत नाही. तक्रार करत नाही. आपण तिची झाडं तोडतो, नद्या घाण करतो, डोंगर पोखरतो... तरीही ती पोटाला धान्य देते, श्वासाला हवा देते. ती आहे आपली निसर्ग देवता. राजा रविवर्मांनी रंगवावी अशी शालिन, करुणामय भारतीय माता. लहानपणी मी आजीच्या अंगणातल्या भल्यामोठ्या आंब्याच्या झाडाखाली बसून अभ्यास करायचो. उन्हाळ्यातही त्या झाडाची भरपूर सावली थंडगार वाटायची. त्या झाडाला पाहून मन आनंदाने भरून यायचं. आज ते झाड नाही.

## वाचक पत्रे

रस्ता रुंदीकरणात भुईसपाट झालं. तेव्हा कळलं, झाड गेल्यावर सावली फक्त आठवणीत उरते. आज तिचा पदर ओढला जातोय. एसीची थंड हवा हवीय, पण झाडाची सावली नकोय. प्लॅस्टिकची पिशवी सहज फेकतोय, पण एक रोप लावायला वेळ नाही. हीच आपली उदासीनता आहे. भविष्य घडवायचं असेल तर भान ठेवावं लागेल. पर्यावरण दिन म्हणजे फक्त ५ जूनचा सेल्फी नाही. 'झाड लावलं' स्टेटस ठेवून झालं असं नाही. निसर्ग संवर्धन म्हणजे रोजची सवय पाहिजे. पिशवीऐवजी कापडी पिशवी, कचराऐवजी कंपोस्ट प्रत्येकाने आपल्या परीने भार उचलला पाहिजे. मराठीत एक म्हण आहे, 'झाड लावणारा सावलीसाठी नाही, तर पुढच्या पिढीसाठी जगतो.' खरंय. आपण लावलेलं झाड आपल्याला सावली देणार नाही कदाचित, पण आपल्या मुलाला नक्की देईल. म्हणून आज संकल्प करूया. उदासीनता टाळूया आणि झाड लावूया.

**दीपक जोशी**/अकोला, ९४२३१५०५५०

### रोजगार निर्मितीला प्राधान्य द्या

गेल्या काही वर्षांत देशातील बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. शिक्षण व गुणवत्ता असूनही तरुणांच्या हाताला काम नाही. तरुणांमध्ये नैराश्य पसरले आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत, तोच तरुण जर रोजगार नसल्याने नैराश्याच्या गर्तेत अडकला तर ती देशासाठी मोठी धोक्याची घंटा असेल. या तरुणांना नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत.

नवे रोजगार निर्माण करण्यासाठी सरकारने लवकरात लवकर उपाययोजना करायला हव्यात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार जगातील सर्वाधिक तरुण भारतात राहत आहेत. देशातील ६० टक्के लोकसंख्या ही १८ ते ४० या वयोगटातील आहे त्यातही जेन झीची संख्या अधिक आहे. त्यांच्यात प्रचंड ऊर्जा आहे. काम करण्याची धमक आहे. या तरुणांच्या हाताला रोजगार मिळाला तर त्यांच्या मेहनतीचा आणि गुणवत्तेचा उपयोग राष्ट्र उभारणीच्या कार्यात होईल.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### वाचनीय अग्रलेखातून झणझणीत ताशेरे

'मानवी जीव आणि हप्तेखोरी' हा दैनिक तरुण भारतात प्रकाशित झालेला अग्रलेख वाचला. अग्रलेखातून आपण झणझणीत ताशेरे ओढले आहेत. अभ्यासपूर्ण, चिंतनशील अग्रलेख खरोखरच मनाला स्पर्श करून गेला. विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्याचे तीन-तेरा उडाले आहेत. पोलिस यंत्रणा, राजकीय-सामाजिक पदाधिकारी पडद्याआडून अशा लोकांना मदत करीत असतात. म्हणूनच असे अवैध धंदे त्यांच्या आशीर्वादाने राजरोस चालू आहेत. आपण कितीही कायदे कठोर केले तरी काही दिवसांत पुन्हा हप्तेबाजी सुरू होऊन निर्जन ठिकाणी दारूभट्ट्या सुरू होतील. याला कुठेतरी आळा घातला पाहिजे.

**डॉ. राहुल भोसले**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...



### 'लोकनाथ' मीडिया चषकच्या लोगोचे दिमाखात अनावरण

**सोलापूर, दि. ४ जून-**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून सोलापुरातील सेवालय फाउंडेशनचे अध्यक्ष तथा शिंदेसेनेचे जिल्हाध्यक्ष मनीष काळजे यांच्या सहकार्याने पत्रकार बांधवांसाठी १२ ते १४ जून या तीन दिवसात रेल्वे मैदान येथे 'लोकनाथ' मीडिया चषक २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या लोगोचे अनावरण गुरुवारी सकाळी सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या सभागृहात दिमाखात पार पडले. यावेळी सोलापूर श्रमिक पत्रावर संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, सेवालय फाउंडेशनचे प्रमुख मनीष काळजे, डिजिटल मीडिया असोसिएशनचे अध्यक्ष विजयकुमार बाबर, पत्रकार संघाचे खजिनदार किरण बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सोलापुरात होत असलेल्या 'लोकनाथ' मीडिया स्पर्धेत सर्व वृत्तपत्रासह, डिजिटल मीडिया, श्रमिक पत्रकार संघ, राज्य मराठी पत्रकार संघ, मेट्रो सोलापूर या संघांनी सहभाग नोंदविला आहे.



### टेनिस सेंटरच्या वातानुकुलीत ड्रेसिंग रूमचे उद्घाटन

**सोलापूर, दि. ४ जून -**

वामसी लॅब्स लिमिटेड यांच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या येथील एम एस एल टी ए टेनिस सेंटरच्या वातानुकूलित ड्रेसिंग रूमचे उद्घाटन वामसी लॅब्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक एम केशव रेड्डी यांच्या हस्ते सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष राजेश दमाणी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.यावेळी राजीव देसाई, आंतरराष्ट्रीय टेनिसपटू संध्याराणी बंडगर , दिलीप बचुवार, नेव्हिल पिठावाला, उपाध्यक्ष नागराज अलवाल, प्रकल्प व्यवस्थापक प्रकाश बोगा , एच आर व्यवस्थापक स्नेहल माने आणि कंत्राटदार प्रदीप कोंडले उपस्थित होते. या उद्घाटनामुळे एमएसएलटीए टेनिस सेंटर येथील खेळाडूंसाठीच्या सुविधांमध्ये आणखी एक महत्त्वपूर्ण भर पडली आहे.



### क्रिकेट स्पर्धेत सोमनाथ भैस संघास विजेतेपद

**पिलीव ४ जून-**

माळशिरस तालुक्यातील बचेरी येथे अहिल्यादेवी जयंतीनिमित्त आयोजित क्रिकेट स्पर्धेत सोमनाथ भैस संघाने विजेतेपद पटकाविले. या स्पर्धेत १६ संघानी भाग घेतला होता. स्पर्धेचे आयोजन सचिन पडळकर, शिवराज पुकळे, उमेशभाऊ सरवदे, खंडु माने मित्र परिवार, तसेच गजराज गणेश मित्र मंडळाच्या वतीने केले होते. या स्पर्धे चे उद्घाटन उमेशभाऊ सरवदे, शिवराज पुकळे, खंडु माने, रामभाऊ गलाडे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रथम तीन संघास अनुक्रमे २१, १५ व १० हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. प्रथम क्रमांकाचे बक्षीस ठेकेदार उमेशभाऊ सरवदे, विक्रम सुळे, खंडु माने, अंकुश भैस, उमेश देशमुख, मयुर भैस यांच्या हस्ते देण्यात आले.

**प्रथम सहा संघ असे :** सोमनाथ भैस, कमीटी, कोळेगाव, आर्यन खवासपुर, शिवशक्ती, बचेरी, इटकी.

### चॅम्पियन्स मेगा टेबल टेनिस लीग शनिवारपासून सोलापुरात

**सोलापूर, दि. ४ जून -**



सोलापूर जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन व बार्शी टेबल टेनिस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच भव्य स्वरूपात ''चॅम्पियन्स मेगा टेबल टेनिस लीग २०२६'' चे ६ व ७ जून रोजी पार्क स्टेडियम, येथे संपन्न होणार आहे.

या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील आणि परिसरातील निवडक ८० गुणवंत खेळाडूंना आमंत्रित करण्यात आले असून त्यांचे १६ संघांमध्ये विभाजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे ट्रॉफी प्रायोजक डॉ. नीलकंठ पोतदार असून डॉ. नितीन तोष्णीवाल आणि डॉ. भास्कर पाटील यांनी आर्थिक सहाय्य दिले आहे. या स्पर्धे चे आयोजन सोलापूर जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष राजीव प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. स्पर्धेचे नियोजन, व्यवस्थापन आणि अंमलबजावणीची जबाबदारी सोलापूर जिल्हा टेबल संघटनेचे टेनिस सचिव झेड. एम. पुणेकर आणि गणेश स्वामी यांनी स्वीकारली असून जिल्ह्यातील सर्व टेबल टेनिस प्रेमी, पालक, प्रशिक्षक आणि क्रीडारसिकांनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# सोलापूर व धाराशिवचे कुमार व मुली संघ उपांत्य फेरीत

## ५२वी राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा : सांगली, ठाणे, पुणे, मुंबई उपनगर यांचीही उपांत्य फेरीत धडक

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. ४ जून-**

**(स्वर्गीय अजितदादा पवार क्रीडा नगरीतून) :** महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने, सोलापूर म्युचर खो-खो असोसिएशन व किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर सुरू असलेल्या ५२व्या कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीतील सामने प्रचंड रंगतदार झाले. कुमार गटात धाराशिव, पुणे, मुंबई उपनगर आणि सोलापूर, तर मुलींच्या गटात सांगली, सोलापूर, धाराशिव आणि ठाणे यांनी दमदार विजयांसह उपांत्य फेरीत धडाकेबाज प्रवेश केला.

**धाराशिवचा अहिल्यानगरवर दणदणीत विजय**

कुमार गटातील उपांत्यपूर्व सामन्यात धाराशिवने अहिल्यानगरचा ४९-२८ असा दणदणीत पराभव करत धुव्वा उडवला. हरद्या वसावे (२.२० मि. संरक्षण व ८ गुण) आणि राज जाधव (१.३० मि. संरक्षण व १० गुण) यांच्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर धाराशिवने एकहाती वर्चस्व गाजवले. पराभूत अहिल्यानगरकडून गौरव कुडले (१.१०, १.२०, मि. संरक्षण व ८ गुण) याने एकाकी झुंज दिली.

**मुंबई उपनगरची सांगलीवर मात; पुण्याची साताऱ्यावर सरशी**

दुसऱ्या सामन्यात मुंबई उपनगरने सांगलीला ४०-३६ असे नमवत उपांत्य फेरीचे तिकीट निश्चित केले. मध्यंतरातील २४-१६ ही आघाडी निर्णायक ठरली. समर्थ सावंत (२ मि. संरक्षण व १८ गुण) आणि अमेय मुर्चावडे (२, १.३० मि. संरक्षण) यांनी मुंबई उपनगरचा विजय साकारला. सांगलीकडून पार्थ देवकते (१.२० मि. संरक्षण व १० गुण) याची झुंज उल्लेखनीय ठरली.

तिसऱ्या सामन्यात पुण्याने साताऱ्याचा ४८-३६ असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. पुण्याकडून आदेश पाटील (१६ गुण) आणि अद्वैत बेतने (१.०५ मि. संरक्षण व ८ गुण) यांनी अष्टपैलू खेळ केला. साताऱ्याकडून तबरेज खान (१.२० मि. संरक्षण व १२ गुण) याची चमकदार कामगिरी संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही.

**धाराशिवची पुण्यावर एका गुणाने थरारक मात**

मुलींच्या गटातील सर्वाधिक रंगतदार सामन्यात धाराशिवने पुण्याचा २७-२६ असा अवघ्या एका गुणाने पराभव करत उपांत्य फेरीत धमाकेदार प्रवेश केला. मध्यंतरास १५-११ अशी आघाडी घेतलेल्या धाराशिवने शेवटपर्यंत संयमी खेळ करत विजय खेचून आणला. मैथिली पवार (४.५०, नाबाद १.५० मि. संरक्षण व ६ गुण) आणि सिद्धी भोसले (१.४० मि. संरक्षण व ६ गुण) या विजयाच्या प्रमुख शिल्पकार ठरल्या. पुण्याकडून श्वेता नवले (२.२०, १.२० मि. संरक्षण व ६ गुण) आणि आर्या चोरमोले (६ गुण) यांनी जोरदार प्रतिकार केला.

**स्नेहा लामकाने-अश्विनी मांडवे यांच्या खेळीने सोलापूरचा धडाका**

दुसऱ्या सामन्यात सोलापूरने नाशिकचा २९-२१ असा एक डाव राखून दणदणीत पराभव केला. स्नेहा लामकाने (३.३० मि. संरक्षण व १० गुण) आणि अश्विनी मांडवे (२ मि. संरक्षण व ८ गुण) यांच्या अष्टपैलू खेळीसमोर नाशिकचा बचाव निष्प्रभ ठरला. नाशिककडून जयश्री पवार (२.१० मि. संरक्षण व ६ गुण) हिची एकाकी झुंज अपुरी पडली.

**सांगलीने उडवला रत्नागिरीचा धुव्वा; ठाण्याचीही विजयी आगेकूच**

तिसऱ्या सामन्यात सांगलीने रत्नागिरीचा २९-१२ असा एक डाव राखून धुव्वा उडवला. विद्या तामखेडे (१.३० मि. संरक्षण व ६ गुण) आणि धनश्री तामखेडे (४.१० मि. संरक्षण व २ गुण) यांनी सांगलीचा विजय साकारला. रत्नागिरीकडून आर्या डोरलीकर (२.२० मि. संरक्षण व नाबाद १ मि. संरक्षण) हिने झुंज दिली.

चौथ्या सामन्यात ठाण्याने साताऱ्यावर ३३-२० अशी ५.५० मिनिटे राखून प्रभावी मात केली. धनश्री कंक (२.५० मि. संरक्षण व १२ गुण) आणि प्रणिती




जगदाळे (२, नाबाद १.१० मि. संरक्षण) यांनी ठाण्याच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. साताऱ्याकडून अक्षरा सोळुंखे (१.२० मि. संरक्षण व ८ गुण) हिची कामगिरी उल्लेखनीय ठरली.

**असे होणार उपांत्य सामने :**

कुमार: धाराशिव वि. पुणे व मुंबई उपनगर वि सोलापूर.

मुली : सांगली वि. सोलापूर व धाराशिव वि ठाणे.

**ड्रीम रनच्या जोरावर सोलापूरने ठाण्याला रोखले**

कुमार गटातील सर्वाधिक चुरशीच्या सामन्यात सोलापूरने ठाण्याचा ४२-४० असा २ गुणांनी निसटता पराभव केला. मध्यंतरास दोन्ही संघ २०-२० अशा बरोबरीत होते. मात्र मध्यंतरापूर्वी आणि अंतिम डावात मिळालेल्या प्रत्येकी एका ड्रीम रनमुळे सोलापूरच्या विजयाचा पाया रचला गेला. सोलापूरकडून अकबर शेख (८ गुण), रोहन मोरे (१.२० मि. संरक्षण व ६ गुण), सिद्धार्थ माने देशमुख (१ मि. संरक्षण व ६ गुण) आणि अभय गवळी (१ मि. संरक्षण व ६ गुण) यांनी मोलाची कामगिरी बजावली. ठाण्याकडून विनायक भांगे (१६ गुण) आणि ओंकार सावंत (२ मि. संरक्षण व २ गुण) यांनी कडवी झुंज दिली; मात्र ती अपुरी ठरली.

**काय आहे ड्रीम रन**

तीन खेळाडूंची एक तुकडी मैदानात संरक्षणासाठी जात असते. ही तुकडी जर ३ मिनिटे मैदानात टिकून राहिली तर संरक्षण करणाऱ्या संघास १ ड्रीम रन मिळतो. जर तीच तुकडी तीन मिनिटानंतर परत एक मिनिट पळाली तर अजून एक ड्रीम रन या पद्धतीत खेळ पुढे चालतो. अशा पद्धतीने सोलापूरला मध्यंतरास एक व मध्यंतरानंतरच्या अंतिम डावात एक ड्रीम रन मिळाला.



## खुशी रॉयल संघास विजेतेपद

### हवेरी येथील ऑल इंडिया भावसार समाज क्रिकेट स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. ४ जून -**

हवेरी येथे नुकत्याच झालेल्या ऑल इंडिया भावसार समाज क्रिकेट टूर्नामेंटमध्ये येथील खुशी रॉयल भावसार क्रिकेट संघाने विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात बलाढ्य बिग ब्रदर, बल्लारी संघाचा पराभव करून खुशी रॉयल संघाने मानाची ट्रॉफी आपल्या नावावर केली.

संघाचा कर्णधार संकेत गर्जे यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली संपूर्ण स्पर्धेत संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. संघातील खेळाडू प्रतीक भावसार याने संपूर्ण स्पर्धेतील दमदार कामगिरीच्या जोरावर 'मॅन ऑफ द सिरीज' पुरस्कार पटकावला, तर शुभम आंबेकर याला 'उत्कृष्ट फलंदाज' हा सन्मान प्राप्त झाला. यावेळी भावसार व्हिजन सोलापूर सेंट्रलचे सदस्य अश्विन डोईजोडे यांनी संघाचे अभिनंदन करत खेळाडू व व्यवस्थापनाच्या मेहनतीचे कौतुक केले. तसेच आगामी स्पर्धांसाठी संघाला मनःपूर्वक शुभेच्छा देत भविष्यातही अशीच यशस्वी कामगिरी करण्याचा विश्वास व्यक्त केला.

## एम.बी. चॅलेंजरची 'पँथर'वर मात

### एन.जी. क्रिकेट अकॅडमीची स्पर्धा

### डॅनियल सौदागरचे अर्धशतक, प्रीतम शिंगे सामनावीर

**सोलापूर, दि. ३ जून**

निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी आयोजित इंटर क्लब क्रिकेट स्पर्धेत एम बी चॅलेंजर संघाने पँथर्सचा १ गडी राखून पराभव करत स्पर्धेत विजयी सुरुवात केली. डॅनियल सौदागरची अर्धशतकी खेळी आणि प्रीतम शिंगेची अष्टपैलू कामगिरी या सामन्याचे मुख्य वैशिष्ट्य ठरले.

सामन्यात पँथर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, एम बी चॅलेंजरच्या नियंत्रित गोलंदाजीसमोर पँथर्सचा डाव ३० षटकांत सर्वबाद १५० धावांवर मर्यादित राहिला. पँथर्सकडून फलंदाजीत नकुल होनमाने याने २५, आर्यन भालेराव याने १५ तर श्रीकर चव्हाण याने ११ धावा केल्या. एम बी चॅलेंजरकडून गोलंदाजी करताना प्रीतम शिंगेने १२ धावांत ३ बळी घेतले, तर सिद्धार्थ कुमशीने १७ धावांत २ बळी घेत पँथर्सच्या धावसंख्येला ब्रेक लावला.

प्रत्युत्तरादाखल १५१ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या एम बी चॅलेंजर संघाची सुरुवातही खडतर झाली. परंतु, डॅनियल सौदागरने ५४ धावांची उत्कृष्ट अर्धशतकी खेळी करत संघाचा विजय सुकर केला. त्याला जय प्रकाश (१९ धावा)



आणि तनुष नाईक (१४ धावा) यांनी उपयुक्त साथ दिली. एनजीसीए पँथर्सच्या कबीर कीर्तीकरने अवघ्या ४ धावांत ३ बळी आणि शांभवी शिंदकरने २२ धावांत २ बळी घेत सामन्यात चांगलीच रंगत निर्माण केली होती. अखेर एम बी चॅलेंजरने २७.२ षटकांत ९ गड्यांच्या मोबदल्यात १५१ धावा करत १ गड्याने थरारक विजय साकारला. उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रीतम शिंगेला सामनावीर आणि उत्कृष्ट गोलंदाज म्हणून गौरवण्यात आले, तर डॅनियल सौदागरला उत्कृष्ट फलंदाजचा पुरस्कार मिळाला. या सामन्यासाठी पंच म्हणून प्रवीण कुलकर्णी व साकिब सय्यद यांनी काम पाहिले. तर गुणलेखक आणि समालोचक म्हणून वीरभद्र कोळी यांनी जबाबदारी सांभाळली.

## मॉडेल क्रिकेट ॲकॅडमी व केपीसीए संघांचे विजय



### ७९ वी रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा

**सोलापूर, ४ जून**

येथे सुरू असलेल्या ७९ व्या रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत आज खेळवल्या गेलेल्या सामन्यांमध्ये मॉडेल क्रिकेट ॲकॅडमी आणि के पी क्रिकेट ॲकॅडमी (केपीसीए) या संघांनी आपापल्या सामन्यात विजय संपादन केले.

सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात ख्वाजा बंदेनवाज ब संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना मॉडेल क्रिकेट ॲकॅडमीने निर्धारित २० षटकांत ७ बाद १७६ धावांचा मजबूत धावसंख्या उभारली. यात विवेक अंची याने ६९ धावांची आणि सुमित येवले याने ४७ धावांची उत्कृष्ट खेळी केली. वैष्णव जावळेने १६ धावांचे योगदान दिले. ख्वाजा बंदेनवाज ब कडून गोलंदाजीत जावद आली, जावेद अहमद, रिजवान आणि रितेश वाडकर यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

१७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ख्वाजा बंदेनवाज ब संघाचा डाव १९.५ षटकांत १३४ धावांवर आटोपला. संघाकडून लखन चव्हाणने ४०, रितेश वाडकरने ३३ आणि शेख केफने २६ धावा केल्या. मॉडेल ॲकॅडमीकडून जयराज कुंमणे याने ४ षटकांत ३५ धावा देत ४ बळी घेतले. विवेक अंचीने २ बळी तर स्वराज वाले, सुमित अहिवळे आणि गौरव वाडे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. मॉडेल क्रिकेट ॲकॅडमीने हा सामना ४२ धावांनी जिंकला. उत्कृष्ट कामगिरीबद्दल विवेक अंची याला सामनावीर घोषित करण्यात आले. वरिष्ठ खेळाडू (मुंबई पोलीस/शिवाजी विद्यापीठ) सुधाकर सिद्धू यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी विक्रांत पवार, वासुदेव धोरणाल, अतुल बांदेवाडीकर व सचिन गायकवाड उपस्थित होते. या सामन्यात मोहित दिकोंडा व शुभम मुतुर यांनी पंच म्हणून तर सचिन गायकवाड यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले.

दुपारच्या सामन्यात ख्वाजा बंदेनवाज अ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी स्वीकारली. प्रथम फलंदाजी करताना के पी क्रिकेट ॲकॅडमीचा संघ २० षटकांत ११५ धावांवर सर्वबाद झाला. यात ओंकार कोरेने ३५, गौरी प्रसाद स्वामीने २५ आणि दिनेश शिंगाडेने १६ धावा केल्या. ख्वाजा बंदेनवाज अ कडून नितेश वी. याने ४ षटकांत १५ धावा देऊन ३ बळी घेतले, तर जकवानने २ आणि कासिफ अहमदने १ बळी घेतला.

प्रत्युत्तरादाखल खेळताना ख्वाजा बंदेनवाज अ चा डाव १४.१ षटकांत अवघ्या ८१ धावांत गडगडला. संघाकडून सईद जागीदारने २३, मिर्झा वसीमने १० आणि कासिफ अहमदने १० धावा केल्या. केपीसीएकडून दिनेश शिंगाडेने घातक गोलंदाजी करत ४ षटकांत १६ धावा देऊन ४ बळी घेतले. यश मंगरूळेने २, तर श्रेयस सुरवसे आणि सनी पोळ यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. के पी क्रिकेट ॲकॅडमीने या सामन्यात ३४ धावांनी विजय मिळवला. ४ बळी आणि १६ धावा करणाऱ्या दिनेश शिंगाडे याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. वरिष्ठ खेळाडू अंबादास तोरा यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान



करण्यात आला. यावेळी लियाकत शेख, अतुल बंदेवाडीकर आणि सचिन गायकवाड उपस्थित होते. या सामन्यात महेश सोनवणे व शुभम मुतुर यांनी पंच म्हणून तर सचिन गायकवाड यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले.

**आजचे सामने**

**सकाळी :** सेंट्रल रेल्वे इन्स्टिटयूट बी विरुद्ध श्री स्वामी समर्थ क्रिकेट क्लब, अक्कलकोट.

**दुपारी :** के पी सी ए विरुद्ध साऊथ सोलापूर आपटे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### गुरिंदरवीर सिंगकडे भारतीय रिले संघाचे नेतृत्व



**नवी दिल्ली :** चीनमधील शांग्यू येथे २० आणि २१ जून रोजी होणाऱ्या दुसऱ्या आशियाई रिले अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय ॲथ्लेटिक्स महासंघाने (एएफआय) २९ सदस्यीय घाची घोषणा केली आहे. पुरुषांच्या १०० मीटर शर्यतीचा राष्ट्रीय विक्रमवीर गुरिंदरवीर सिंग हा भारतीय संघाचे नेतृत्व करेल. हा संघ रिले शर्यतींच्या सर्व सहा प्रकारांमध्ये सहभागी होईल; यामध्ये पुरुषांच्या व महिलांच्या ४ बाय १०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतींचा, तसेच मिश्र ४ बाय १०० मीटर आणि मिश्र ४ बाय ४०० मीटर शर्यतींचा समावेश आहे. ही अजिंक्यपद स्पर्धा खेळाडूंना आशियाई स्तरावर (खंडीय मंचावर) आपले कौशल्य सिद्ध करण्याची एक उत्कृष्ट संधी उपलब्ध करून देईल, असे एएफआयचे अध्यक्ष बहादूर सिंग यांनी सांगितले. ■

### राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरण स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू

**नवी दिल्ली :** केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरणाच्या स्थापनेसाठी अर्ज मागविले आहेत. देशातील क्रीडा विवादांवर निर्णय व निराकरण करण्यासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा न्यायाधिकरणासाठी दोन रिक्त जागांकरिता अर्ज मागविण्यात आले असून, अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १८ जून निश्चित केली आहे. न्यायाधिकरणाच्या सदस्यत्वासाठी अर्ज मागवण्यात आले आहेत. ही निवड प्रक्रिया भारताचे सरन्यायाधीश किंवा सरन्यायाधीशांनी नियुक्त केलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील शोध-सह-निवड समितीद्वारे पार पाडली जाईल. या न्यायाधिकरणाचे मुख्यालय राष्ट्रीय राजधानी त असेल, असे सहसचिव (क्रीडा) कुणाल यांनी जारी केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे. पात्र उमेदवार हे सार्वजनिक जीवनातील प्रतिष्ठित व्यक्ती असावेत, ज्यांना क्रीडा, सार्वजनिक प्रशासन आणि कायदा या क्षेत्रांमध्ये व्यापक ज्ञान आणि अनुभव असेल, असे अधिसूचनेत म्हटले आहे. या समितीत क्रीडा सचिव आणि कायदा व न्याय मंत्रालयातील सचिवांचाही समावेश असेल.

### राष्ट्रीय प्रशिक्षक मान्यता मंडळ स्थापन करणार


**नवी दिल्ली :** देशभरातील प्रशिक्षणाच्या गुणवत्तेचे प्रमाणीकरण करण्यासाठी राष्ट्रीय प्रशिक्षक मान्यता मंडळ (एनसीएबी) स्थापन करण्याची योजना आखली जात आहे, असे क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी गुरुवारी सांगितले. प्रशिक्षणातील सुधारणांबाबत पुलेला गोपीचंद यांच्या नेतृत्वाखालील कृती दलाने काही शिफारशी केल्या असून या शिफारशींवर कार्यवाही करताना ते बोलत होते. मंत्रालयाने नियुक्त केलेल्या नऊ सदस्यीय कृती दलाने प्रशिक्षकांसाठी लक्ष्य ऑलिम्पिक पोडियम योजना (टॉप्स) आणि त्यांच्या शिक्षण, मान्यता व प्रशासनासाठी सर्वोच्च संस्था म्हणून एनसीएबीची शिफारस केली होती. ४३ पानांचा हा अहवाल जानेवारी महिन्यात क्रीडा मंत्रालयाकडे सादर करण्यात आला होता. भविष्यात आम्ही प्रशिक्षणाला क्रीडा विज्ञानाशी देखील जोडून घेऊ. सध्या क्रीडा विज्ञानाचा इष्टतम वापर होत नाही. ारण नवीन सूचनांची अंमलबजावणी करण्याबाबत प्रशिक्षकांमध्ये काहीशी अनिच्छा दिसून येते, असे मांडविया यांनी सांगितले.

### विनेश फोगाट प्रकरणावरील सुनावणी बंद

**नवी दिल्ली :** कुस्तीपटू विनेश फोगाट यांच्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या चाचण्यांमधील सहभागावरून सुरू असलेल्या वादात सर्वोच्च न्यायालयाने कुस्ती महासंघाच्या (डब्लूएफआय) याचिकेवरील सुनावणी बंद केली आहे. या प्रकरणात पुढील सुनावणीची आवश्यकता नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. डब्लूएफआयने दिल्ली उच्च न्यायालयाच्या त्या आदेशाला आव्हान दिले होते, यात विनेश फोगाटला चाचण्यांमध्ये सहभागी होण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार देत हा विषय सध्या उच्च न्यायालयाच्या स्वतंत्र खंडपीठासमोर प्रलंबित असल्याचे नमूद केले. ■

# हरिहरन-अर्जुन प्रथमच उपांत्यपूर्व फेरीत

## इंडोनेशिया ओपन



पुरुष दुहेरीच्या सामन्यात खेळताना हरिहरन अमसकरुणन व एम.आर. अर्जुन

◆ **जकार्ता, ४ जून**

येथे सुरू असलेल्या इंडोनेशिया ओपन स्पर्धेत, हरिहरन अमसकरुणन आणि एम.आर. अर्जुन या पुरुष दुहेरी जोडीने, एका गेमने पिछाडीवर असतानाही, आपल्यापेक्षा वरच्या मानांकनावर असलेल्या मलेशियाच्या ॲरॉन ताई आणि कांग खाई झिंग या जोडीचा पराभव केला. या विजयासह या भारतीय जोडीने आपल्या कारकिर्दीतील पहिल्याच वर्ल्ड टूर सुपर १००० स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

हरिहरन व अर्जुनने मलेशियाच्या या जोडीचा १६-२१, २१-१५, २१-१९ अशा गुणांनी पराभव केला. विशेष म्हणजे, याच मलेशियाच्या जोडीने ऑल इंग्लंड २०२६ स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत भारताच्या सात्त्विक-चिराग जोडीला हरवले होते.

पहिला गेम भारतीय जोडीच्या बाजूने लागला नसला तरी, दुसऱ्या गेमच्या मध्यापासून त्यांनी जोरदार पुनरागमन केले आणि सामना निर्णायक तिसऱ्या गेमपर्यंत नेला. तिसऱ्या आणि अंतिम गेममध्ये १६-१७ अशा गुणांनी पिछाडीवर असतानाही, त्यांनी पुन्हा सामन्यावर पकड मिळवली आणि अखेर ४८ मिनिटांत विजयावर शिक्कामोर्तब केले. उपांत्यपूर्व फेरीत त्यांचा सामना मलेशियाच्याच, सातवे मानांकन असलेल्या गोह झे फेई आणि नूर इझ्झुद्दीन या जोडीशी होईल.

सध्या जागतिक क्रमवारीत ३० व्या क्रमांकावर असलेल्या या भारतीय जोडीने, या वर्षाच्या सुरुवातीलाच सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. इंडिया ओपन स्पर्धेत त्यांनी जागतिक क्रमवारीत सहाव्या क्रमांकावर राहिलेल्या आणि विश्व अजिंक्यपद स्पर्धेतील पदक विजेत्या, मलेशियाच्या ओंग येव सिन आणि तेओ ई यी या जोडीचा पराभव केला होता. तसेच, २०२६ च्या थॉमस कप स्पर्धेत कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय संघाचाही ते एक भाग होते.

**रोहन-ऋत्विका पराभूत**

रोहन कपूर आणि ऋत्विका शिवानी गड्डे या जोडीला गतविजेत्या थॉम गिक्वेल डेल्फीन डेलरू या जोडीकडून ३६ मिनिटांत २१-१३, २१-१२ असा पराभव पत्करावा लागला. ◂(वृत्तसंस्था)

### सिंधूचा ॲन से यंगकडून सलग दुसऱ्यांदा पराभव



दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी.व्ही. सिंधूला, जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या ॲन से यंगकडून अवघ्या दोन आठवड्यांच्या कालावधीत दुसऱ्यांदा सलग पराभवाचा सामना करावा लागला. या पराभवामुळे गुरुवारी येथे सुरू असलेल्या इंडोनेशिया ओपन स्पर्धेतून सिंधूचे आव्हान संपुष्टात आले.

गत आठवड्यात झालेल्या सिंगापूर ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीतही याच दक्षिण कोरियन खेळाडूकडून पराभव पत्करावा लागलेल्या सिंधूने, या स्पर्धेतील अंतिम सोळाच्या फेरीत काही क्षणांसाठीच आपल्या खेळातील चमक दाखविली. अखेर तिला १७-२१, १४-२१ अशा गुणांनी पराभव स्वीकारावा लागला.

या पराभवामुळे, विद्यमान ऑलिम्पिक विजेत्या असलेल्या ॲनविरुद्ध सिंधूच्या पराभवांची मालिका सलग १० सामन्यांपर्यंत पोहोचली आहे. या कोरियन खेळाडूकडून सिंधूला अद्याप एकही विजय नोंदविता आलेला नाही. या सामन्याची सुरुवात अत्यंत अटीतटीची झाली. पहिल्या गेमच्या मध्यापर्यंत गुण १०-१० असे बरोबरीत होते; यावेळी सिंधूने आपल्या सर्वोत्तम खेळाची झलक दाखविली व काही वेळासाठी का होईना, पण कोरियन प्रतिस्पर्ध्यावर दबाव निर्माण करण्यात ती यशस्वी ठरली. ■

# कोहली वन-डे मालिकेतून बाहेर

◆ **नवी दिल्ली, ४ जून**

हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे विराट कोहलीला अफगाणिस्तानविरुद्धच्या आगामी तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतून माघार घ्यावी लागली आहे. या मालिकेत रोहित शर्माच्या



सहभागाबाबतही अनिश्चितता कायम आहे; कारण आयपीएलदरम्यान झालेल्या हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीतून तो सध्या सावरत आहे. यामुळे महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांच्या तोंडावर संघाची रचना व खेळाडूंच्या तंदुरुस्तीबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

अफगाणिस्तानविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेला १३ जून रोजी धर्मशाला येथे सुरुवात होईल, त्यानंतरचे सामने लखनौ आणि चेन्नई येथे खेळले जातील.

या दुखापतींमुळे कोहली व रोहित या दोघांच्याही विशेषतः २०२७ मधील वन-डे विश्वचषक जवळ येत असताना वन-डे क्रिकेटमधील भविष्याबाबतच्या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे.

भारतीय फलंदाजीचा सुपरस्टार विराट कोहली दुखापतीमुळे अफगाणिस्तानविरुद्धच्या आगामी वन-डे मालिकेतून बाहेर पडल्याचे गुरुवारी जाहीर करण्यात आले. तीन सामन्यांच्या या मालिकेला १३ जून रोजी धर्मशाला येथे सुरुवात होत आहे.

वयाच्या ३७ व्या वर्षीही आपल्या अजोड तंदुरुस्तीसाठी ओळखला जाणारा कोहली नुकत्याच पार पडलेल्या आयपीएलमध्ये उत्कृष्ट फॉर्ममध्ये होता. या स्पर्धेत त्याने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला सलग दुसऱ्यांदा विजेतेपद मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली. गुजरात टायटन्सविरुद्धच्या अंतिम सामन्यात त्यानेच संघासाठी विजयी धावा केल्या होत्या. ◂(वृत्तसंस्था)

### रोहित शर्माच्या सहभागाबाबत अनिश्चितता



भारताचा हा माजी कर्णधार आता केवळ एकाच प्रकारच्या (फॉर्मेटच्या) क्रिकेटमध्ये खेळत असला, तरी जगभरातील चाहत्यांसाठी तो आजही एक प्रमुख आकर्षण आहे. कोहलीची तंदुरुस्तीची मानके इतकी उच्च आहेत की, दुखापतीमुळे त्याला एखादा सामना चुकवावा लागणे ही अत्यंत दुर्मिळ घटना मानली जाते.

अफगाणिस्तानविरुद्धच्या संपूर्ण मालिकेत रोहित शर्मा उपलब्ध असेल की नाही, हे पाहणेही औत्सुक्याचे ठरेल. हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे आयपीएलमधील त्याच्या सहभागावर परिणाम झाला होता; त्यामुळेच त्याची निवड करताना तंदुरुस्तीच्या अधीन अशी अट घालण्यात आली होती.

गत वर्षी कोहली व रोहित या दोघांनीही कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यापासून, त्यांच्या वन-डे क्रिकेटमधील भविष्याबाबत जोरदार चर्चा सुरू आहेत. पुढील वन-डे विश्वचषक ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२७ मध्ये दक्षिण आफ्रिकेत होणार आहे. या स्पर्धेपर्यंत त्यांचा फॉर्म व तंदुरुस्ती कशी असेल, यावरच त्यांचा संघात समावेश होईल की नाही, हे अवलंबून असेल. अफगाणिस्तानविरुद्धचा दुसरा एकदिवसीय सामना १७ जून रोजी लखनौ येथे, तर तिसरा सामना २० जून रोजी चेन्नई येथे खेळला जाईल.

अफगाणिस्तान मालिकेचा नंतर, भारताची पुढील वन-डे मालिका इंग्लंडमध्ये असेल. आता भारत व इंग्लंडदरम्यानची ही मालिका सुरुवात १४ जुलैपासून होईल आणि ज्यात तीन सामने खेळले जातील. ■



भारत-अफगाणिस्तान कसोटी मालिकेपूर्वी, मुल्लानपूर येथे सराव सत्रादरम्यान भारतीय क्रिकेटपटू शुभमन गिल (डावीकडे) आणि ऋषभ पंत

# हर्ष दुबे पदार्पणासाठी उत्सुक

## जागेसाठी मानव सुथारशी स्पर्धा

◆ **नवी दिल्ली, ४ जून**

नवोदित डावखुरा फिरकी गोलंदाज विदर्भाचा हर्ष दुबे शनिवारपासून मुल्लानपूर येथे अफगाणिस्तानविरुद्ध सुरू होणाऱ्या एकमेव कसोटी सामन्यात कसोटी पदार्पणास उत्सुक आहे. अलीकडील देशांतर्गत कामगिरीमुळे हर्ष दुबेला अंतिम एकादशमध्ये स्थान मिळण्याची आशा आहे.

कुलदीप यादव व वॉशिंग्टन सुंदर हे अंतिम एकादशमध्ये स्थान मिळवतील अशी अपेक्षा असल्याने, पदार्पण न केलेल्या मानव सुथार आणि दुबे यांच्यात चुरस निर्माण होऊ शकते. मात्र भारताचा महान फिरकी गोलंदाज आर. अश्विन यची नजर दुबेवर आहे.

माझी नजर हर्ष दुबेवर असेल. त्याला संधी मिळेल की नाही याबद्दल मी उत्सुक आहे. संघ मानव सुथार की हर्ष दुबे यापैकी कोणाला संधी देतो हे पाहण्यासाठी आपल्याला प्रतीक्षा करावी लागेल. पण त्याच्या दमदार देशांतर्गत हंगामामुळे मला विशेषतः दुबेमध्ये रस आहे, असके अश्विन म्हणाला.

दुबेचा आयपीएल हंगामही खूप चांगला गेला. ही कामगिरी त्याच्यासाठी



फायदेशीर ठरू शकते. त्याचे पदार्पण पाहण्यासाठी मी उत्सुक आहे, असेही अश्विन म्हणाला.

दिल्ली कॅपिटल्ससाठी साधारण आयपीएलनंतर कुलदीपही चांगली कामगिरी करण्यास उत्सुक असेल. रवींद्र जडेजाच्या अनुपस्थितीत कुलदीप यादव अफगाणिस्तानविरुद्ध फिरकी आक्रमणाचे नेतृत्व करेल. तो उत्तम लय आणि आत्मविश्वासाने गोलंदाजी करीत आहे. चेंडू दोन्ही बाजूंनी वळवण्याची त्याची क्षमता आणि घरच्या मैदानावरचा अनुभव त्याला एक मोठा धोका बनवतो, असे तो म्हणाला.

वॉशिंग्टन सुंदर त्याला साहायक भूमिका बजावेल. तो अधिक बचावात्मक, चेंडूवर नियंत्रण ठेवणारा गोलंदाज आह. तो तळाच्या फळीत फलंदाजीही करू शकतो. त्याची अचूकता आणि दीर्घकाळ गोलंदाजी करण्याची क्षमता खेळपट्टीवर उपयुक्त ठरेल. या कसोटी सामन्यात भारताच्या यशासाठी या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या ठरतील, असे त्याने सांगितले.

कर्णधार शुभमन गिल परदेशातील फलंदाजीचा फॉर्म घरच्या मैदानावरही कायम ठेवेल, असे त्याला वाटते.

शुभमन गिलने इंग्लंडमध्ये शानदार मालिका खेळली. कर्णधारपद मिळाल्याबरोबरच त्याने तिथे जाऊन फलंदाजी आणि नेतृत्व या दोन्ही बाबतीत उत्कृष्ट कामगिरी केली. त्याने कठीण परिस्थितीत धावा केल्या आणि कर्णधारपदाचा दबावही परिपक्वतेने हाताळला. यातून त्याचा दर्जा आणि दीर्घकाळ फलंदाजी करण्याची क्षमता दिसून आली. ◂(वृत्तसंस्था)

## नवीन खेळाडूंना सहज करण्याचा प्रयत्न : कुलदीप

◆ **मुल्लानपूर, ४ जून**

भारतीय संघात नव्याने दाखल झालेल्या खेळाडूंना येथील वातावरणात सहज आणि आरामदायक वाटावे, यासाठी माझा प्रयत्न असतो. नवीन खेळाडूंनी माझ्याशी मोकळेपणाने बोलावे



तसेच, जेव्हा जेव्हा त्यांना आवश्यक वाटेल, तेव्हा त्यांनी माझ्या अनुभवाचा व ज्ञानाचा लाभ घ्यावा, असे ३१ वर्षीय फिरकी गोलंदाज कुलदीप यादव म्हणाला.

येथे शनिवारपासून प्रारंभ होणाऱ्या अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात कुलदीप यादव नवोदित खेळाडू मानव सुथार आणि हर्ष दुबे यांचा 'भागीदार' होण्यास उत्सुक आहे.

जेव्हा एखादा नवीन खेळाडू संघात सामील होतो, तेव्हा तुमचे काम असते त्याला तिथे सहज वाटावे असे वातावरण निर्माण करणे. त्या खेळाडूने तुमच्याकडे एक भागीदार म्हणून पाहावे, अशी इच्छा असते. जर त्याला काही अडचण असेल, तर त्याने तुमच्याशी मोकळेपणाने बोलावे असे त्याला वाटले पाहिजे आणि तुम्ही त्याला पाठिंबा देण्यासाठी सदैव तत्पर असले पाहिजे, असे कुलदीपने सांगितले.

सध्या, दोन-तीन तरुण खेळाडूंबरोबर माझे खूप चांगले सख्य जमले आहे. ते आसपास असताना मला खूप छान वाटते, असेही कुलदीप म्हणाला. ◂(वृत्तसंस्था)

# आशियाई १५ व २० वर्षांखालील कुस्ती स्पर्धेसाठी भारतीय संघांची घोषणा

◆ **नवी दिल्ली, ४ जून**

नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी स्टेडियमवर पार पडलेल्या निवड चाचण्यांनंतर, भारतीय कुस्ती महासंघाने थायलंडमधील पटाया येथे होणाऱ्या आगामी आशियाई कुस्ती स्पर्धेसाठी देशाचे १५ वर्षांखालील आणि २० वर्षांखालील संघ निश्चित केले आहेत.

पुरुष फ्रीस्टाईल, ग्रीको-रोमन आणि महिला कुस्ती या विभागांमध्ये घेण्यात आलेल्या या चाचण्यांमध्ये, देशभरातील विविध राज्ये आणि प्रशिक्षण केंद्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या कुस्तीपटूंनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. निवडलेले खेळाडू या खंडीय स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करतील; त्यानंतर, आपली तांत्रिक, रणनीतिक आणि शारीरिक तयारी अधिक भक्कम करण्यासाठी ते एका राष्ट्रीय सराव शिबिरात सहभागी होतील.

ही निवड प्रक्रिया भविष्यासाठी कुस्तीतील गुणवान खेळाडूंची एक मजबूत फळी निर्माण करण्यावर महासंघाने दिलेल्या भरचे प्रतिबिंब आहे. भारतीय कुस्ती महासंघ युवा प्रतिभेला जोपासण्यासाठी कटिबद्ध आहे आणि इंदिरा गांधी स्टेडियमवर कुस्तीपटूंनी दाखवलेला खेळाचा दर्जा आमच्या तळागाळातील उपक्रमांना दुजोरा देतो. आम्ही १५ आणि २० या दोन्ही गटांमध्ये अत्यंत सक्षम संघांची निवड केली आहे. मी निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे अभिनंदन करतो, असे भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष अध्यक्ष संजय सिंह म्हणाले.

२० महिला गटात, परवीन (५० किलो), मुस्का (५३ किलो), काजल (५५ किलो), सविता (६२ किलो) आणि मानसी लाथेर (६८ किलो) यांसारख्या कुस्तीपटूंनी आपापल्या वजनी गटात विजय मिळवला. १५ मुलींच्या गटात, समृद्धी सतीश (३३ किलो), गौरी सतीश (३९ किलो), विनाक्षी (४६ किलो) आणि दिशा शोकीन (६६ किलो) यांनी आपल्या कामगिरीने विशेष छाप पाडली. पुरुष फ्रीस्टाईल गटाच्या निवडीमध्येही, आधीच नावलौकिक मिळवलेले कनिष्ठ गटातील खेळाडू आणि नव्याने उदयास येणारे गुणवान खेळाडू यांचा सुरेख मेळ दिसून आला. पवन बालाजी धायगुडे (६५ किलो), सुमितकुमार लक्ष्मण भारस्कर (७० किलो) आणि हेवीवेट गटातील रौनक (१२५ किलो) यांनी २० वर्षांखालील (२०) संघात स्थान मिळवले; तर जतीन (३८ किलो), गौतम (४१ किलो), हर्षद केशव चेमटे (७५ किलो) आणि विवेक चौहान (८५ किलो) यांनी १५ वर्षांखालील (१५) संघात आपली जागा निश्चित केली. ग्रीको-रोमन कुस्ती प्रकारात, २० वर्षांखालील संघाचे नेतृत्व नीरज पटेल (५५ किलो), आर्यन मलिक (६३ किलो), धीरज कुमार मलिक (७७ किलो), विकास दलाल (८७ किलो) आणि हेवीवेट गटातील दिशांत (१३० किलो) यांसारखे मल्ल करतील. १५ वर्षांखालील ग्रीको-रोमन संघात रोहित अशोक माळी (४१ किलो), प्रयास धौनचक (५७ किलो), दर्पण राजू चौधरी (६२ किलो) आणि कुशल काजल (६८ किलो) यांसारख्या आशादायक नावांचा समावेश आहे. ◂(वृत्तसंस्था)

### केएस भरत निवृत्ती

**नवी दिल्ली :** यष्टीरक्षक-फलंदाज केएस भरतने गुरुवारी वयाच्या ३२ व्या वर्षी आंतरराष्ट्रीय आणि भारतीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. भरतने भारताचे प्रतिनिधित्व सात कसोटी सामन्यांमध्ये केले आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये आंध्र संघासाठी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.

भरतला सर्वप्रथम नोव्हेंबर २०१९ मध्ये भारतीय संघात स्थान मिळाले होते; परंतु कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची संधी त्याला फेब्रुवारी २०२३ मध्ये मिळाली. एका जीवघेण्या कार अपघातात झालेल्या दुखापतींमधून सावरत असलेल्या ऋषभ पंतला संघाबाहेर राहावे लागल्यामुळे भरतला ही संधी मिळाली होती. २०२१ मध्ये न्यूझीलंडविरुद्ध कानपूर येथे झालेल्या कसोटी सामन्यादरम्यान, जेव्हा वृद्धिमान साहाच्या मानेचा स्नायू दुखावला होता. ■

### अफगाणिस्तानला अधिक कसोटी सामने खेळण्याची संधी मिळावी : शाहिदी

◆ **मुल्लानपूर, ४ जून**

अफगाणिस्तान संघाला कसोटी क्रिकेटमध्ये खेळण्याच्या



अधिक संधी मिळाव्यात, अशी अपेक्षा अफगाणिस्तानचा कर्णधार हशमतुल्ला शाहिदीने व्यक्त केली.

महाराजा यादवेंद्र सिंग स्टेडियमवर आगामी शनिवारपासून भारताविरुद्ध होणाऱ्या एका कसोटी सामन्याच्या पृष्ठभूमीवर शाहिदी बोलत होता. शुभमन गिलच्या संघाविरुद्धच्या या आव्हानासाठी, त्याच्याकडे सध्या तुलनेने कमी अनुभव असलेला संघ उपलब्ध आहे. आठ वर्षांपूर्वी, बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर भारताविरुद्धच्या सामन्यासह अफगाणिस्तानने कसोटी क्रिकेटच्या विश्वात पदार्पण केले होते. त्या ऐतिहासिक प्रसंगानंतर ज्याचा शेवट जरी अफगाणिस्तानच्या एका डावाने झालेल्या दारुण पराभवात झाला असला, तरीही अफगाणिस्तानला त्यानंतर केवळ आणखी ११ पूर्ण झालेल्या कसोटी सामन्यांमध्ये खेळण्याची संधी मिळाली आहे. (२०२४ मध्ये ग्रेटर नोएडा येथे न्यूझीलंडविरुद्धचा एक सामना, यात एकही चेंडू टाकला गेला नाही, तो रद्द करण्यात आला होता. ◂(वृत्तसंस्था)

# मीरा आंद्रीयेवा अंतिम फेरीत

◆ **पॅरिस, ४ जून**



रशियन टेनिस विश्वातील या तरुण टेनिसपटू मीरा आंद्रीयेवा हिने आपली युक्रेनियन प्रतिस्पर्धी मार्टा कोस्त्युकचा ६-१, ६-३ अशा फरकाने धुव्वा उडवत, आपल्या पहिल्या ग्रँड स्लॅम स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

१९ वर्षीय ही खेळाडू २१ व्या शतकातील तिसरी सर्वात तरुण अंतिम स्पर्धक ठरली आहे. यापूर्वी कोको गॉफने २०२२ मध्ये वयाच्या अवघ्या १८ व्या वर्षी ही कामगिरी केली होती आणि २००१ मध्ये १७ वर्षीय किम क्लाइस्टर्सने हा मान मिळवला होता. या विजयासह, जानेवारीमध्ये ब्रिस्बेन येथील उपांत्यपूर्व फेरीत कोस्त्युककडून स्ट्रेट-सेट्समध्ये (एकही सेट न जिंकता) पत्करावा लागलेल्या पराभवाचा तिने वचपाही काढला. यापूर्वी ती रोलँड गॅरोस स्पर्धेच्या उपांत्य आणि उपांत्यपूर्व फेऱ्यांपर्यंत पोहोचली होती; मात्र यावेळी अंतिम फेरीत धडक मारत तिने आपल्या कामगिरीत लक्षणीय सुधारणा केली आहे. अंतिम फेरीत तिचा सामना २५ वी मानांकित डायना श्नायडर किंवा पात्रता फेरीतून आलेल्या माजा च्वालिनस्का यांच्यापैकी एकाशी होईल. ◂(वृत्तसंस्था


**फ्रेंच ओपन**

# दोन इटालियन उपांत्य फेरीत आमनेसामने

◆ **पॅरिस, ४ जून**

प्रतिष्ठेच्या फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत स्टार खेळाडू जॅनिक सिनर लवकरच स्पर्धेतून बाहेर पडला असला तरी इटालियनचे दोन खेळाडू स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आमने-सामने उभे ठाकणार आहेत. सिनर, लॉरेन्झो मुसेटी हे इटालियन खेळाडू स्पर्धेत नसले तरी फ्रेंच ओपनच्या अंतिम फेरीत एक इटालियन पुरुष खेळाडू असेल. फ्लेव्हिओ कोबोली शुक्रवारी सहकारी इटालियन खेळाडू मॅत्तेओ अर्नाल्डीविरुद्ध खेळेल. या दोन्ही खेळाडूंसाठी ही पहिली ग्रॅण्ड स्लॅम उपांत्य फेरी असेल. ही ग्रँड स्लॅमच्या इतिहासातील ही पहिलीच संपूर्ण इटालियन पुरुषांची उपांत्य फेरी असेल.

कोबोलीने फेलिक्स ऑगर-अलियासिमचा ४-६, ६-४, ६-४, ६-४ असा पराभव केला, तर



फ्लेव्हिओ कोबोली



मॅत्तेओ अर्नाल्डी

अर्नाल्डी ७-५, ५-२ ने आघाडीवर असताना, आणखी एक इटालियन खेळाडू मॅत्तेओ बेरेटिनीने दुखापतीमुळे माघार घेतल्याने अर्नाल्डीला पुढे चाल मिळाली. दुसऱ्या सेटमध्ये वैद्यकीय विश्रांतीदरम्यान बेरेटिनीवर उपचार करण्यात आले होते.

एका इटालियन पुरुषाने फ्रेंच ओपन जिंकून बरोबर ५० वर्षे झाली आहेत आणि १९७६ चे विजेते ॲड्रियानो पानाटा यांना यावर्षी स्पर्धेपूर्वी कूप दे मस्केटियर्स ट्रॉफी प्रदान करण्यास सांगितले होते.

कोबोली हा पानाटाप्रमाणेच रोममधील टेनिस क्लब पारिओली या टेनिस क्लबचा आहे. आपल्याला इटालियन टेनिससाठी आनंद झाला पाहिजे, असे कोबोली म्हणाला.मी कोबोलीसोबत पहिल्यांदा इटालियन १४ वर्षांखालील चॅम्पियनशिपमध्ये खेळलो होतो. आम्ही चांगले मित्र आहोत, असे अर्नाल्डी म्हणाला.

दुसऱ्या उपांत्य फेरीत द्वितीय मानांकित ॲलेक्झांडर झ्वेरेव्ह व २६ व्या क्रमांकावरील याकूब मेन्सिक यांची लढत होईल.

इटालियन टेनिसची भरभराट होत असली तरी, १४ व्या क्रमांकावरील कोबोली, १०४ व्या क्रमांकावरील अर्नाल्डी आणि १०५ व्या क्रमांकावरील बेरेटिनी हे इटली संघ इतक्या पुढे जाईल अशी अपेक्षा नव्हती. उपांत्य फेरीचा निकाल काहीही लागला तरीही, कोबोली पुढील आठवड्यात जागतिक क्रमवारीत पहिल्या १० खेळाडूंमध्ये ( १०) प्रथमच स्थान मिळवेल. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात मंत्री महोदयांना घालण्यात आले साकडे

**सोलापूर, दि.४ जून-**

ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात ना.सत्यजित तांबे, ना.चंद्रकांत पाटील या मंत्रीमहोदयांना महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेने एका शिष्टमंडळाद्वारे साकडे घालण्यात आले. या शिष्टमंडळात सदाशिव बेडगे, सतीश पाटील, सागर भगुरे आदींचा समावेश होता. ४० टक्के अनुदान वाढीसाठी कॅबिनेट बैठकीत मंजुरी देऊन शासन निर्णयाचा आदेश तातडीने काढण्यात यावा. ग्रंथालय अधिनियम १९६७ मध्ये काल सुसंगत सुधारणा करण्यात यावी. ग्रंथालय कर्मचारी यांचे काम सहा तास ऐवजी आठ तास करण्यात यावे. ग्रंथालय अधिनियम १९६७ मध्ये दुरुस्ती करून सार्वजनिक ग्रंथालयांतील कर्मचारी यांना किमान वेतन दरमहा त्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावे. ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनात दरवर्षी १० टक्के वाढ करण्यात यावी. केंद्र सरकारने दिलेले ४७० कोटी रुपये ग्रंथालयान समान वाटप करून ग्रंथालयाच्या खात्यात जमा करावे. सार्वजनिक ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर सन्मानाने जगता यावे यासाठी निवृत्तीवेतन देण्यात यावे. ग्रंथालयचा दर्जा/वर्ग बदल/नवीन ग्रंथालय मान्यता तातडीने आदेश काढण्यात यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### सांगोल्यात पावसाची हजेरी, नागरिकांची उकाड्यापासून सुटका

**सांगोला, दि. ४ जून-**

सांगोला शहरात गुरुवार दि.४ जून रोजी पावसाचे आगमन झाले. गेल्या काही दिवसांपासून सांगोला शहरात उन्हाचा कडाका आणि असह्य उकाडा जाणवत होता. गुरुवारी दुपारी चारच्या सुमारास अचानक वातावरणात बदल होऊन पावसाने हजेरी लावली. या पहिल्याच २० ते २५ मिनिटे झालेल्या पावसामुळे सांगोलेकरांना तीव्र उष्णतेपासून मोठा दिलासा मिळाला असून हवेत छान गारवा पसरला होता. परंतु शेतकरी राजा मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहे.

### हुलजंती रस्त्यावर मालट्रकच्या धडकेत मरवडेचा दुचाकीस्वार ठार

**सोलापूर, दि. ४ जून-**

भरधाव वेगातील ट्रक ने धडक दिल्याने एक वीस वर्षीय दुचाकी स्वार ठार झाल्याची घटना मंगळवेढा तालुक्यातील हुलजंती रस्त्यावर बुधवारी संध्याकाळी घडली. अशोक नंदकुमार जावळे (वय २२ वर्ष , रा. मरवडे ,तालुका मंगळवेढा) असे त्या मयत तरुणाचे नाव असून तो बुधवारी दुचाकीवरून निघाला असताना हुलजंती रोड येथे एका अज्ञात माल ट्रकने त्याला धडक दिली . या धडकेत तो गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडला. त्याला उपचाराकरिता एका रुग्णवाहिकेतन येथील शासकीय रुग्णालयात रात्री आठ वाजता दाखल करण्यात आले असता त्याचा उपचारादरम्यान रात्री अकरा वाजता मृत्यू झाला.

### लेह-लडाख येथे सांगोल्यातील तरुणाचा अपघाती मृत्यू

**सांगोला, दि. ४ जून-**

लेह-लडाख येथे फिरायला गेलेल्या सांगोला शहरातील तरुणाचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना बुधवार दि.३ जून रोजी घडली. याबाबत अधिक माहिती अशी, सांगोला शहरातील एखतपुर रोडवरील लिंगे वस्ती येथील पाण्याच्या टाकी जवळील रहिवासी आकाश आण्णासो जाधव (वय-३०) हा तरुण आपल्या मित्रांसोबत लेह-लडाख येथे



फिरायला गेला होता. बुधवार दि.३ जून रोजी सायंकाळी साडेपाच ते सहाच्या सुमारास त्याच्या दोन चाकी गाडीचा एका वळणावर अपघात झाला. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. त्याच्या पश्चात पत्नी, आई, वडील व एक विवाहित बहीण असा परिवार आहे. आकाश जाधव हा एक चांगला क्रिकेट खेळाडू होता. तसेच तो एकुलता एक मुलगा होता. त्याच्या निधनामुळे सांगोला शहरासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## निधन वृत्त...

### अंजना शिंदे



**माढा, दि. ४ जून-**

माढा येथील अंजना कोंडीबा शिंदे (वय ७५) यांचे बुधवार दि. ३ जून रोजी सायंकाळी ७ वाजता हृदयविकाराच्या झटक्याने उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्यावर गुरुवारी सकाळी ८ वाजता माढेश्वरी मंदिरा लगतच्या हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन विवाहित मुली, सुना, नातवंडे असा परिवार असून जिल्हा परिषद शिक्षक सोमनाथ शिंदे यांच्या त्या मातोश्री होत.

### संगव्वा पाटील



**सोलापूर, दि. ४ जून-**

शेगांव (ता. अक्कलकोट) येथील रहिवासी संगव्वा सातप्पा पाटील (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने गुरुवारी दि ४ जून रोजी दुपारी साडे बारा वाजण्याच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### भूषण शिंदे



**मोहोळ, दि. ४ जून-**

मोहोळ देवडी येथील राहवासी भूषण चंद्रकांत शिंदे (वय ३०) यांचे आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, एक भाऊ, एक बहीण असा त्याचा परिवार आहे.

# अंगणवाडी इमारतींसाठी नवा वाढीव आराखडा मंजूर

## बिगर आदिवासी क्षेत्रासाठी १८.५० लाख, आदिवासी व डोंगराळ भागासाठी २०.३५ लाख, नक्षलग्रस्त भागासाठी २४.०५ लाखांचा निधी निश्चित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जून-**

राज्यातील अंगणवाडी केंद्रांच्या इमारत बांधकामासाठी महाराष्ट्र शासनाने नवीन नमुना आराखड्यास (टाईप प्लॅन) मंजुरी देत बांधकाम खर्चात लक्षणीय वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. महिला व बाल विकास विभागाने जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, यापूर्वीचा २०१० मधील नमुना आराखडा आणि २०२२ मध्ये निश्चित करण्यात आलेले बांधकाम दर रद्द करून नवीन बेबी फ्रेंडली अंगणवाडी इमारत आराखडा लागू करण्यात आला आहे.

मुख्य वास्तुशास्त्रज्ज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी राज्यातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करून ५५.७५ चौरस मीटर (६०० चौरस फूट) बांधकाम क्षेत्रफळाचा नवीन आराखडा तयार केला आहे. या आराखड्याला शासनाने मान्यता देत सन २०२६-२७ ते २०२८-२९ या तीन आर्थिक वर्षांसाठी नवीन बांधकाम दर लागू केले आहेत.

शासन निर्णयानुसार बिगर आदिवासी क्षेत्रातील प्रत्येक अंगणवाडी केंद्राच्या बांधकामासाठी १८.५० लाख रुपये, आदिवासी व डोंगराळ भागासाठी २०.३५ लाख रुपये, नक्षलग्रस्त भागासाठी २४.०५ लाख रुपये खर्च मंजूर करण्यात आला आहे. या रकमेत इमारत बांधकामासह शौचालय, दिव्यांगांसाठी रॅम्प,





विद्युतीकरण, पाणीपुरवठा, पाणी संचय व्यवस्था, अंतर्गत व बाह्य रंगरंगोटी तसेच सर्व करांचा समावेश करण्यात आला आहे. तथापि, या शासन निर्णयापूर्वी जुन्या आराखड्यानुसार मंजूर झालेली किंवा अपूर्ण असलेली बांधकामे पूर्ण करण्यासाठी पूर्वीचेच दर लागू राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

अंगणवाडी इमारतींच्या बांधकामावेळी स्थानिक भौगोलिक रचना, तापमान, मृदेचा प्रकार आणि पर्जन्यमान यांचा विचार करून आवश्यक तांत्रिक उपाययोजना करण्याच्या सूचनाही शासनाने दिल्या आहेत.

तसेच प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी बांधकामाचे स्थळ डिनोटिफाईड क्षेत्रात येते की नाही याची खात्री करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

**बालविकास सेवांना चालना**

बालकांसाठी अधिक सुरक्षित, सुविधायुक्त आणि बालमैत्रीपूर्ण अंगणवाडी केंद्रे उभारण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. ग्रामीण व दुर्गम भागांतील बालविकास सेवांना यामुळे मोठी चालना मिळणार आहे, असे जिल्हा महिला व बालकल्याण विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी सांगितले.

### महिला बचतगटाच्या उत्पादित वस्तूंचे ९ ते ११ जूनदरम्यान प्रदर्शन

**सांगोला नगरपरिषदेचा स्तुत्य उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. ४ जून-**

महिला बचत गटांनी तयार केलेल्या दर्जेदार वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आणि महिलांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सांगोला नगरपरिषदेच्या माध्यमातून एक विशेष पाऊल उचलत दि.९ ते ११ जून या कालावधीत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे महिला बचत गटांच्या स्टॉलचे (प्रदर्शनाचे) आयोजन करण्यात आले आहे.

उपक्रमाविषयी बोलताना महिला व बाल कल्याण समिती सभापती छाया मेटकरी यांनी बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळावी आणि त्यांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळून रोजगार उपलब्ध व्हावा, याच मुख्य उद्देशाने या स्टॉलचे आयोजन केल्याचे सांगितले.

मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण करणे हे नगरपरिषदेचे उद्दिष्ट आहे. या प्रदर्शनाच्या निमित्ताने सुरू झालेला हा प्रवास इथेच थांबणार नसल्याचे सांगितले.

**नागरिकांना भेट देण्याचे नगराध्यक्षांचे आवाहन**

सांगोला शहरातील व परिसरातील सर्व नागरिकांनी, भगिनींनी प्रदर्शना मधील विविध स्टॉलला जास्तीत जास्त संख्येने भेट देऊन महिला बचत गटांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन सांगोला नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आनंदा माने यांनी केले आहे.

### 'एमआयटी' समोर दुचाकी घसरली; महिला जागीच ठार

**सोलापूर, दि. ४ जून-**

दगडावर आदळून दुचाकी घसरल्याने पाठीमागे बसलेल्या एका ४० वर्षीय महिलेचा गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाल्याची घटना केगांव येथील एमआयटी कॉलेज समोर आज गुरुवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास घडली.

पार्वती उमाकांत कोरे (वय ४० वर्ष , रा.बीबीदारफळ , ता.उत्तर सोलापूर) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे.त्या गुरुवारी सकाळी दुचाकीच्या पाठीमागे बसून बिबीदारफळ कडून सोलापूरच्या दिशेने येत होत्या. वाटेत केगाव येथील एमआयटी कॉलेजजवळ दगडावरून गेल्याने दुचाकी स्लीप झाली. यात पार्वती कोरे या मार लागून गंभीर जखमी झाल्या. त्यांना उपचारासाठी जावई शेखर पाटील यांनी येथील शासकीय रुग्णालयात सकाळी सव्वादहा वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.





### पंढरपुरात जन्म-मृत्यू दाखल्यांचे कामकाज ठप्प

**सीआरएस पोर्टलच्या तांत्रिक अडचणी; विक्रम शिरसट यांची तातडीच्या उपाययोजनांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ जून-**

केंद्र शासनाच्या सीआरएस पोर्टलवरील तांत्रिक अडचणींमुळे जन्म व मृत्यू दाखल्यांच्या नोंदणीचे कामकाज मोठ्या प्रमाणात प्रभावित झाले आहे. नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सामाजिक कार्यकर्ते विक्रम शिरसट यांनी प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

नगरपरिषदेच्या जन्म-मृत्यू नोंदणी विभागामार्फत यापूर्वी एका युजर आयडीद्वारे तीन ते चार ठिकाणी लॉगिन करून कामकाज सुरळीतपणे होत होते. मात्र २५ मे पासून एका युजरवर केवळ एकदाच लॉगिनची अट लागू केली आहे. त्यामुळे नोंदींची प्रक्रिया संथ झाली असून अनेक अर्ज प्रलंबित राहत आहेत. सध्या शालेय प्रवेश प्रक्रियेमुळे जन्म दाखल्यांची मागणी वाढली आहे. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे नागरिकांना वेळेत दाखले मिळत नसल्याने पालकांची धावपळ वाढली आहे. वारंवार सर्व्हर डाऊन होणे, पोर्टलचा वेग अत्यंत मंद तसेच काही वेळा संपूर्ण प्रणाली बंद यामुळे दैनंदिन कार्यालयीन कामकाजावरही परिणाम होत असल्याची माहिती नगरपरिषदेच्या संबंधित विभागाने दिली आहे.

समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने तोडगा काढावा आणि नागरिकांना जन्म-मृत्यू दाखले सुलभ व जलद पद्धतीने उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी विक्रम शिरसट यांनी मुख्याधिकारी आणि प्रांताधिकारी यांची भेट घेऊन केली आहे.

## पर्यावरणाबाबत खासगी कंपन्या पुढे; सरकारी यंत्रणा मागे का?

**पर्यावरण संवर्धनासाठी शासन, उद्योग आणि नागरिकांचीही भुमिका महत्वाची**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ४ जून (प्रमोद जवळकोटे)**

५ जून हा जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. पर्यावरण संवर्धनासाठी शासन, उद्योग आणि नागरिक या तिन्ही घटकांची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र प्रत्यक्षात पाहिले तर अनेक खाजगी कंपन्या पर्यावरणीय नियमांचे पालन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करताना दिसतात. त्याच्या तुलनेत अनेक ठिकाणी सरकारी यंत्रणा आणि स्थानिक स्वराज्य संस्था अपेक्षित गांभीर्याने काम करताना दिसत नाहीत, अशी नागरिकांची भावना आहे.

खाजगी कंपन्या कचरा व्यवस्थापनावर विशेष भर देतात. ओला व सुका कचरा वेगळा करणे, औद्योगिक कचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावणे, पुनर्वापर प्रकल्प राबविणे तसेच प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी विविध उपक्रम हाती घेणे, अशा उपाययोजना अनेक कंपन्यांकडून केल्या जातात. पाणी व्यवस्थापनाच्या बाबतीतही अनेक कंपन्या पुढाकार घेताना दिसतात. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारून प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर केला जातो. याशिवाय पावसाचे पाणी साठवण, भूजल पुनर्भरण प्रकल्प तसेच जलसंधारणाच्या



**जागतिक पर्यावरण दिन विशेष**

विविध उपाययोजना राबवून पाण्याचा काटेकोर वापर करण्यावर भर दिला जातो. वृक्षारोपण आणि हरित पट्टे विकसित करण्यासाठीही कंपन्या मोठ्या प्रमाणावर काम करतात. परिसरातील गावांमध्ये वृक्ष लागवड मोहिमांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न केले जातात. ऊर्जा बचतीसाठी सौरऊर्जा प्रकल्प, एलईडी प्रकाशयोजना, ऊर्जा कार्यक्षम यंत्रसामग्रीचा वापर तसेच कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी विविध तंत्रज्ञानाचा अवलंब होतो. मग सरकारी यंत्रणा मागे का? हा प्रश्न उपस्थित होतो. अनेक ठिकाणी सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे ढीग, सांडपाण्याचे प्रश्न, अपुरी स्वच्छता, बंद पडलेली सार्वजनिक शौचालये, वृक्षसंवर्धनाकडे दुर्लक्ष आणि देखभालीचा अभाव दिसून येतो.

पर्यावरण दिनी वृक्षारोपण केले जाते; मात्र त्यांचे संवर्धन कितपत होते, हा प्रश्न कायम राहतो. याचा अर्थ सर्व सरकारी विभाग निष्क्रिय आहेत किंवा सर्व खाजगी कंपन्या आदर्श आहेत, असे नाही. मात्र ज्या प्रकारे अनेक कंपन्या पर्यावरण व्यवस्थापनासाठी ठोस यंत्रणा उभारतात, त्याच प्रकारची कार्यपद्धती स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारी कार्यालयांनीही अंगीकारण्याची गरज आहे.

### थुंकल्याचा जाब विचारल्याने मारहाण

**सोलापूर, दि. ४ जून-**

गल्लीमध्ये थांबलेल्या तरुणाच्या पायाजवळ थुंकल्याचा जाब विचारल्याने झालेल्या बेदम मारहाणीत दोघे तरुण जखमी झाले. याप्रकरणी सदर बाजार पोलिस ठाण्यात चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे. शंकर, शुभम, राज आणि विकी बुऱ्हानपूरे (सर्व रा. लोधी गल्ली) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. रोहित मन्सावाले (वय २८, रा. लोधी गल्ली) यांनी फिर्याद दिली आहे. दि. ३ जून रोजी सकाळी बेडरपूल लोधी गल्ली भागात रोहितचा भाऊ शुभमाच्या पायाजवळ आरोपींनी थुंकल्याने झालेल्या वादात शुभम, रोहित यांना मारहाण केली.हवालदार गडेराव तपास करत आहेत.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**हाय-लेव्हल प्लॅटफॉर्मची तरतूद**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने डीआरएम (कामे) मध्य रेल्वे, सोलापूर खालील कामासाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवत आहेत: ई-निविदा सूचना क्रमांक: 14-2026-SrDENCo.; कामाचे नाव: 1. हरंगुळ (HGL) स्टेशन (NSG-5) येथे हाय-लेव्हल प्लॅटफॉर्मची (HL PF) तरतूद करणे 2. मुरुड (MRX), कळंब रोड (KMRD) आणि सेंद्री (SEI) स्टेशनवर हाय-लेव्हल प्लॅटफॉर्मची (HL PF) तरतूद करणे. कामाची अंदाजित किंमत: रु. 20,28,87,422.06; बयाणा रक्कम (Earnest Money): रु. 40,57,800/-; काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 (बारा) महिने; देखभाल कालावधी (Maintenance Period): 24 (चोवीस) महिने; निविदा फॉर्मची किंमत: निरंक (शून्य); www.ireps.gov.in या संकेतस्थळावर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ: 23/06/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत; www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 23/06/2026 रोजी दुपारी 15:30 वाजल्यानंतर; संकेतस्थळाचा तपशील: www.ireps.gov.in; टीप: इच्छुक निविदाधारकांना सल्ला देण्यात येतो की, या निविदे संदर्भात जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक (corrigendum) पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी www.ireps.gov.in या संकेतस्थळाला वारंवार भेट द्यावी

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे)**
**मध्य रेल्वे, सोलापूर**

DE/Sur-28

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

# शेतकऱ्यांकडून तुकाराम मुंढे यांच्या प्रतिमेला माढ्यात दुग्धाभिषेक

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.४ जून-**

अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी एफडीएचा पदभार स्वीकारल्यानंतर राज्यभरात भेसळयुक्त अन्नपदार्थ औषध व गुटखा साठ्यावर धाड टाकून संबंधित व्यक्तींना ताब्यात घेऊन कारवाई केली आहे. त्यांनी राज्यभर करत असलेल्या कारवाईचे कौतुक म्हणून माढ्यातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते शंभू साठे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी तुकाराम मुंढे यांच्या फोटोला दुग्धाभिषेक घातला आहे. खास करून भेसळयुक्त दूध व दुग्धजन्य पदार्थांवर मुंढेंनी पदभार स्वीकारल्यानंतर धडक कारवाई करत अनेकांवर कारवाई केली आहे. त्या गोष्टीचे आनंद व्यक्त करत शेतकऱ्यांनी आयएएस अधिकारी मुंढें यांचे कौतुक केले आहे.

यावेळी शेतकऱ्यांनी असाही



सवाल केला आहे की जर एक अधिकारी म्हणून तुकाराम मुंढे हे ज्या विभागात बदली केली जाईल त्या विभागातील प्रत्येकाला न्याय देण्यासाठी योग्य पद्धतीने कारवाई करत असतील तर इतर अधिकाऱ्यांना हे का जमत नाही. तसेच शासन धडाकेबाज कार्यशैली असणाऱ्या तुकाराम मुंढेंवर बदलीची कारवाई वेळोवेळी का करते. मुंढे यांच्या २१ वर्षाच्या सेवेत त्यांची जवळपास २४ वेळा बदली झालेली आहे. राज्यकर्त्यांना असे अधिकारी चालत नाही का? हा सवालही त्यांनी यावेळेस केला आहे. यावेळी शेतकऱ्यांनी मुंढें यांना अशा गोष्टींवर तुम्ही कारवाई करा आम्ही तुमच्यासोबत असल्याची घोषणाही दिल्या.

यावेळेस शंभू साठे, आबा साठे, पिंटू काशीद, सचिन करळे, बालाजी खेडकर, जितू जमदाडे, संदीप साठे, गौतम शिंदे, सचिन वाघ, सुधीर वारगड, सत्तार मुलाणी, सतीश जमदाडे, काका पाटील उपस्थित होते.

तुकाराम मुंढे यांच्याकडे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त पद आल्यापासून राज्यभर भेसळयुक्त औषध खाद्यपदार्थ तसेच दुग्धजन्य पदार्थांवर बेधडक कारवाई करण्यात येत आहे ही गोष्ट शेतकऱ्यांसाठी समाधानकारक असून शासनाने मुंढे साहेबांना राज्याच्या साखर आयुक्त पदावर बदली करून ऊस शेतकऱ्यांची होत असणारी लूट थांबवावी.

- **शंभू साठे,** सामाजिक कार्यकर्ते माढा.

### हगलूर येथे तरुणाने नशेत घेतला गळफास

**सोलापूर, दि. ४ जून-**

अज्ञात कारणावरून एका २१ वर्षीय तरुणाने दारूच्या नशेत घरातील छताच्या पंख्याला गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील हगलुर येथे बुधवारी रात्री ८ वा . च्या सुमारास घडली. धीरज संजय कांबळे (वय २३ वर्ष रा.हगलुर) असे गळफास घेतलेल्या तरुणाचे नाव आहे . त्याला फासातून सोडवून येथील शासकीय रुग्णालयात नातेवाईक लखन गायकवाड यांनी अर्धवट शुद्धीवर असताना रात्री साडेनऊ वाजता दाखल केले.

**महापारेषण**
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**भाडेतत्त्वावर वाहन मिळणेबाबत**

अउदा पॅक विभाग–३, सोलापूर येथे भाडेतत्त्वावर मारुती सुझुकी डिझायर/होन्डा अमेझ / टाटा टिगोर किंवा तत्सम वाहनाची आवश्यकता असून आमची कार्यालयीन चौकशी क्र. ३९० दि. ०४/०६/२०२६ असून इच्छुकांनी त्यांचे कोटेशन सिलबंद लिफाफ्यात दि. १२/०६/२०२६ संध्याकाळी ०५:३० वाजेपर्यंत सादर करावे. वरील निविदेबाबतची संपूर्ण माहिती **www.mahatransco.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

दुरध्वनी क. ७४४७४४०६०६.

सही/–
**कार्यकारी अभियंता**
**पॅक विभाग–३, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### जुन्या वादातून कोयत्याने हल्ला; आई-मुलगा जखमी, तिघांविरुध्द गुन्हा

**बार्शी, दि. ४ जून-**
जुन्या वादातून एकावर कोयत्याने हल्ला करुन त्याला जखमी करण्यात आल्याची घटना घडली आहे. यात फिर्यादीची आईदेखील जखमी झाली. तिच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने हिसकावून घेण्यात आले. याप्रकरणी तिघांविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.महेश दादाराव मोरे (वय-३०, रा.तावडी, ता.बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.३ जून रोजी सकाळी ९.३० वाजण्याच्या सुमारास तावडी गावातील विजय आरगडे यांच्या घरासमोरील रस्त्यावर हा प्रकार घडला. फिर्यादीची आई लता मोरे यांनी तू माझ्या पतीला घेऊन गेला होतास, ते अद्याप घरी परतले नाहीत, अशी विचारणा केल्याच्या कारणावरुन वाद निर्माण झाला. या वादातून आरोपी संजय विलास आरगडे याने महेश मोरे यांना तुला खल्लास करतो, अशी धमकी देत लोखंडी कोयत्याने हल्ला केला. विजय विलास आरगडे याने लाकडी काठीने लता मोरे यांना मारहाण केली. विलास बाबू आरगडे याने माझ्या मुलांच्या नादी लागलास तर तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीने म्हटले आहे. महेश मोरे व त्यांची आई लता मोरे यांच्यावर बार्शी येथील सुविधा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहेत. संजय विलास आरगडे, विजय विलास आरगडे व विलास बाबू आरगडे (सर्वजण रा.तावडी, ता.बार्शी) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. पोउनि घोळवे हे पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकी नेण्याच्या कारणावरुन मुलाकडून बापाला मारहाण

**सोलापूर, दि. ४ जून-**
मुलास दुचाकी घेऊन जाऊ नको असे त्याने आपल्या बापाला काठीने व हाताने मारहाण केल्याची घटना डोणगाव रोडवरील अक्षत फार्म येथे घडली. दिलीप सोमनाथ सोनवणे (वय-४९, रा.अक्षत फार्म, डोणगाव रोड, सोलापूर) असे जखमी बापाचे नाव आहे. मुलगा गौरव यास दुचाकी घेऊन जावू नको, असे म्हटल्याने त्याने रागाच्या भरात बापाला मारहाण केली. यात त्यांच्या डोळ्यावर जखम व सर्व अंगाला मुका मार लागल्याने ते उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात स्वतः दाखल झाले.

### कर्मचाऱ्याने दारुच्या नशेत केली आत्महत्या

**सोलापूर, दि.४ जून-**
येथील एका अमाईन्समध्ये काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याने दारुच्या नशेत घरासमोरील झाडाला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना तुळजापूर तालुक्यातील गंजेवाडी येथे बुधवारी रात्री १०.४५ वाजण्याच्या सुमारास घडली. अशोक ज्ञानोबा चव्हाण (वय-५०, रा.गंजेवाडी) असे गळफास घेतलेल्या कामगाराचे नाव आहे. अशोक चव्हाण हा तामलवाडी येथील एका अमईन्समध्ये बॉयलर म्हणून कामाला होते. मुलगी शितल भोपळे यांनी त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, एक मुलगा असा परिवार आहे.



### भरधाव दुचाकीच्या धडकेत ३४ वर्षीय युवकाचा मृत्यू

**बार्शी दि. ४ जून-**
बार्शी-परंडा मार्गावरील उपळाई (ठोंगे) शिवारातील हिंगणगाव पाटीजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने पादचाऱ्यास जोरदार धडक दिल्याने ३४ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. याप्रकरणी दुचाकी चालकाविरुद्ध बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महेश राजेंद्र लिमकर (वय-२०, रा.खासगाव, ता.परंडा, जि.धाराशिव) हा दुचाकी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवत असताना पायी चालत असलेल्या सलीम महमद युनुस उर्फ युसुफ शेख (वय-३४, रा.माऊली चौक, अलिपूर रोड, ता.बार्शी) यांना दुचाकीची जोरदार धडक बसली. यात सलीम शेख हे गंभीर जखमी झाले. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. पुढील तपास बार्शी तालुका ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक घोळवे करीत आहेत.



### शाळेत विक्रेत्याकडून बूट खरेदीची सक्ती

**सोलापूर, दि.४ जून-**
सोलापुरातील लिटिल फ्लावर या इंग्रजी माध्यमाच्या शाळेने तेथेच बसवलेल्या एका विक्रेत्याकडून बूट खरेदी करण्याची सक्ती केली जात आहे, असा आरोप शिवसेना उबाठाने शिक्षणाधिकारी यांच्याकडे एका पत्राद्वारे केला आहे. सदर शाळेने त्या विक्रेत्याकडून कमिशन खाऊन शाळेत बूट विक्री सुरु केली आहे. पालकांच्या खिशावर आर्थिक भुर्दंड बसत आहे. परंतु बूट घेण्यास पालक अगतिक असल्याचे दिसून येत आहे, असेही यात म्हटले आहे. या पत्रावर जिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, महानगरप्रमुख महेश धाराशिवकर यांच्या सह्या आहेत.

### चौघांना बेदम मारहाण; पाच जणांवर गुन्हा

**टेंभुर्णी, दि. ४ जून-**
मतदार यादीत आमच्याविरुद्ध तक्रार करणाऱ्या लोकांकडे का जाता? असे म्हणत पाच जणांनी मिळून एकाच कुटुंबातील चौघांना कोयता, रॉड, दगड-विटा व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. ही घटना सुर्ली, ता.माढा येथे घडली. याप्रकरणी टेंभुर्णी पोलिस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. संपत काळे (वय-५५, रा.सुर्ली) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.४ जून रोजी सकाळी ८:४५ ते ९:२५ या वेळेत त्यांच्या राहत्या घरासमोर ही घटना घडली. यावेळी फिर्यादी, त्यांची पत्नी रेखा, पुतण्या प्रताप काळे व नातू सुजित काळे हे उपस्थित होते. यातील आरोपी अमोल रावसाहेब काळे, रावसाहेब सिताराम काळे, हनुमंत सिताराम काळे, अमित हनुमंत काळे, अनिकेत हनुमंत काळे यांनी मतदार यादीच्या कारणावरून वाद घालून शिवीगाळ केली. कोयता, रॉड, दगड, विटा, हात-लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. पुतण्या प्रताप काळे यांच्या गळ्यातील दोन तोळ्याची सोन्याची चेन हिसकावून घेतली. एमएच ४५ एयु ४६४५ या चारचाकीची काच फोडली, असे फिर्यादीत म्हटले आहे.

# थकीत ऊस बिलासाठी सहप्रादेशिक साखर कार्यालयावर शेतकऱ्यांचा अर्धनग्न मोर्चा

**साखर आयुक्तांच्या आश्वासनानंतर आंदोलन मागे**

**पैसे हाती पडेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर**

**शेतकऱ्यांचे आंदोलन सुरूच राहणार**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**
थकीत ऊस बिलासाठी शेतकऱ्यांनी गुरुवार, दि.४ जून रोजी पूनम गेट ते सह प्रादेशिक साखर कार्यालय दरम्यान अर्धनग्र मार्चा काढून आंदोलन केले. यावेळी साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांच्याशी फोनद्वारे संपर्क साधून गोकूळ साखर कारखान्यांकडील थकीत बिलासाठी मुख्यमंत्र्यांकडे बैठक लावावी, अशी मागणी केली. तसे आश्वासन साखर आयुक्त कोलते यांनी दिल्यानंतर आंदोलक शेतकऱ्यांनी सह प्रादेशिक साखर कार्यालय येथील आंदोलन मागे घेतले. मात्र, जोपर्यंत बिले मिळत नाहीत, तोपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलन सुरु ठेवणार असल्याचे सांगितले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील धोत्री येथील गोकूळ साखर कारखान्यांकडील थकीत ऊसबिलासाठी धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील शेकडो शेतकरी गेल्या ११ दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलन करत आहेत. मात्र शेतकरी प्रश्न संदर्भात शासनाला घाम फुटत नसल्याने आंदोलकांनी संताप व्यक्त केला. आंदोलनाच्या अकराव्या दिवशी गुरुवारी शेतकऱ्यांनी पूनम गेट ते सह प्रादेशिक साखर कार्यालय अर्धनग्र मोर्चा काढून सह प्रादेशिक साखर कार्यालय येथे दोन तास ठिय्या मारला.

पोलीसांनी सह प्रादेशिक साखर आयुक्त कार्यालयातील प्रभारी साखर सहसंचालक आबासाहेब गावडे यांना बोलावून आंदोलकांशी चर्चा करायला लावली. त्यावेळी प्रभारी साखर सहसंचालक गावडे यांनी थेट साखर आयुक्त कोलते यांच्याशी फोनद्वारे संपर्क साधून शेतकरी आंदोलक नेता ॲड. अमोल पाटील, अरविंद घोडके, माजी पंचायत समिती विरोध पक्षनेता बाळासाहेब मोरे यांच्याशी बोलणे करुन दिले. आयुक्तांना आश्वासन दिल्यानंतर आंदोलकांनी सह प्रादेशिक साखर कार्यालय येथील आंदोलन मागे घेतले आहे. मात्र घामाचे पैसे हाती पडेपर्यंत हे शेतकरी बांधव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन करणार असल्याचीही माहिती शेतकरी नेत्यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

# आभाळी वातावरणामुळे तापमानाचा पारा ३८ अंशावर

**सोलापूर जिल्ह्याच्या काही भागात बरसल्या सरी**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**
शहर व परिसरात आज दिवसभर ढगाळ आणि ऊन असे संमिश्र वातावरण होते. या वातावरणाचा परिणाम सोलापूरच्या तापमानावर झाला होता. यामुळे आज ३८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सायंकाळच्या दरम्यान, जिल्ह्याच्या काही भागात दुपारी आणि सायंकाळी रोहिण्याच्या सरी बरसल्या.

दोन दिवसांपूर्वी सोलापूर शहरातही दमदार पाऊस झाला होता. परिणामी सकाळी आणि सायंकाळी वातावरणात गारवा निर्माण होत आहे. दिवसभर ऊन पडते आणि उकाडाही असह्य होतो. गुरुवारी जिल्ह्याच्या काही भागात रात्री उशिरापर्यंत ढगाळ वातावरण व पावसाची अधून-मधून रिमझिम सुरू होती. ढगाळ वातावरणामुळे सोलापूरच्या तापमानात घट झाली आहे. सोलापुरच्या तापमानाचा पारा सध्या ४० ते ३० अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहू लागला आहे. सध्या संमिश्र वातावरण झाले असून, कधी कडक ऊन, तर कधी ढगाळ वातावरण असे चित्र आहे.

**पेरणीसाठी मोठ्या पावसाची गरज**

सध्या रोहिण्या नक्षत्राचा पाऊस सुरू झाला आहे आणि येत्या ४ दिवसात मृग नक्षत्र चालू होणार आहे. या नक्षत्रात दमदार आणि मोठा पाऊस पडून चांगली ओल गेल्यावरच बळीराजाने खरिपाची पेरणी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे. कमी ओलीवर पेरणी केल्यास बियाणांची नीट उगवण होत नाही; यामुळे दुबार पेरणी करावी लागते, असाही सल्लाही त्यांनी दिला आहे.

## तू येथे का थांबला आहेस? असे म्हटल्याने वाद; आई व मुलाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ जून-**
तू येथे का थांबला आहेस? असे म्हटल्याने वाद होऊन एका युवकावर लोखंडी खोऱ्याने हल्ला केल्याची आणि जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याची घटना बार्शी शहरातील धस पिंपळगाव रोड परिसरात घडली. याप्रकरणी आई-मुलाविरुध्द बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याती फिर्यादी रंजित गणपत देवकर (वय-२७, रा.चोरमुले प्लॉट, धसपिंपळगाव रोड, ता.बार्शी) हे भगवंत मैदान परिसरात चायनीज गाडीवर वस्ताद म्हणून काम करतात. ३१ मे रोजी दिवसभर काम आटोपून ते रात्री घरी परतत असताना १ जून रोजी पहाटे सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास अमर पान शॉपसमोर थांबले होते.

त्यावेळी त्यांच्या ओळखीचा वैभव अविनाश बारंगुळे (रा.चोरमुले प्लॉट, बार्शी) हा तेथे आला व तू येथे का थांबला आहेस? असे विचारत शिवीगाळ करु लागला. फिर्यादीने याबाबत जाब विचारला असता आरोपीने त्यांच्याशी वाद घालत जवळील घरातून लोखंडी खोरे आणून त्यांच्या डाव्या हाताच्या करंगळीवर वार केला.




दरम्यान, आरडाओरडा ऐकून परिसरातील रंजित जाधव व नागेश कोटकर हे मध्यस्थी करण्यासाठी घटनास्थळी आले. वैभव बारंगुळे यांची आई अलका अविनाश बारंगुळे यांनी देखील शिवीगाळ करुन हाताने मारहाण केली. दोघांनीही 'तुला पुन्हा बघून घेतो' अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या मारहाणीत रंजित देवकर यांच्या डाव्या हाताच्या करंगळीला, डाव्या डोळ्याला तसेच शरीराच्या इतर भागांना दुखापत झाली. त्यांच्यावर प्रथम ग्रामीण रुग्णालय बार्शी येथे उपचार करण्यात आले. पुढील उपचारासाठी त्यांना धाराशिव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर रंजित देवकर यांनी तक्रार दाखल केली. त्यानुसार वैभव अविनाश बारंगुळे व अलका अविनाश बारंगुळे या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शहरातील ७० ते ८० टक्के नाला सफाईचे काम पूर्ण

**७४ नाल्यांचा आढावा, १९ विकास कामांना गती**

**पावसाळा सुरु होण्यापूर्वी सर्व कामे पूर्ण करा:महापौर**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जून-**
महापालिकेच्या आठही विभागीय कार्यालयांतर्गत नाला सफाई मोहिमेची सुरू आहे. शहरातील सुमारे ७० ते ८० टक्के नाला सफाई पूर्ण झाली असून उर्वरित कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. पावसाळ्यात नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कामे करावी. पावसाळा सुरू होण्यापूर्वी सर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश महापौर विनायक कोंड्याल दिले.

पावसाळ्यात शहरात पाणी साचण्याच्या समस्या टाळण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने कंबर कसली असून शहरातील ७४ नाले, प्रस्तावित १९ नाला विकास प्रकल्प आणि सुरू असलेल्या नाला सफाई कामांचा महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली सविस्तर आढावा घेण्यात आला. महानगरपालिकेच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहात झालेल्या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, नगरसेविका सौ. रोहिणी तडवळकर, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका आकुलवार, प्रकाश दिवाणजी यांच्यासह १ ते ८ विभागीय अधिकारी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील सर्व ७४ नाल्यांची सद्यस्थिती, वहन क्षमता, नाला सफाईची प्रगती आणि पावसाळ्यापूर्वी आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. याशिवाय प्रस्तावित १९ नाला विकास प्रकल्पांच्या कामांची स्थिती आणि पुढील नियोजनावरही चर्चा झाली.

महापालिकेच्या आठही विभागीय कार्यालयांतर्गत सुरू असलेल्या नाला सफाई मोहिमेची माहिती अधिकाऱ्यांनी सादर केली. त्यानुसार शहरातील सुमारे ७० ते ८० टक्के नाला सफाई पूर्ण झाली असून उर्वरित कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. पावसाळा सुरू होण्यापूर्वी सर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश महापौरांनी दिले.

पंजवाणी मार्केट, मुळेगाव नाका आणि अक्कलकोट रोडवरील मुद्रा सन सिटी परिसरात मागील पावसाळ्यात पाणी साचल्याच्या घटनांची विशेष दखल बैठकीत घेण्यात आली. या भागांतील जलनिस्सारण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

**नाला सफाईची स्थिती**

* शहरातील एकूण नाले : ७४ * प्रस्तावित नाला विकास प्रकल्प : १९ * नाला सफाई पूर्ण : ७० ते ८० टक्के * उर्वरित कामे : युद्धपातळीवर सुरू * संवेदनशील भाग : पंजवाणी मार्केट, मुळेगाव नाका, मुद्रा सन सिटी

# पाणी साचणाऱ्या भागांवर कायमस्वरुपी उपाययोजना करा

**पावसाळ्यापूर्वी महापौर कोंड्याल यांनी केली नाल्यांची पाहणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**
नवले नगर, विनायक नगर, वज्रेश्वरी नगर आणि मुद्रा सन सिटी परिसरात वारंवार उद्भवणाऱ्या पाणी साचण्याच्या समस्येवर कायम स्वरूपी तोडगा काढण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे.पावसाळ्यापूर्वी सर्व कामे पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे निर्देश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले.

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील संभाव्य पूरस्थिती टाळण्यासाठी महापौर विनायक दादा कोंड्याल यांनी गुरुवारी अक्कलकोट रोड परिसरातील नीलम नगर, नवले नगर, विनायक नगर, वज्रेश्वरी नगर तसेच मुद्रा सन सिटी परिसरातील नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीवेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगरसेवक सिद्धेश्वर कमटम, यंत्रमाग संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, नगरसेविका सारिका खजूरगी, नगर अभियंता सारिका आकूलवार, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे सुनील फुलारी, महेश येमूल, उपअभियंता प्रकाश दिवाणजी, मनोज जाधव, चिंतारे, चंद्रकांत गुंडे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. मागील पावसाळ्यात या भागांमध्ये पाणी साचल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता. याची दखल घेत महापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना राबविण्याच्या सूचना दिल्या.

पाहणीदरम्यान नाल्यांची स्वच्छता, पाण्याचा निचरा, अडथळे तसेच पावसाचे पाणी सुरळीत वाहून जाण्याच्या व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी वज्रेश्वरी नगर व मुद्रा सन सिटी परिसरातील राष्ट्रीय महामार्गालगतच्या नाल्यांचीही पाहणी करण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत पूर्ण झालेल्या व प्रस्तावित कामांचा आढावा घेत पावसाचे पाणी अडथळ्याविना वाहून जाण्यासाठी आवश्यक सुधारणा तातडीने करण्याचे आदेश देण्यात आले. महापौर कोंड्याल यांनी नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सांगत, पावसाळ्यापूर्वी सर्व आवश्यक उपाययोजना पूर्ण करून कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निर्दे




## 'ज्ञानज्योती-आस्था'च्या वतीने कीट वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जून-**
ज्ञानज्योती ग्रामीण अभिवृध्दी संस्था (बेळगावी) व आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने वंचित, बेघर, निराधार गरिबांना १०० किटस्‌चे वाटप करण्यात आले.

यामध्ये हॅन्ड वॉश, वाटिका तेल, टूथपेस्ट साबण, गुलकोप्लस, एनर्जी सॉफ्ट ड्रिंक, दंतमंजन आदी वस्तुंचा समावेश आहे.

याप्रसंगी कैलास शिरसी, विजयकुमार बिराजदार, आनंद तालिकोटी, सुहास छंचुरे, वेदांत तालिकोटी, पिंटू कस्तुरे, सुरज छंचुरे आदी उपस्थित होते.

## 'मोहरम'च्या पार्श्वभूमीवर ८ जून रोजी शांतता समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जून-**
'मोहरम'च्या पार्श्वभूमीवर सोमवार, दि.८ जून २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता पोलिस आयुक्त कार्यालयात शांतता समितीची बैठक बोलाविण्यात आली आहे. सोलापूर शहरात १७ जून ते २६ जून २०२६ या कालावधीत मोहरम उत्सव साजरा होणार आहे. यानिमित्ताने शहरातील शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अनुषंगोन ही बैठक घेण्यात येत आहे. या बैठकीस शहरातील सर्व संबंधित मान्यवर, शांतता समिती सदस्य तसेच माध्यमांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहावे, असे आवाहन पोलिस आयुक्तालयाकडून करण्यात आले आहे.

## विधानसभेचे उपाध्यक्ष बनसोडे करणार आदिला नाला परिसराची पाहणी

**आनंद चंदनशिवे यांनी वेधले होते लक्ष**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जून-**
आदिला नदी (नाला) लगतच्या परिसरात रेड व ब्ल्यू लाईनमुळे निर्माण झालेल्या समस्या आणि नागरिकांच्या अडचणींची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे हे शुक्रवार, दि.१२ जून २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता संबंधित परिसराला भेट देणार आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी या संदर्भात निवेदन सादर करून आदिला नदीलगतच्या भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे लक्ष वेधले होते. रेड व ब्ल्यू लाईनमुळे अनेक मिळकतधारकांच्या बांधकाम परवानग्या, मालमत्ता व्यवहार आणि विकासकामांवर परिणाम होत असल्याची तक्रार नागरिकांकडून सातत्याने करण्यात येत आहे.

या भेटीदरम्यान संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना आवश्यक माहिती, नकाशे व कागदपत्रांसह उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्यक्ष पाहणीनंतर संबंधित नागरिक, लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांशी चर्चा करून पुढील कार्यवाहीबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. आदिला नाला परिसरातील रेड-ब्ल्यू लाईनचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, या पाहणीनंतर नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वाशीच्या आदित्य सुकाळेची एसआरपीएफ मध्ये निवड

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.४ जून -**
धाराशिव जिल्ह्यातील वाशी येथील आदित्य सुंदर सुकाळे याची राज्य राखीव पोलीस दल (एसआरपीएफ) मध्ये निवड झाली असून, त्याच्या यशामुळे वाशी शहरासह परिसरात आनंदाचे वातावरण आहे.



सामान्य शेतकरी कुटुंबातील आदित्यने जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या बळावर हे यश मिळविले.

तो वाशी येथील सक्सेस करिअर अकॅडमीमध्ये पोलीस भरतीची तयारी करत होता. निवड झाल्यानंतर अकॅडमीच्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला.

यावेळी धीरज नलवडे, विजय माने, अजय थोरबोले व दयानंद शिंदे यांच्या हस्ते त्याचा गौरव करण्यात आला.

आदित्यच्या यशाबद्दल उपस्थितांनी त्याचे अभिनंदन करून भावी सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. त्याच्या यशामुळे परिसरातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणांना प्रेरणा मिळत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### सारोळ्यात स्व. गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन

**वाशी, ४ जून -**
वाशी तालुक्यातील सारोळा येथील गोपीनाथ मुंडे चौकात भाजपचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री तथा लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. ग्रामीण भागातील जनतेसाठी केलेले कार्य, शेतकरी व कष्टकरी वर्गासाठी दिलेला लढा तसेच राज्य व देशाच्या राजकारणातील योगदानाचे स्मरण करण्यात आले. या प्रसंगी सुनील डोईफोडे, दिनेश दराडे, सुभाष डोईफोडे, अंकुश डोईफोडे, बंटी दराडे, शिवाजी डोईफोडे, गुलाब डोईफोडे, अशोक दराडे, सुनील दराडे, वसंत मोरे, सुनील मोरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



### जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त जनजागृती

**लोहारा, ४ जून -**
जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त कॅप्री ग्लोबल, आदित्य बिर्ला कॅपिटल फाउंडेशन आणि प्राईड इंडिया स्पर्श ग्रामीण मोबाईल मेडिकल युनिट (एमएमयु) यांच्या संयुक्त विद्यमाने कराळी, हंद्राळ, करवंजी, नळवाडी, नागुर व कास्ती येथे तंबाखूविरोधी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी डॉ. युवराज हाक्के व डॉ. सुनिता चक्कारवर यांनी तंबाखू सेवनाचे आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम सांगून व्यसनमुक्त जीवनशैलीचा संदेश दिला. तसेच एमएमयु व स्पर्श ग्रामीण रुग्णालयातील उपचार व समुपदेशन सुविधांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी नागरिकांना तंबाखूमुक्तीची शपथ देण्यात आली.



### तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप

**धाराशिव, ४ जून -**
तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या निरोप समारंभात भावपूर्ण निरोप देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात जगदीश सुतार यांच्या बासरी वादनाने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील चार वर्षांच्या आठवणींना उजाळा दिला. विभागप्रमुख प्रा. सुजाता गायकवाड यांनी नवीन तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याचा संदेश दिला, तर प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. डॉ. प्रीती माने यांनी नाविन्यपूर्ण सॉफ्टवेअर विकसित करून समाजोपयोगी कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात गेट परीक्षेत यश मिळवलेल्या शेख समीर, इनोव्हेशनसाठी उत्कर्ष म्हात्रे तसेच विविध इंटर्नशिप पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हसेगावच्या संतोष राऊत यांची उप आयुक्तपदी पदोन्नती

**वाशी, ४ जून -**
कळंब तालुक्यातील हसेगाव येथील भूमिपुत्र संतोष भाऊसाहेब राऊत यांची महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागात उप आयुक्त (गट-अ) पदावर पदोन्नती झाली आहे.



याबाबतचा शासन आदेश ३ जून रोजी निर्गमित करण्यात आला. सहायक आयुक्त म्हणून कार्यरत असलेल्या राऊत यांच्या कार्यक्षमता, अनुभव व सेवाज्येष्ठतेची दखल घेत ही पदोन्नती देण्यात आली असून त्यांची मंत्री (आदिवासी विकास) कार्यालय, मंत्रालय, मुंबई येथे नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मंत्री नितेश राणे यांच्यासोबत महत्त्वाच्या प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. ग्रामीण भागातून पुढे येत राज्य प्रशासनात महत्त्वाचे स्थान मिळविल्याने हसेगाव, कळंब तालुका व धाराशिव जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे.

# आधी ५० हजार भरा; मगच कर्जमाफी

## ही कर्जमाफी नव्हे, शेतकऱ्यांची थट्टा; सरकारवर आ. कैलास पाटील यांची घणाघाती टीका



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जून -**
राज्य सरकारने दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर केल्याचा गाजावाजा केला असला, तरी प्रत्यक्षात ही योजना शेतकऱ्यांना दिलासा देणारी नसून त्यांची थट्टा करणारी असल्याची घणाघाती टीका आमदार कैलास पाटील यांनी केली आहे.

सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेल्या निवेदनात आमदार पाटील यांनी म्हटले आहे की, २०१९ मध्ये कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या ३२ लाखांहून अधिक शेतकऱ्यांवर सरकारने ५० हजार रुपयांची अट लादली आहे. ज्या शेतकऱ्यांची थकबाकी ५० हजार रुपयांपेक्षा अधिक आहे, त्यांनी प्रथम उर्वरित रक्कम स्वतः भरल्यानंतरच ५० हजार रुपयांचा लाभ मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.



ज्या शेतकऱ्याकडे कर्ज फेडण्यासाठी पैसे आहेत, त्याला कर्जमाफीची गरज काय? आणि ज्याच्याकडे पैसे नाहीत, त्याने आधी कर्ज भरायचे कसे? असा सवाल उपस्थित करत हा निर्णय म्हणजे 'बुडणाऱ्याच्या गळ्यात दगड बांधून त्यालाच पोहायला सांगण्यासारखा' असल्याची टीका त्यांनी केली.

राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांचे पीककर्ज एक लाख रुपयांपेक्षा अधिक असल्याने आधी ५० हजार भरा, मग आम्ही ५० हजार देतो ही भूमिका कर्जमाफी नसून प्रत्यक्षात कर्जवसुलीची मोहीम असल्याचा आरोप त्यांनी केला. अशा योजनेला कर्जमाफी म्हणणे म्हणजे शब्दाचाही अपमान असल्याचे ते म्हणाले.

आमदार पाटील यांनी २०१९ मधील महाविकास आघाडी सरकारच्या कर्जमाफीचा उल्लेख करत, तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली कोणत्याही अटी-शर्तींशिवाय सरसकट कर्जमाफी देण्यात आल्याचे सांगितले. त्या निर्णयामागे शेतकऱ्यांप्रती संवेदनशीलता होती, मात्र सध्याच्या सरकारच्या भूमिकेत ती दिसून येत नसल्याचा आरोप त्यांनी केला.

शेतकरी भीक मागत नसून आपल्या हक्काची मदत मागत आहे. त्यामुळे सरकारने प्रसिद्धीचा गाजावाजा थांबवून कर्जमाफीवरील सर्व अटी-शर्ती तात्काळ रद्द कराव्यात आणि पात्र शेतकऱ्यांना सरसकट, सन्मानजनक व प्रत्यक्ष लाभ देणारी कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली. अन्यथा सरकारला शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही आमदार कैलास पाटील यांनी दिला.

## तुळजाभवानी मंदिर परिसरातील चोरीच्या घटनांना आळा घालण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ जून -**
श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात वारंवार घडणाऱ्या सोन्याच्या चोरीच्या घटनांची सखोल चौकशी करून प्रभावी सुरक्षा व्यवस्था उभारावी, अशी मागणी जाणता राजा युवा मंचच्या वतीने मंदिर पोलीस चौकीतील पोलीस निरीक्षकांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, श्री तुळजाभवानी मंदिर हे महाराष्ट्रासह देशभरातील कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असून दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येथे येतात. मात्र गेल्या काही महिन्यांपासून मंदिर परिसर, दर्शन रांग व गर्दीच्या ठिकाणी भाविकांच्या गळ्यातील सोन्याच्या साखळ्या, मंगळसूत्रे तसेच इतर दागिने चोरीस जाण्याच्या घटना सातत्याने घडत आहेत.

मंदिर परिसरात सीसीटीव्ही यंत्रणा, सुरक्षा रक्षक आणि पोलीस बंदोबस्त उपलब्ध असतानाही चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने भाविकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

त्यामुळे मंदिर प्रशासन व पोलीस विभागाने या घटनांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर सुदर्शन वाघमारे, शुभम खोले, सोमनाथ मस्के, आकाश भालेकर, आदित्य बुरांडे, नागेश किवडे, राहुल भालेकर, चेतन पाटील आणि पांडुरंग माने यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचारप्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जून -**
तामलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील १५ वर्षे ९ महिने वयाच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याप्रकरणी एका तरुणासह एका महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पीडितेच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार, संबंधित तरुणाने अल्पवयीन मुलीला आपल्या घरी नेऊन मागील एक वर्षापासून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. तसेच एका महिलेने या कृत्यास मदत करून अत्याचारास कारणीभूत ठरल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी ३ जून २०२६ रोजी तामलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## बसस्थानकावरील गर्दीत महिलेची सोनसाखळी लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जून -**
कळंब बसस्थानकात बसमध्ये चढत असताना एका महिलेची सोन्याची साखळी चोरीला गेल्याची घटना घडली असून याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कमल नथुराम नाईकवाडे (वय ६९, रा. सावित्रीबाई फुलेनगर, धाराशिव) या २३ मे २०२६ रोजी दुपारी कळंब बसस्थानक येथे कळंब-धाराशिव बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या गळ्यातील १२ ग्रॅम वजनाची, सुमारे ११ हजार रुपये किमतीची सोन्याची साखळी चोरून नेली.

या प्रकरणी कमल नाईकवाडे यांनी ३ जून रोजी दिलेल्या फिर्यादीवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# खड्ड्यांत उभे राहून युवा शाहिराचा पोवाडा

## टाकळी-पाडोळी रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात अनोखे आंदोलन; प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जून -**
तालुक्यातील टाकळी ते पाडोळी हा रस्ता अत्यंत दयनीय अवस्थेत असून या मार्गावरील खड्डे, उखडलेले डांबरीकरण आणि पावसाळ्यातील बिकट परिस्थितीमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या प्रश्नाकडे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी टाकळी गावचे युवा शाहीर विठ्ठल शेंद्रे यांनी अनोख्या पद्धतीने आंदोलन केले.



हजारो खड्ड्यांनी भरलेल्या रस्त्यावर प्रत्यक्ष उभे राहून विठ्ठल शेंद्रे यांनी आपल्या बाल टीमसह पोवाडा सादर करत रस्त्याची व्यथा मांडली. शाहीरीच्या माध्यमातून त्यांनी ग्रामस्थांच्या भावना व्यक्त करत संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधींना तातडीने दखल घेण्याचे आवाहन केले.

पोवाड्यातून त्यांनी रस्त्याच्या दुरवस्थेमुळे होणारे अपघात, वाहनांचे नुकसान, विद्यार्थ्यांची गैरसोय तसेच शेतकऱ्यांच्या वाहतुकीच्या अडचणींवर प्रकाश टाकला. निवडणुकीत दिली जाणारी आश्वासने आणि त्यानंतर होणारे दुर्लक्ष यावरही त्यांनी भाष्य केले.

या उपक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रस्त्याच्या तातडीने दुरुस्तीची मागणी केली. अनेक वेळा निवेदने व पाठपुरावा करूनही कार्यवाही न झाल्याची खंत व्यक्त करत संबंधित रस्त्यासाठी निधी मंजूर करून काम हाती घ्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

युवा शाहिराच्या या अनोख्या आंदोलनाची परिसरात चर्चा रंगली असून आता प्रशासन आणि लोकप्रतिनिधी याबाबत काय भूमिका घेतात, याकडे टाकळी व पाडोळी परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## अखिल भारतीय शिवा संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी रवी मुळे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.४ जून -**
अखिल भारतीय शिवा संघटनेच्या तुळजापूर तालुका अध्यक्षपदी अणदूर येथील सामाजिक कार्यकर्ते रवी उर्फ गोटू मुळे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीचे विविध स्तरांतून स्वागत व अभिनंदन होत आहे.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे यांनी नुकतीच धाराशिव जिल्हा कार्यकारिणी जाहीर केली. यामध्ये जिल्हाध्यक्षपदी नळदुर्ग येथील माजी नगरसेवक संजय बताले यांची निवड करण्यात आली असून, त्यांच्या नेतृत्वाखाली रवी मुळे हे तुळजापूर तालुक्यात संघटनेचे कार्य पाहणार आहेत. निवड जाहीर झाल्यानंतर जिल्हाध्यक्ष संजय बताले व अन्य पदाधिकाऱ्यांनी अणदूर येथील निलकंठेश्वर मठाचे मठाधिपती श्री.ष.ब्र. शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष सत्येश्वर पाटील, तालुका उपाध्यक्ष प्रशांत बोधने, तंटामुक्ती अध्यक्ष कल्याणी काका मुळे, धनराज मुळे, सोमनाथ डांगे, माणिक मुळे, संतोष मुळे, श्रीशैल लंगडे, बाबुराव मुळे, अप्पासाहेब आलुरे, वीर नरे, सोमेश्वर आलुरे, विलास मुळे, गुरुनाथ मिटकरे, गणेश नरे, चंदू मुळे, विजू स्वामी, रितेश घुगरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# दाबका ग्रामपंचायतीचा अजब कारभार?; साडेतीन लाखांची घंटागाडी गायब?

## स्टिकर काढताच समोर आले दुसऱ्या ग्रामपंचायतीचे नाव... दाबका ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहारावरून खळबळ... ग्रामस्थांची चौकशीची मागणी...



### भ्रष्टाचाराचा बोभाटा होताच रातोरात गाडी अवतरली!

ग्रामस्थांनी घंटागाडीचा मुद्दा उचलून धरल्यानंतर आणि कथित घोटाळ्याची चर्चा सुरू झाल्यानंतर अचानक एक जुनी इलेक्ट्रिक घंटागाडी गावात आणण्यात आली. गाडीची रंगरंगोटी करून तिच्यावर ग्रामपंचायत कार्यालय दाबका, ता. उमरगा, जि. धाराशिव असे नवीन स्टिकर लावण्यात आले. मात्र या घाईघाईत केलेल्या व्यवस्थेनेच कथित प्रकाराचा भांडाफोड झाल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

### साडेतीन लाखांची घंटागाडी कुठे गेली?

दाबका ग्रामपंचायतीने ५ मे २०२५ रोजी ३,५४,८०५ रुपये खर्च करून घंटागाडी खरेदी केल्याची नोंद अधिकृत कागदपत्रांमध्ये आहे. मात्र गेल्या वर्षभरात ही गाडी गावात कोणीच पाहिली नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. उलट गावात कचरा संकलनासाठी अवघ्या दहा हजार रुपयांची सायकल गाडी वापरली जात असल्याचे दिसून आले. त्यामुळे घंटागाडी खरेदीच्या नावाखाली आर्थिक अपहार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ जून -**
उमरगा तालुक्यातील दाबका ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहार आणि विकासकामांतील अनियमिततेच्या आरोपांमुळे गावात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे ग्रामपंचायतीच्या नोंदीनुसार तब्बल ३ लाख ५४ हजार ८०५ रुपयांची घंटागाडी खरेदी करण्यात आल्याचे दाखवण्यात आले असताना, ती गाडी गावात कधीच दिसली नसल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामस्थांनी खर्चाचा हिशोब मागितल्यानंतर कथित गैरव्यवहार झाकण्यासाठी दुसऱ्या गावातील जुनी घंटागाडी आणून तिच्यावर दाबका ग्रामपंचायतीचे स्टिकर लावण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ग्राम पंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

२० मे २०२६ रोजी झालेल्या ग्रामसभेत ग्रामस्थांनी विकासकामे, निधी खर्च आणि आर्थिक व्यवहारांचा तपशील मागितला. मात्र सरपंच गोविंद सूर्यवंशी व ग्रामसेवक वैजनाथ बिंदगे यांनी समाधानकारक माहिती दिली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

त्यानंतरही माहिती देण्याचे आश्वासन देण्यात आले, मात्र प्रत्यक्षात माहिती उपलब्ध करून देण्यात आली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

दाबका ग्रामपंचायतीने ५ मे २०२५ रोजी घंटागाडी खरेदीसाठी ३.५४ लाख रुपये खर्च केल्याची नोंद अधिकृत कागदपत्रांमध्ये आहे. मात्र गावात कचरा संकलनासाठी आजही सायकल गाडीचा वापर होत असल्याने ग्रामस्थांनी घंटागाडीच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.



घंटागाडी प्रकरणाची चर्चा रंगत असतानाच अचानक एक जुनी इलेक्ट्रिक घंटागाडी गावात आणण्यात आली. तिची रंगरंगोटी करून त्यावर ग्रामपंचायत कार्यालय दाबका असे नवीन स्टिकर लावण्यात आले. मात्र ग्रामस्थांनी स्टिकर काढून पाहिले असता त्याखाली ग्रामपंचायत कार्यालय पिंपरी (का.), ता. जि. धाराशिव असे नाव दिसल्याचा दावा केला आहे. दाबका ग्रामपंचायतीने खरेदी केलेली मूळ घंटागाडी नेमकी कुठे आहे?, पिंपरीची गाडी दाबक्यात कशी आली? आणि ग्रामस्थांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाला का? असे सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

ग्रामस्थांनी जलजीवन मिशन, मनरेगा, बेरोजगार भत्ता, अनुसूचित जाती-जमातींसाठीचा निधी तसेच दलित वस्तीतील विकासकामांबाबतही अनियमिततेचे आरोप केले आहेत. अनेक भागांत १५ ते २० दिवस पाणीपुरवठा होत नसल्याचेही ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

गावातील तरुण व ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडे निवेदन देत संपूर्ण प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. दाबका ग्रामपंचायतीतील हे प्रकरण केवळ एका घंटागाडीपुरते मर्यादित नसून गावातील विविध विकासकामे आणि आर्थिक व्यवहारांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. आता प्रशासनाच्या चौकशीतून साडेतीन लाखांची मूळ घंटागाडी नेमकी कुठे आहे आणि पिंपरीची गाडी दाबक्यात कशी पोहोचली, याचे उत्तर समोर येणार का, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

पिंपरी ग्रामपंचायतीची असल्याचा दावा असलेली घंटागाडी गावात आल्यानंतर संतप्त तरुणांनी हालग्या वाजवत तिची उपहासात्मक मिरवणूक काढली. यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाची मोठी नाचक्की झाल्याची चर्चा गावात रंगली आहे.


# चला आता सायकलकडे वळूया

तभा वृत्तसेवा / प्रमोद सुरवसे

लातूर दि. ४ जून : जागतिक सायकल दिनानिमित तीन जून रोजी शहरात सामाजिक संदेश देत सायकल रॅली काढण्यात आली होती. इंधन टंचाईच्या काळात सायकल चालविणे हा एक उत्तम पर्याय असून सायकल चालविण्याचे अनेक फायदे सांगणारे बॅनर्स घेऊन सायकल चालवा, इंधन वाचवा, सायकल चालवा निलेगी रहा, सायकल चालवा निरोगी रहा, सायकल चालवा पर्यावरण वाचवा, सायकल चालक प्रदुषण टाळा, अशा आशयाचे बॅनर्स या रॅलीत दिसत होते.

सायकल चालविणे हा सगळ्यात सोपा व्यायाम असून याने हृदयाचे आरोग्य सुधारते, पायाचे स्त्राय बळकट होत असून शरीराला ऊर्जा मिळते वरील फायदे फक्त सायकल चालविल्याने होत असतात त्यामुळेच तर जपानमध्ये सायकल चालविण्यांची दुकाने मोठ्या दिमाखात सुरु असून तेथे किरायाने सुद्धा सायकली मिळत असतात, याउलट आपल्याकडे हाताच्या बोटवर मोजण्या इतकेच सायकल विक्री करणारी दुकान दिसून येत आहेत

आपल्या देशात सर्व दुचाकी , तीन चाकी, चारचाकी वाहन चालविण्यासाठी टॅक्स भरावा लागतो, यात सायकलचा सुद्धा नंबर आहे आपत्या देशात साधारणपणे१९५६ पासून सायकल चालविण्यासाठी परवाना लागत असल्याचा पुरावा हाती लागला आहे, साधारणपणे एक वर्ष परवाना ग्राह्य असायचा, त्यानंतर नवीन परवाना काढला जात आहे




आज तरुण वर्गाला सायकल चालविणे लज्जास्पद वाटत असल्यामुळेच तो सायकल चालविण्यास पसंती देत नसून विविध प्रकारच्या बाईक कडे आकर्षित होत असल्याचे चित्र आहे, बाईक जवळ असल्यामुळे ती वेगळीच क्रेझ निर्माण होते, बाईकवाले विविध स्क्रीम काढून, बाईक हप्त्यावर देण्याची, कर्जाची सोय करून वर्गाला आपल्याकडे आकर्षित करून घेतात हे वेगळे सांगायला नको आपल्याकडे एक म्हण अशी आहे की, कर्ज पाहणे घेऊन, म्हणजेच बँकेकडून कर्ज घेताना किती हेलपाटे खावे लागतात, कागदपत्रांची पूर्तता करता करता नाकीनऊ येतात, त्यामुळे मग बाईक घेणारे इच्छूकांना अगदी सहज बाईक साठी कर्ज मिळत असेल तर ते कशाला नाकारतील, म्हणूनच तर आज बाईकच्या विविध कंपन्या कार्यरत असून भरपूर कमाई करताना दिसतात.

बाईकच्या मानाने सायकलची किंमत कमी असली तरी तिच्या कडे कोणताही तरुणवर्ग आकर्षित होत नाही, यामागे अनेक कारणं आहेत, असू शकतात, तसा हा विषय संशोधनाचा होऊ शकतो जागतिक सायकल दिन असल्या कारणांनी तसेच हाती१९५६ चा सायकल परवाना हाती लागल्याने हा प्रपंच केला आहे

सर्व बाईक, तीनचाकी, चारचाकी इत्यादी वाहन चालवताना परवाना लागतोच तसा सायकल चालविण्यासाठी सुद्धा परवाना लागतोच,१९५६ मध्ये सायकल परवाना काढण्यासाठी तेव्हाचे फक्त२ रुपये लागत असत, त्यामुळे तेव्हाचे दोन रुपये तर आताचे किती ? विचार करण्याचा विषय आहे,

# जो ईश्वराला भजतो त्यांनाच ईश्वर भेटतो : जगद्गुरु डॉ. पंडिताराध्य



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ४ जून : महाकालेश्र्वर ज्योर्तिलिंग उज्जैन येथे अधिकमासनिमित्य श्रीगुरु हावगीस्वामी मठ संस्थान डोनगाव-रंडयाळ पडसावळी-उदगीर मठसंस्थानच्या वतीने मठाधिश डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्या सानिध्यात २१ मे ते ३१ मे २०२६ दरम्यान परमरहस्य ग्रंथ पारायण व अमृतेश्र्वर शिवाचार्य महाराज, जितुकर यांचे शिवकथा इष्टलिंग महापुजेने संपन्न झाली

प्रारंभी जगत्गुरुचे स्वागत श्रीगुरु हावगीस्वामी मठाचे मठाधिश डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांच्याहस्ते स्वागत करण्यात आले. . प्रास्ताविकात अमृतेश्र्वर महाराज जितुकर यांनी सप्ताहाभरातील संपन्न झालेले शिवानाम सप्ताह परमरहस्य ग्रंथ पारायण, शिवकथेची माहिती सांगुन श्रीगुरु हावगीस्वामी मठ संस्थानच्या वतीने डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराजांच्या कार्याची माहिती सांगीतली.

डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांनी ज्योर्तिलिंग महाकालेश्र्वर उज्जैन येथे २००० पेक्षा अधिक महिला शिवभक्तांच्या उपस्थितीत आयोजित कार्यक्रम जगत्गुरुंच्या अशिर्वादामुळेच व महाकालेश्र्वरांच्या अशिर्वादाने संपन्न झाले असुन पुढील वर्षीचे सप्ताह रामेश्र्वर येथे आयोजित करणार असल्याचे जाहीर करुन या कार्यक्रमाच्या सहकार्य केलेल्या सर्वस्तरातील मान्यवरांचे मठसंस्थानच्या वतीने आभार मानले. जगत्गुरुंच्या हस्ते माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांचा सत्कार करुन अशिर्वाद दिला. आपल्या अशिर्वचनात श्रीशल्य पीठाचे जगत्गुरु श्री श्री १००८ डॉ. चन्नसिध्दराम पंडिताराध्य शिवाचार्य यांनी आपल्या अशिर्वचनात म्हणाले की, जो ईश्र्वराला भजतो त्यांनाच ईश्र्वर भेटतो. सर्वच लोक ईश्र्वराची भक्ती करतात परंतु सर्वांना ईश्र्वर मिळतो तसे नाही परंतु भगवंताला जो मनातून भक्ती करतो व त्यामुळेच भगवंताला मनातील भक्तांला दर्शन देण्याची इच्छा होते त्यालाच दर्शन मिळते म्हणून महाकालेश्र्वराचा बुलावा आल्याशिवाय भक्त येवू शकत नाही. शंभुलिंग शिवाचार्य महाराजांच्या रुपातून प्रथमच उज्जैन ज्योर्तिलिंग महाकालेश्र्वरांचा बुलावा आल्यामुळेच प्रथमच उज्जैन नगरीत येवून महाकालेश्र्वराची भस्मआरती दर्शनाचा लाभ मिळाला. ज्याला मृत्युचे भय त्या मृत्युचा स्वीकार करण्याचे धैर्य महाकालेश्र्वराच्या दर्शनाने मिळते असे सांगुन शिवनामात मोठी शक्ती असुन शिवात जेवढी शक्ती आहे त्यापेक्षा अधिक शक्ती नामात आहे. ईश्र्वराचे दोन रुप असुन एक रुप व दुसरे नाम मुर्ती व नामाऐवढी शक्ती भक्तांच्या नाम शक्तीने दुप्पट होते. सर्व पापाचा नाश शी अक्षर करतो व ध्येहरुपी घराचा दरवजा बंद करतो.

महास्वामीजी यांनी आपल्या उपदेश करताना म्हणाले की, उज्जैन महाकालेश्र्वर नगरी ही सप्तमोक्ष नगरी असुन काल हा सर्वश्रेष्ठ आहे मानवाला मृत्यूच्या भयापासुन मुक्त करणारे ईश्र्वर शक्ती देणारे महाकालेश्र्वर होय एकुण ११ उत्तर दिशामध्ये दक्षिणमुख महाकालेश्र्वर हे एकमेव असुन दक्षिण म्हणजे यमराजाची दिशा दक्षिणेकडून आलेल्या दुष्यकर्माचे भय दूर करण्याची शक्ती महाकालेश्र्वरामध्ये आहे. असुन दक्षिणेकडुन उत्तरेकडे गेलेला मुळ पीठ पुन्हा धार्मिक स्वरुपात होणे आवश्यक आहे असे सांगीतले. कलयुगात भगवंताचे दर्शन होत नसले तरी गुरु हाच ईश्र्वर आहे. गुरुच्या रुपात अशिर्वाद घेतला पाहिजे. त्यासाठी सतत भजन नामसं किर्तन केले पाहिजे असे सांगुन डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज यांचे कार्य श्रेष्ठ असल्याचे सांगुन त्यांच्या सामाजिक, धार्मिक, आत्मिक कार्याचे कौतुक केले.

# ८१ जणांचे रक्तदान; रक्तदात्यांना हेल्मेट देऊन सुरक्षेचा दिला संदेश

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ४ जून : निलंगा पोलिस ठाणे आणि पोलीस मित्र संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात ८१ नागरिकांनी रक्तदान केले. या शिबिरात रक्तदात्यांना हेल्मेटचे वाटप करून वाहतूक सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यात आली.

लातूरचे पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांच्या सूचनेनुसार, उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल ढुमे आणि पोलिस निरीक्षक सुधीर सूर्यवंशी यांच्या नेतृत्वात हा उपक्रम पार पडला. यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक सदानंद वाघमारे, उपनिरीक्षक ज्ञानेश्र्वर साळुंके यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते. शिबिरात पोलिस पाटील, पोलीस मित्र, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष, होमगार्ड जवान आणि शहरातील युवकांनी सहभाग नोंदवला. या उपक्रमातून नागरिक आणि पोलिस प्रशासनातील संवाद वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला. शिबिराच्या नियोजनासाठी वाहतूक शाखेचे उपनिरीक्षक श्रीनिवास जगताप, गोपनीय शाखेचे दादा शिंदे, दयानंद वासुदेव, सायबर सेलचे नेताजी सूर्यवंशी आणि प्रकाश चव्हाण यांच्यासह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



दुचाकीस्वारांमध्ये वाहतूक नियमांबाबत केली जनजागृती....

निलंगा पोलिसांच्या वतीने आयोजित या रक्तदान शिबिराचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे, रक्तदान करणाऱ्या सर्व ८१ दात्यांना पोलीस प्रशासनाकडून हेल्मेटचे वाटप करण्यात आले. सहसा अशा शिबिरांमध्ये प्रमाणपत्र किंवा छोटी भेटवस्तू दिली जाते. मात्र, पोलिसांनी या आगळ्यावेगळ्या उपक्रमातून दुहेरी हेतू साधला. यामुळे गरजू रुग्णांसाठी रक्ताची गरज भागण्यासोबतच, दुचाकीस्वारांमध्ये वाहतूक नियमांचे पालन आणि सुरक्षिततेबाबत प्रबोधन करण्यास मोठी मदत झाली आहे.

# ट्रॅक्टरसाठी इंधन मिळेना

तभा वृत्तसेवा

लातूर : शेतकरी मान्सून पूर्व शेती मशागतीसाठी शेताकडे जाण्याऐवजी अगोदर पेट्रोल पंपावर जाऊन रांगा लावत आहे. शेतीसाठी ट्रॅक्टरवर मशागत करावी की नाही, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर पडला आहे. चापोली परिसरातील शेतकरी सध्या मान्सूनच्या प्रतीक्षेत आहे.

युद्ध पातळीवर शेतीची पूर्व मशागतीची कामे अहोरात्र मेहनत घेत सुरू आहेत. जो शेतकरी पूर्वी बैलाच्या जीवावर नांगरणी, वखरणी करायचा, त्या शेतकऱ्यांवर आता केवळ यांत्रिक पध्दतीमुळे ट्रॅक्टरला डिझेल मिळत नाही म्हणून पेट्रोल पंपावर तासंतास रांगा लावून उभे राहावे लागत आहे. सर्वत्र इंधनाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

# १७१ रक्तदात्यांना 'मोफत हेल्मेट'चे वाटप



तभा वृत्तसेवा

किनगाव दि. ४ जून : वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी आणि गरजू रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी किनगाव पोलीस ठाण्याच्या वतीने एक आगळावेगळा व अत्यंत स्तुत्य असा सामाजिक उपक्रम राबवण्यात आला. बुधवार, दि.0३ मे २०२६ रोजी किनगाव पोलीस स्टेशन येथे भव्य रक्तदान शिबिर आणि मोफत हेल्मेट वाटप कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या शिबिराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये सहभागी होऊन रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास रोटरी क्लब लातूरच्या वतीने मोफत हेल्मेटचे वाटप करण्यात आले. 'एक हेल्मेट, एक जीवन' हा सुरक्षेचा महत्त्वपूर्ण संदेश या नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून समाजापर्यंत यशस्वीपणे पोहोचवण्यात आला.

हा भव्य उपक्रम लातूरचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे आणि अहमदपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत नेटकेपणाने पार पडला. महाराष्ट्र पोलीस व लातूर पोलीस यांच्या वतीने आयोजित या शिबिरासाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटी (जिल्हा शाखा लातूर) संचलित डॉ. भालचंद्र ब्लड सेंटर, लातूर आणि रोटरी क्लब लातूर (मिडटाऊन जिल्हा ३१३२) यांनी संयुक्त विद्यमाने पुढाकार घेऊन मोलाचे सहकार्य केले. दुचाकी चालवताना हेल्मेटचा वापर करणे म्हणजेच सुरक्षित प्रवास करणे होय, हा संदेश देत रक्ताचा तुटवडा भरून काढणे हाच या शिबिराचा मुख्य उद्देश असल्याचे किनगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके, पोलीस उपनिरीक्षक सत्यजित तोंडारे यांनी याप्रसंगी स्पष्ट केले.

या शिबिरादरम्यान अहमदपूर चे उपविभागीय पोलीस अधीकारी अरविंद रायबोले यांनी स्वतः रक्तदान शिबिरास सदिच्छा भेट दिली व पोलिसांच्या या सामाजिक उपक्रमाचे आणि रक्तदात्यांचे भरभरून कौतुक केले.

या सामाजिक कार्यात पोलीस प्रशासनासह स्थानिक नागरिकांनीही मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संपूर्ण शिबिरात एकूण १७१ रक्तदात्यांनी आपले रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली आणि त्यांना सुरक्षिततेचे कवच म्हणून रोटरी क्लब लातूरच्या वतीने हेल्मेट प्रदान करण्यात आले

# रा.प. महामंडळाचा ७८ वा वर्धापन उत्साहात साजरा

## दिनानिमित्त कार्यक्रम, चालक- वाहकांमध्ये उत्साह; स्वागतासाठी रांगोळी, हातात गुलाब देऊन प्रवाशांचे स्वागत

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ४ जून : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा (एसटी) ७८ वा वर्धापन दिन निलंगा बसस्थानकात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने बस स्थानक परिसरात आकर्षक रांगोळी आणि फुलांची सजावट करण्यात आली होती. यावेळी प्रवासी, चालक-वाहक आणि कर्मचाऱ्यांना गुलाबपुष्प व पेढे देऊन वर्धापन दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

खासगी प्रवासी वाहतुकीचे अनेक पर्याय अत्याधुनिक युगात




उपलब्ध झाले असले, तरी आजही एसटी हीच ग्रामीण भागाची खऱ्या अर्थाने 'जीवनवाहिनी' आहे. ग्रामीण जनतेचे आणि एसटीचे नाते आजही अतूट असल्याचे मत विभागीय वाहतूक अधिकारी बळभीम पाटील यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला निलंगा आगारप्रमुख पांडुरंग पाटील यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रवाशांनी एसटीच्या वेळेवर धावणाऱ्या सेवेचे कौतुक केले. विद्यार्थी, शेतकरी आणि कामगारांसाठी एसटी मोठा आधार असल्याची भावना प्रवाशांनी व्यक्त केली. कार्यक्रमात महामंडळाच्या विविध योजनांची आणि सुरक्षित प्रवासाची माहिती देण्यात आली. याप्रसंगी संतोष बिडवे, रेश्मा जगवाडे, सुभाष शिंदे, राजेंद्र बिरादार, प्रमोद जिवणे, पांडुरंग काकनाके, पांडुरंग शिंदेकर आदी कर्मचारी व प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. एसटीची सेवाभावाची परंपरा पुढे नेण्याचा निर्धार कर्मचाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

बस खेड्यापाड्याचा अविभाज्य भाग....

सध्याच्या अत्याधुनिक काळात प्रवासाचे अनेक वेगवान पर्याय उपलब्ध झाले आहेत. मात्र, तरीही ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांची एसटीवरच सर्वाधिक मदार आहे. खेड्यापाड्यातील जनजीवन सुरळीत ठेवण्याचे सर्वात मोठे काम एसटी करत असून, ती ग्रामीण जनतेच्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनली आहे, असा सुर या कार्यक्रमात व्यक्त झाला. एसटीची सेवा आजही सर्वाधिक विश्र्वासार्ह आणि किफायतशीर मानली जाते.

प्रवाशांकडून कौतुकाची थाप, सेवेची गौरवशाली परंपरा जपण्याचा निर्धार.....

एसटीच्या वर्धापन दिनानिमित्त केवळ औपचारिकता न पाळता प्रवाशांशी सुसंवाद साधण्यात आला. सुरक्षित प्रवासाबाबत मार्गदर्शन आणि एसटीच्या नवीन योजनांची माहिती प्रवाशांना देण्यात आली. विद्यार्थी, शेतकरी आणि कामगारांना मिळणाऱ्या आधाराबद्दल प्रवाशांनी महामंडळाचे आभार मानले. तर, 'प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीदवाक्य सार्थ ठरवत सेवाभावाची गौरवशाली परंपरा यापुढेही अशीच अखंडित ठेवण्याचा दृढ निर्धार एसटी कर्मचाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

# उद्धव ठाकरे यांच्या दीर्घआयुष्यासाठी महाप्रसाद वाटप



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ४ जून : शिवसेना पक्षप्रमुख महाराष्ट्राचे लोकप्रिय माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे याना दीर्घायुष्य लाभो यासाठी 0३ जून रोजी येथील श्री गणेशाच्या चरणी प्रार्थना करण्यात आली.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव साहेब याना दीर्घायुष्य लाभावे यासाठी १५ वर्षापासून महिन्याच्या प्रत्येक चतुर्थीला लातूर जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख अजित (बालाजी ) रेड्डी यांच्या वतीने अहमदपूर च्या अष्टविनायक गणेश मंदिरात अभिषेक करून महाप्रसाद वाटप करण्यात येतो.

माजी मुख्यमंत्री व शिवसेना प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राची विकासात उत्तरोत्तर प्रगती होत राहो यासाठी आजच्या दिवशी महापूजा व आरती करण्यात आली.

लातूर जिल्ह्याचे शिवसेना जिल्हा प्रमुख व बाजार समितीचे माजी संचालक तथा माजी उपनगराध्यक्ष अजित उर्फ बालाजी रेड्डी व त्यांच्या सुविद्य पत्नी माजी नगरसेविका सौ कल्पना रेड्डी यांच्या हस्ते उपस्थित सर्व भक्तांना महाप्रसाद ,फळ वाटप करण्यात आले.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाच्या उदगीर तालुकाध्यक्षपदी शंकर मोरे यांची निवड!



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. ४ जून : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे साहेब व युवक प्रदेशाध्यक्ष आदरणीय महेबूब भाई शेख यांच्या मान्यतेने, तसेच राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विभागीय अध्यक्ष निशांतजी वाघमारे (पूर्व) आणि प्रशांतजी घार (पश्र्िचम) यांच्या प्रमुख उपस्थितीत पक्षाच्या महत्त्वाच्या संघटनात्मक निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. यामध्ये उदगीर तालुकाध्यक्ष पदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी मोरे यांच्याकडे सोपवण्यात आली असून, त्यांची उदगीर तालुकाध्यक्ष पदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे.

लातूर जिल्हा ग्रामीण राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा औसा नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष भरत प्रभाकर सूर्यवंशी यांनी शंकर मोरे यांना नुकतेच अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान केले.

# सायली भगत 'जेईई डव्हान्स्ड' परीक्षेत ऑल इंडिया रँकिंगमध्ये



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. ४ जून : जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर आकाशाला गवसणी घालता येते, हे अहमदपूरच्या कन्येने पुन्हा एकदा देशपातळीवर सिद्ध करून दाखवले आहे. अभियंता श्र्याम संग्राम भगत यांची कन्या सायली हिने अत्यंत खडतर आणि प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'जेईई डव्हान्स्ड' (गएए -वींरपलशव) परीक्षेत ६२५0 ऑल इंडिया रँक (-खठ) मिळवून घवघवीत यश संपादन केले. सायलीने मिळवलेल्या यशामुळे अहमदपूरचा नावलौकिक देशपातळीवर वाढला असून तिचे कौतुक केले जात आहे.

सायलीने यापूर्वी 'जेईई मेन्स' परीक्षेतही ९९.३१ टक्के (झशीलशपींळश्रश) गुण मिळवले. तिचे प्राथमिक शिक्षण अहमदपूर येथील किलबिल नॅशनल स्कूलमध्ये तर माध्यमिक शिक्षण यशवंत विद्यालयात . उच्च शिक्षणाची स्वप्ने उराशी बाळगून सायलीने हैदराबाद येथील नामांकित 'नारायणा इन्स्टिट्यूट, माधापूर' येथे अकरावी आणि बारावीचे शिक्षण घेतले. या यशाबद्दल तिची आजी लक्ष्मीबाई भगत, आई सुनिता भगत, आजोबा प्रा. गोविंद भगत, बाबुराव भगत, तसेच दलितमित्र डी. बी. लोहारे, पत्रकार गोविंद काळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले .

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विधान परिषद निवडणुकीसाठी विविध विभागांच्या नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जून -**
उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या विधान परिषद द्विवार्षिक निवडणूक-२०२६ च्या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी विविध विभागांसाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांच्याकडे आदर्श आचारसंहिता, तर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे यांच्याकडे निवडणूक निरीक्षकांचे संपर्क अधिकारी म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांच्याकडे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, कायदा व सुव्यवस्था आणि वाहन व्यवस्थापनाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

याशिवाय मतमोजणी, मतदान कर्मचारी व्यवस्थापन, प्रशिक्षण, निवडणूक साहित्य वितरण, स्ट्राँगरूम, मतपत्रिका छपाई, अवैध दारू प्रतिबंध, माध्यम संनियंत्रण तसेच विविध परवानग्यांसाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार सर्व प्रक्रिया वेळेत व प्रभावीपणे पार पाडण्यासाठी या नियुक्त्या करण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली.



# विधान परिषद रणसंग्राम रंगणार! सात उमेदवारांची माघार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जून -**
धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीचे चित्र आता स्पष्ट झाले असून महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील आणि महाविकास आघाडीचे उमेदवार महेश देशमुख यांच्यात थेट सामना रंगणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी सात अपक्ष उमेदवारांनी माघार घेतल्याने निवडणुकीतील समीकरणे स्पष्ट झाली आहेत.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे गुरुवारी (दि. ४ जून) अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर महालिंगे मिलिंद गणपती (चाकूर), अर्चना विनोद गंगणे (तुळजापूर), शरद रामभाऊ यादव (माजलगाव), अहम दखान सय्यद नूर राज सय्यद (माजलगाव), संजय पांडुरंगजी मुंदडा (कळंब), सचिन भारतराव पवार (धाराशिव) आणि सहालबिन आमेर चाऊस (माजलगाव) यांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले.

यामुळे आता निवडणूक थेट महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात होणार आहे. या मतदारसंघात धाराशिव, लातूर आणि बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य मतदानाचा हक्क बजावणार असल्याने ही निवडणूक राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

महायुतीकडून भाजपचे ३४८, शिवसेना (शिंदे गट) चे ८८ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे १९९ सदस्य आपल्या बाजूने असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांची बाजू भक्कम मानली जात आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीकडून शिवसेना (ठाकरे गट) चे ४०, काँग्रेसचे १५४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे ४४ सदस्य पाठिंबा देत असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच अपक्ष सदस्य आणि स्थानिक राजकीय समीकरणांवरही महाविकास आघाडीने भर दिला आहे.

संख्याबळाच्या गणितात महायुतीचे पारडे जड दिसत असले तरी महाविकास आघाडीने ही निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. दोन्ही बाजूंकडून मतदारांशी संपर्क आणि राजकीय हालचालींना वेग आला असून मतदानापर्यंत वातावरण आणखी तापण्याची चिन्हे आहेत.

विशेष म्हणजे, तब्बल ३२ वर्षांनंतर धाराशिव जिल्ह्याला विधान परिषदेत प्रतिनिधित्व मिळण्याची संधी निर्माण झाल्याने या निवडणुकीकडे धाराशिव, लातूर आणि बीड जिल्ह्यातील राजकीय वर्तुळाचे विशेष लक्ष लागले आहे. आता मतदानाच्या दिवशी कोणाची रणनीती यशस्वी ठरते आणि विधान परिषदेवर कोणाची वर्णी लागते, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

## ज्ञानसागर समुपदेशन केंद्रात विद्यार्थी मार्गदर्शन शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.४ जून -**
येथील ज्ञानसागर समुपदेशन केंद्र व वसतिगृहाच्या वतीने विद्यार्थी मार्गदर्शन शिबिर तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. संतोष नरे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ.एम.बी. बिराजदार यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत स्पर्धा परीक्षा, करिअर नियोजन आणि यशस्वी होण्यासाठी आवश्यक गुणांविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून सातत्यपूर्ण परिश्रमाच्या बळावर यश संपादन करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मुंबई पोलीस दलात निवड झालेल्या लक्ष्मण जाधव यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच ज्ञानसागरची विद्यार्थिनी भाग्यश्री मनमंथ बिराजदार हिने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत यश मिळवून प्रवेशासाठी पात्रता प्राप्त केल्याबद्दल तिचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमास राजकुमार गाढवे, भागवत नाईकवाडी, तसेच संस्थेचे संचालक नागनाथ मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्राचे संचालक युवराज करपे यांनी केले. सूत्रसंचालन दृष्टी कोर, नम्रता जमादार यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विवेक करपे, नम्रता घोडके, आसिफ अत्तार आणि सिद्धेश्वर वरदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दुधनाळ शिवमय! : पंडित प्रदीप मिश्रा यांच्या शिवमहापुराण कथेची भक्तिमय सांगता



### सात दिवसांत १५ लाख भाविकांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ जून -**
उमरगा तालुक्यातील दुधनाळ येथे गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या भव्य शिवमहापुराण कथेची रविवारी भक्तिमय वातावरणात सांगता झाली. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवमहापुराण कथाकार पंडित प्रदीप मिश्रा यांच्या ओजस्वी वाणीतून झालेल्या या कथेमुळे लाखो भाविक भक्तिरसात तल्लीन झाले. महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश, गुजरात आणि मध्यप्रदेश येथून आलेल्या भाविकांनी या धार्मिक सोहळ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

समारोपाच्या प्रवचनात पंडित प्रदीप मिश्रा यांनी महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा गौरव करत छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा उल्लेख केला. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताबाई, संत नामदेव आणि संत जनाबाई यांच्या कार्याचा संदर्भ देत त्यांनी भक्ती, सेवा, नैतिकता आणि सदाचाराचा संदेश दिला. शिवनामाच्या जपातून मनःशांती आणि सकारात्मक ऊर्जा मिळते, असे सांगत प्रत्येक जीवामध्ये शिवाचे रूप पाहण्याचे आवाहन त्यांनी केले. गेल्या सात दिवसांत दुधनाळ परिसरात शिवनामाचा अखंड गजर सुरू होता. शिवभजन, शिवजागर, कीर्तन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामूहिक प्रार्थनांमुळे संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. आयोजकांच्या माहितीनुसार, जवळपास २० हजार परराज्यातील भाविक सात दिवस कथास्थळी मुक्कामी होते. भाविकांसाठी सकाळ-सायंकाळ महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.

संपूर्ण कथाकाळात सुमारे १५ लाख भाविकांनी उपस्थिती लावल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. विशेषतः शेवटच्या दोन दिवसांत भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली.



समारोपाच्या दिवशी कथास्थळी मानवी समुद्र उसळल्याचे चित्र पाहायला मिळाले. 'हर हर महादेव'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. लाखो भाविकांच्या उपस्थितीचा विचार करून सुमारे ७० एकर क्षेत्रात भव्य नियोजन करण्यात आले होते. तीन विशाल वॉटरप्रूफ मंडप, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहे, वैद्यकीय केंद्रे, पार्किंग, हरवले-सापडले केंद्र आणि निवासाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे एवढ्या मोठ्या गर्दीतही कार्यक्रम शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. या धार्मिक सोहळ्यामुळे दुधनाळ आणि परिसरातील बाजारपेठांना मोठी संजीवनी मिळाली. हॉटेल व्यावसायिक, फळविक्रेते, चहाचे स्टॉल, वाहनधारक आणि विविध लघु व्यावसायिकांच्या व्यवसायात मोठी वाढ झाल्याचे दिसून आले. पोलीस उपविभागीय अधिकारी सदाशिव शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी यांनी चोख बंदोबस्त ठेवला. १६ पोलीस अधिकारी, ९८ कर्मचारी आणि दंगल नियंत्रण पथक आठ दिवस कार्यरत होते. वाहतूक, सुरक्षा आणि गर्दी व्यवस्थापन यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे सुमारे ४०० स्वयंसेवकांचे योगदान महत्त्वाचे ठरले. पिण्याचे पाणी, वैद्यकीय मदत, स्वच्छता, वाहतूक आणि मार्गदर्शनासाठी स्वयंसेवक सातत्याने सेवेत होते. समारोपाच्या दिवशी धाराशिव-बीड-लातूर विधान परिषद निवडणुकीतील भाजपचे उमेदवार बसवराज पाटील तसेच महाविकास आघाडीचे उमेदवार महेश देशमुख यांनी कथास्थळी उपस्थित राहून पंडित प्रदीप मिश्रा यांच्या प्रवचनाचा लाभ घेतला.

अवघ्या सातशे लोकवस्ती असलेल्या दुधनाळ गावाने सात दिवस लाखो भाविकांचे स्वागत करत व्यवस्थापनाचा आदर्श निर्माण केला. भक्ती, सेवा, शिस्त आणि समर्पणाचा संगम असलेल्या या शिवमहापुराण कथेमुळे दुधनाळला अक्षरशः पंढरपूर वारीचे स्वरूप प्राप्त झाले. लाखो शिवभक्तांच्या उपस्थितीने हा सोहळा दुधनाळच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला जाणारा ठरला.

## खेड शिवारातून स्प्रिंकलर साहित्याची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जून -**
तालुक्यातील खेड येथील शेतातून स्प्रिंकलर संचाचे साहित्य व बांबू चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

वैभव श्रीहरी गवाड (वय ४९, रा. खेड) यांच्या गट क्रमांक ३९५ मधील शेतातून ६० बांबू, स्प्रिंकलरचे सहा नोजल व पाईप असा एकूण १८ हजार रुपयांचा माल २९ मेच्या रात्री ते ३० मेच्या सकाळी दरम्यान अज्ञात व्यक्तीने चोरून नेला. याबाबत ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ढोकी परिसरातील वीजपुरवठा सुरळीत करा; ३३ केव्ही सब-स्टेशनची क्षमता वाढविण्याची मागणी

### रुपामाता फाऊंडेशनचे महावितरणला निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जून -**
धाराशिव तालुक्यातील ढोकी व परिसरातील गावांमध्ये वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा तातडीने सुरळीत करावा, ढोकी येथील ३३ केव्ही सब-स्टेशनची क्षमता वाढवावी तसेच परिसरातील सौरऊर्जा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावा, अशी मागणी रुपामाता फाऊंडेशनचे सचिव अँड. अजित गुंड पाटील यांनी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, ढोकी येथे महावितरणची दोन ३३ केव्ही सब-स्टेशन्स असून त्यावर अनेक गावांचा वीजभार अवलंबून आहे. मात्र, दिवसभरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक, शेतकरी, व्यापारी आणि लघुउद्योजकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.



वीज खंडितीमुळे शेतीपंप, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, उद्योगधंदे तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामांवर परिणाम होत असून नागरिकांचे आर्थिक नुकसानही होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. ढोकी परिसरातील सौरऊर्जा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यास वीजपुरवठा अधिक सक्षम व स्थिर होण्यास मदत होणार असल्याने संबंधित प्रकल्प तातडीने सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

तसेच पावसाळ्यापूर्वी वीज वितरण व्यवस्था सक्षम करण्यासाठी उपलब्ध होणाऱ्या विशेष निधीतून सब-स्टेशन, वीजवाहिन्या, रोहित्रे, झाडांच्या फांद्यांची छाटणी आणि इतर देखभाल-दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत, जेणेकरून पावसाळ्यातील वीज खंडितीचे प्रकार कमी होतील, असे अँड. अजित गुंड पाटील यांनी म्हटले आहे. ढोकी व परिसरातील नागरिकांना अखंडित, सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने सकारात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी रुपामाता फाऊंडेशनतर्फे करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य, अधीक्षक अभियंता महावितरण धाराशिव आणि कार्यकारी अभियंता महावितरण धाराशिव यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# तुळजाभवानी मंदिरातील 'बोगस पुजाऱ्यां'वर कारवाईची मागणी

### शेकडो पुजाऱ्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ जून -**
श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात पुजारी असल्याचे भासवून भाविकांची फसवणूक करणाऱ्या अनाधिकृत पुजारी (एजंट) यांच्यावर तात्काळ कारवाई करून त्यांना मंदिर प्रवेशबंदी करावी, अशी मागणी अधिकृत पुजारी बांधवांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांना तहसीलदार तथा मंदिर व्यवस्थापक माया माने यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले.



निवेदनात मंदिर परिसरात अनाधिकृत पुजाऱ्यांचा सुळसुळाट वाढल्याचा आरोप करण्यात आला आहे. हे एजंट धोतर-पंचा परिधान करून भाविकांचे पूजाविधी करत असून स्वतःला अधिकृत पुजारी म्हणून भासवत भाविकांची दिशाभूल व आर्थिक फसवणूक करत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे अधिकृत व हक्कदार पुजाऱ्यांची बदनामी होत असल्याची खंतही व्यक्त करण्यात आली आहे.

तसेच काही अनाधिकृत व्यक्तींकडे बनावट ओळखपत्रे असून त्यांना देवीच्या गर्भगृहातही प्रवेश मिळत असल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. यामुळे मंदिराच्या सुरक्षेलाही धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पुजारी बांधवांनी म्हटले आहे.

मंदिरात कार्यरत सर्व पुजारी व सेवेदार यांना बायोमेट्रिक ओळखपत्रे तातडीने देण्यात यावीत, तोपर्यंत विद्यमान ओळखपत्रे सक्तीची करण्यात यावीत तसेच मंदिर संस्थानच्या जबाबदार अधिकाऱ्यांची समिती स्थापन करून ओळखपत्रांची नियमित व कडक तपासणी करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर शेकडो पुजारी बांधवांच्या स्वाक्षऱ्या असून मंदिर प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

## घरबसल्या हयातीचे प्रमाणपत्र सादर करण्याचे तहसीलदारांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ जून -**
संजय गांधी निराधार, श्रावणबाळ सेवा निवृत्तीवेतन तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनांच्या लाभार्थ्यांनी हयातीचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी तहसील कार्यालयात येण्याची गरज नसल्याचे तहसीलदार गोविंद येरमे यांनी सांगितले आहे.

लाभार्थी स्वतःच्या किंवा नातेवाईकांच्या अँड्रॉइड मोबाईलमधील बेनिफिशियरी पच्या माध्यमातून घरबसल्या ऑनलाइन हयातीचे प्रमाणपत्र सादर करू शकतात. तसेच ग्राम महसूल अधिकारी, सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र आणि नागरी सेवा केंद्र यांच्या माध्यमातूनही ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. विहित कालावधीत ऑनलाइन हयातीचे प्रमाणपत्र सादर न केल्यास योजनांचा लाभ बंद होऊ शकतो. त्यामुळे सर्व पात्र लाभार्थ्यांनी वेळेत ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन तहसीलदार येरमे यांनी केले आहे.

# विकास की विनाश? : पर्यावरणीय समतोलाची आजची गरज

जागतिक पर्यावरण दिन विशेष...

विकास हा शब्द ऐकताच डोळ्यांसमोर उभे राहतात ते उंच इमारती, रुंद रस्ते, वेगवान तंत्रज्ञान आणि आधुनिक जीवनशैली. परंपरेने आपण विकासाचा अर्थ प्रगती, उन्नती आणि समृद्धी असा घेत आलो आहोत. मात्र आज जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने स्वतःला एक प्रश्न विचारण्याची गरज आहे-हा विकास नेमका कोणासाठी आणि कोणाच्या किंमतीवर होत आहे?

आज जंगलांच्या जागी काँक्रीटची जंगले उभी राहत आहेत. नद्या प्रदूषणाने गुदमरू लागल्या आहेत, डोंगरांचे अस्तित्व धोक्यात आले आहे आणि ऋतूचक्र विस्कळीत होत चालले आहे. त्यामुळे विकासाचा अर्थ खऱ्या अर्थाने प्रगती आहे की अधोगती, याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. निसर्गाच्या विनाशावर उभारलेली समृद्धी ही शाश्वत विकासाची ओळख ठरू शकत नाही.



मानव आणि निसर्ग यांचे नाते अतूट आहे. हवा, पाणी, अन्न आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा निसर्गच पूर्ण करतो. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास म्हणजे मानवी अस्तित्वालाच निर्माण झालेला धोका होय. पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन ही आजच्या काळातील सर्वांत महत्त्वाची सामाजिक जबाबदारी बनली आहे.

पर्यावरण ऱ्हासामागील प्रमुख कारण म्हणजे मानवी हस्तक्षेप. विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर जंगलतोड केली जात आहे. रस्ते, धरणे, उद्योग, खाणकाम, गृहनिर्माण प्रकल्प, शैक्षणिक संस्था तसेच विविध सार्वजनिक कार्यक्रमांसाठी मोठ्या प्रमाणात वृक्षांची कत्तल केली जाते. नाशिक येथील कुंभमेळ्यासाठी पायाभूत सुविधांच्या विस्तारादरम्यान झालेली वृक्षतोड किंवा तेलंगणातील कांचा गाचीबावली परिसरातील आयटी हबसाठी करण्यात आलेली जंगलतोड ही याची ठळक उदाहरणे आहेत. या घटनांनी विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखण्याची गरज अधोरेखित केली.

अतिरिक्त जंगलतोडीमुळे जैवविविधतेचा ऱ्हास, पावसाच्या पद्धतीत बदल, मृदाक्षरण आणि भूस्खलनासारख्या समस्या निर्माण होतात.

शहरीकरणामुळे नैसर्गिक जलस्रोत, शेती आणि मोकळ्या जागा नष्ट होत आहेत. परिणामी पूर, उष्णतेत वाढ, भूजल पातळीतील घट आणि जलसंकट यांसारख्या समस्या अधिक तीव्र होत आहेत.

औद्योगिकीकरण हे देखील पर्यावरण ऱ्हासाचे एक मोठे कारण आहे. कारखान्यांमधून निघणारे धूर, रासायनिक सांडपाणी आणि विषारी वायू यामुळे वायू, जल आणि मृदा प्रदूषण वाढत आहे. त्याचा थेट परिणाम मानवी आरोग्यावर होत आहे. खाणकाम, रासायनिक शेती, नदीपात्रातील वाळू उपसा, प्लास्टिकचा वाढता वापर आणि वन्यजीवांच्या अधिवासांवर होणारे अतिक्रमण यामुळे पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले आहे.

निसर्गावर विजय मिळवल्याचा मानवी अहंकार आजच्या पर्यावरणीय संकटामागील मूळ कारण आहे. विकासाच्या नावाखाली आपण निसर्गाची जी लूट केली, त्याची किंमत आज पूर, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा, भूस्खलन आणि जैवविविधतेच्या ऱ्हासाच्या रूपाने मोजावी लागत आहे.

प्रश्न विकासाचा किंवा श्रद्धेचा नाही; प्रश्न पर्यावरणीय समतोलाचा आहे.

एका झाडाला वाढण्यासाठी अनेक वर्षे लागतात, मात्र ते तोडण्यासाठी काही मिनिटे पुरेशी असतात. आधुनिक विकास आवश्यक आहे, परंतु त्यासाठी पर्यावरणाचा बळी देणे योग्य ठरणार नाही.

विकासाची प्रत्येक योजना किती झाडे तोडली? यापेक्षा किती झाडे वाचवली? या निकषावर मोजली जाणे गरजेचे आहे.

पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने वैयक्तिक स्तरावर योगदान देणे आवश्यक आहे. दरवर्षी किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, पाणी व वीज यांची बचत करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे आणि सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणे यांसारखे छोटे उपायही मोठा बदल घडवू शकतात.



**उज्ज्वला शिंदे**
धाराशिव, मो.नं. ९५५२१९५१४६

पर्यावरण संवर्धनामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सवयी रुजवल्यास भविष्यात पर्यावरण संरक्षणाची व्यापक चळवळ उभी राहू शकते. यासाठी शाश्वत विकासाची संकल्पना समाजापर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. विकास करताना पर्यावरणाचे नुकसान टाळणे, हाच शाश्वत विकासाचा खरा अर्थ आहे.

पर्यावरणाचे रक्षण करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाचे नैतिक आणि सामाजिक कर्तव्य आहे. आज आपण निसर्गाचे संरक्षण केले, तरच उद्याच्या पिढ्यांना सुरक्षित, समृद्ध आणि निरोगी भविष्य देऊ शकू.

झाडे ही केवळ पृथ्वीची शोभा नसून मानवाच्या अस्तित्वाची शाश्वत हमी आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षण हा पर्याय नसून आपल्या अस्तित्वाचा पाया आहे.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातूर जिल्ह्यातील ४१४ ग्रामपंचयतींच्या सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जून : राज्य निवडणूक आयोगाच्या २६ मे, २०२६ च्या आदेशन्वये सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नवनिर्मित ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम घोषित केला आहे. यामध्ये लातूर जिल्ह्यातील लातूर, रेणापूर, चाकूर, अहमदपूर, जळकोट, उदगीर, देवणी, शिरुर अनंतपाळ, निलंगा, औसा या तालुक्यातील एकूण ४१४ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

या आरक्षण सोडत कार्यक्रमानुसार सोमवार, ८ जून, २०२६ रोजी विशेष ग्रामसभेची सूचना देण्यात येईल. शुकवार, १२ जून, २०२६ रोजी विशेष ग्रामसभा बोलावून, तहसीलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली, आरक्षणाची सोडत काढण्यात येईल. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला आरक्षण निश्र्चित होईल. बुधवार, १७ जून ,२०२६ रोजी प्रभागनिहाय आरक्षण प्रारुप अधिसूचनेला जिल्हाधिकारी यांनी मान्यता देतील. शुक्रवार, १९ जून, २०२६ रोजी प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द केले जाईल. दि. १९ ते २५ जून, २०२६ या कालावधीत प्रभागनिहाय आरक्षण निश्र्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करता येईल.

शुकवार, ३ जुलै, २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी यांनी प्राप्त हरकती विचारात घेवून अभिप्राय देणे, बुधवार, ८ जुलै, २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेवून अंतिम अधिसूचनेस (नमुना अ) जिल्हाधिकारी यांनी मान्यता देण्याची कार्यवाही केली जाईल. १० जुलै, २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ) व्यापक प्रसिध्दी देण्यात येईल, असे लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सायली ठाकूर यांनी कळविले आहे.



# विविध वृत्त...

# ... म्हणून पालकांचा लोंढा खाजगी शिकवणी वर्गांकडे वळतोय !

## बहुसंख्य कनिष्ठ महाविद्यालयात नीट - जेईई चे अद्यावत शिक्षणच मिळत नाही

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४जून : लातूरच्या अर्थकारणाशी लक्षणीय संबंध असणाऱ्या खाजगी शिकवणी वर्गावर सध्या शिवराज मोटेगावकर नीट पेपरफुटी प्रकरणाचे सावट आहे. एका शिकवणी चालकाच्या चुकीमुळे संपूर्ण शिकवणी वर्गांनाच दोषी धरणे योग्य नसल्याच्या प्रतिक्रिया पालकांतून व्यक्त होत आहेत. बहुसंख्य कनिष्ठ महाविद्यालयात नीट - जेईई तथा तत्सम प्रवेश परीक्षांची तयारीच करून घेतली जात नाही. त्यामुळे शिक्षणाच्या जीवघेण्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी विद्यार्थी खाजगी शिकवणी वर्गाकडे वळत असल्याचे पालकवर्गातून बोलले जात आहे.

**श्रीधर स्वामी**

लातूरचे खाजगी शिकवणी वर्ग मोठ्या प्रमाणात चालविण्यात येणाऱ्या परिसराला आता ट्युशन एरिया म्हणून ओळखले जात आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून विद्यार्थी येथे येतात. लातूरच्या मातीत गुणवत्ता परिपूर्ण भरलेली असल्याने त्याचा लाभ प्रत्यक्ष - अप्रत्यक्षरीत्या विद्यार्थ्यांना मिळताना पाहायला मिळतो. मध्यंतरी नीट पेपर फुटी प्रकरणामुळे लातूरकडे, लातूरच्या खाजगी शिकवणी वर्गाकडे पाहण्याचा विद्यार्थी - पालकांचा दृष्टीकोन बऱ्यापैकी बदलला असल्याचे दिसून येते. नाही म्हटले तरी लातूरच्या एकूण अर्थकारणाच्या किमान २५ टक्के हिस्सा ट्युशन एरियावर अवलंबून आहे,असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही. पैशाच्या अतिलालसेपोटी रेणुकाई केमिस्ट्री क्लासेसचा संचालक शिवराज मोटेगावकर याच्याकडून नीटचा पेपर फोडण्यापर्यंत मजल गेली. शेवटी प्रत्येकाला त्याच्या चांगल्या - वाईट कृत्याची शिक्षा मिळणारच आहे. सीबीआय या प्रकरणातील एकाही दोषीला सोडणार नाही, याबद्दल कोणाच्याही मनात शंका नाही.

लातूरमध्ये अनेक नामांकित कनिष्ठ महाविद्यालये आहेत. त्यापैकी अगदी मोजकी कनिष्ठ महाविद्यालये वगळता बहुसंख्य महाविद्यालयात नीट - जेईई साठीचा अभ्यासक्रम शिकवलाच जात नाही. अनेक महाविद्यालयांकडे त्यासाठी आवश्यक असणारा शिक्षकवर्गच उपलब्ध नाही. अनेक संस्था चालकांनी आपल्या नातेवाइकांनाच सेवेच्या संधी दिलेल्या असल्याने त्या ठिकाणी गुणवत्ता आणि शिक्षण याचा अर्थाअर्थी संबंध नाही. अशा महाविद्यालयांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्याची अपेक्षा तरी कशी करणार ? अशावेळी पालक आपल्या पाल्याला स्पर्धेत टिकण्यासाठीचे आवश्यक शिक्षण मिळविण्यासाठी खाजगी शिकवणी वर्गांकडे वळण्याशिवाय अन्य पर्यायच नाही. याच कारणामुळे लातूरच्या शिकवणी वर्गांबाबत एवढे वादळ उठलेले असतानाही पालक खाजगी शिकवणी वर्गाकडे आकृष्ट होताना दिसत आहेत. शिक्षणाच्या निमित्ताने लातुरात हजारो विद्यार्थी - विद्यार्थिनी वास्तव्यास येतात. परिणामतः त्यांच्यामुळे वसतिगृह, भोजनालय, हॉटेल या व्यवसायातही मोठी उलाढाल होते.

या सर्व बाबींचा लातूरच्या अर्थकारणाशी अतिशय निकटचा संबंध येताना आढळून येतो. लातूरच्या अर्थव्यवस्थेला गती देण्याचे काम खाजगी शिकवणी वर्गाच्या माध्यमातून होत आले आहे, ही बाब आता कोणीही नाकारणार नाही.

कनिष्ठ महाविद्यालयात हवा तो विषय तेवढ्याच गांभीर्याने शिकविण्यात येत नसल्यानेच पालक आणि विद्यार्थ्यांना खाजगी शिकवणी वर्गांकडे वळावे लागत असल्याच्या प्रतिक्रिया अनेक पालकांकडून ऐकायला मिळाल्या. विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी सामाजिक - शासकीय पातळीवरूनही यादृष्टीने सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न व्हावेत. खाजगी शिकवणी वर्ग चालकांकडे गुणवत्तेने परिपूर्ण असे शिक्षकवर्ग उपलब्ध असल्यामुळेच लातूरचे विद्यार्थी अशा परीक्षांमध्ये अधिक प्रमाणात यशस्वी होताना दिसत असल्याचेही अनेक पालकांनी बोलून दाखवले. केवळ एकाच्या चुकीची शिक्षा लातूरच्या संपूर्ण ट्युशन एरियाला भोगावी लागू नये,असेही बोलले जात आहे

## श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जून : शहरातील मजगे नगर परिसरामध्ये अधिक मासाच्या निमित्ताने ४ जून ते १० जून २०२६ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

यामध्ये पहाटे ५ ते ६ काकडा आरती, सकाळी ११ ते १२ विष्णूसहस्त्रनाम्, दुपारी १२ ते ०२ भजनी मंडळाचा कार्यक्रम व दुपारी ०२ ते ०५ या वेळेत ह.भ.प.मंगलताई लोमटे कळंबकर यांचा श्रीमद् भागवत कथा व हरिपाठाचा कार्यक्रम होणार आहे. तसेच अहमदनगर येथील संगित गायक सतीश खवके, शांत सायझर वादक दिनेश काळे सोनपेठकर, तबला वादक कन्हेया काळे लातूरकर यांची साथ राहणार आहे. तसेच १० जून २०२६ रोजी सकाळी १० ते ०१ पर्यंत श्रीमद् भागवत कथेचे वाचन व कथा सांगतेनंतर दुपारी ०१ ते आपल्या आगमनापर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

त्यामुळे या कार्यक्रमाला मजगे नगर परिसरातील भावी-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन कव्हेकर परिवाराच्यावतीने करण्यात आलेले आहे.

## 'चन्नबसवेश्वर फार्मसी'मध्ये पाच दिवसीय विकास कार्यक्रम यशस्वी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जून : येथील चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालय (पदवी) येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष तसेच लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, हासेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील शिक्षकांच्या अध्यापन कौशल्यांचा विकास करण्याच्या उद्देशाने 'फार्मसी शिक्षणातील स्मार्ट अध्यापनपद्धतीः अध्यापन, अध्ययन व संशोधनातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव' या विषयावर पाच दिवसीय ऑनलाइन संकाय विकास कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमासाठी शैक्षणिक संस्थांमधील तज्ज्ञ संसाधन व्यक्ती म्हणून प्रा. डॉ. सतीश पोलशेट्टीवार, डॉ. अन्वर शेख, डॉ. प्रशांत अरागडे यांचे महत्वपूर्ण नामांकित

विषयावर मार्गदर्शन लाभले. सुरुवात प्राचार्य डॉ. अविनाश टेकाडे यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. तद्नंतर डॉ. अनंत देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील एकूण १५९ प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. उद्घाटन प्रसंगी सहयोगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन लोणीकर, नॅक समन्वयक डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, सहयोगी आयक्यूएसी समन्वयक डॉ. गणेश बनसोडे, कार्यक्रम समन्वयक प्रा. अविनाश मठपती यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचा आढावा डॉ. ओमप्रकाश भुसनुरे यांनी सादर केला. सूत्रसंचालन प्रा. विजयानंदा खडकूतकर यांनी केले.

### टि. सी. हरवली आहे

सचिन विठ्ठल मेटे या नावाची १२ वी पासची श्री सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय रुई रामेश्वर ता.जि. लातूर या कॉलेजची लातूर - रुई रामेश्वर प्रवासा दरम्यान हरवली असून कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क करा

मोबा.८३२९४२९२२४ या क्रमांकावर संपर्क करावा, योग्य ते बक्षीस दिले जाईल

## तरुणाची आत्महत्या

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जून : चापोली (ता. चाकूर) येथील योगेश उमाकांत सावरगावे (वय ३४) याने रविवारी दुपारी शेतातील झाडास गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपनिरीक्षक गिरीश चामले यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समोर आले नसून पोलिसांकडून अधिक तपास केला जात आहे.

## रेणापूर पोलीस ठाण्यात आज रक्तदान शिबीर



तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ४ जून : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आज दि. ५ रेणापूर पोलीस स्टेशन येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.

या रक्तदान शिबिरात रेणापूर शहरासह परिसरातील नागरिकांनी सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन रेणापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी आहे. रक्ताच्या कमतरतेमुळे अनेक रुग्णांना अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत रक्तदात्यांनी केलेले रक्तदान अनेकांचे प्राण वाचविण्यास उपयुक्त ठरते. याच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून रेणापूर पोलीस ठाण्यात या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या वतीने एक हेल्मेट मोफत देण्यात येणार आहे.

# मनपा अतिक्रमण विभाच्या कारवाईत ११६ जणांची दुकानदारी बंद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जून : महापालिकेच्या अतिक्रमण विभागात प्रमुख पदाची सूत्रे हाती घेतल्यापासून गोपी साठे यांनी गुलाब पुष्प हातात घेऊन अतिक्रमण करणाऱ्या दुकानदारांना तंबी देण्यास सुरुवात केली आहे. पहिल्या भेटीत गुलाब पुष्प देऊन अतिक्रमण केलेल्यांना काढून घेण्याची विनंती ते करीत आहेत. बुधवारी (दि.३) शहराच्या गंजगोलाईतील मुख्य इमारतीतील ११६ दुकानदारांनी रस्त्यावर मांडलेली दुकानदारी बंद करण्यास त्यांना भाग पाडले. त्याचप्रमाणे आतल्या बाजूनेही थाटलेली दुकाने काढून घेण्यास सांगण्यात आले. त्यांच्या आवाहनास सर्व व्यापाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

शहरात वाढलेल्या अतिक्रमणांमुळे संपूर्ण फूटपाथ गायब झाले आहेत. त्यामुळे नागरिकांना भर रस्त्यातून चालावे लागते.



परिणामी दररोज लहान-मोठे अपघात होत आहेत. या वाहतूक कोंडीला नागरिक व वाहनधारक वैतागले आहेत. महापालिकेने अतिक्रमणधारकांचा कायमचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

यामुळे महापालिकेने गोपी साठे यांच्याकडे अतिक्रमण विभागप्रमुखपदाची जबाबदारी सोपविली आहे. मागील दहा दिवसांपासून ते शहराच्या प्रमुख रस्त्यांवर फिरून अतिक्रमणधारकांना त्यांची फूटपाथावरील अतिक्रमणे हटवून घेण्यासाठी व्यापाऱ्यांना गुलाब पुष्प देऊन त्याचे स्वागत करीत आहेत.

बुधवारी साठे यांच्यासह अतिक्रमण विभागातील आठजणांच्या पथकाने गंजगोलाईच्या मुख्य इमारतीत असलेल्या ११७ दुकानदारांच्या भेटी घेतल्या. प्रत्येकानेच बाहेरच्या बाजूला १५ व आतील मंदिराकडच्या बाजूने १५ असे एकूण सुमारे ३० फुटांची जागा अतिक्रमणाने व्यापून टाकली होती. यामुळे गंजगोलाईत प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. याला सामान्य माणूस वैतागला आहे.

साठे यांनी प्रत्येक दुकानदाराला गुलाबपुष्प भेट देऊन दोन्ही बाजूंनी मांडलेली दुकानदारी उचलण्याचे आवाहन केले. त्यानुसार सर्वच व्यापाऱ्यांनी पोर्चमध्ये व आतील बाजूला केलेले अतिक्रमण स्वतःहून काढून घेतल्याने गोलाईने मोकळा श्र्वास घेतल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे आतील बाजूला मंदिराभोवती बसणाऱ्या बांगडी व्यापाऱ्यांनाही आपली दुकाने रस्त्यावर न मांडता आत सरकविण्याचे आवाहन साठे यांनी केल्याने त्यांनीही दुकाने मागे घेतली. यामुळे गोलाईच्या आतील बाजूचा रस्ता मोकळा झाल्याचे दिसून आले.

# स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस ठाण्यांच्या पथकांनी केला ३ लाख १२ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जून : जिल्ह्यात अवैध दारू निर्मिती, हातभट्टी व्यवसाय आणि बेकायदेशीर मद्यविक्री पूर्णपणे हद्दपार करण्याच्या उद्देशाने व्यापक विशेष मोहीम राबवली जात आहे. त्यानुसार मंगळवारी (दि. २) एकाच वेळी राबविण्यात आलेल्या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखा तसेच विविध पोलीस ठाण्याच्या पथकांनी अवैध दारू व्यवसायिकांविरोधात मोठी कारवाई करून एकाच दिवसात ८ स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशान्वये व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या मोहिमेदरम्यानच्या कारवाईत




हातभट्टी दारू, देशी दारू तसेच गावठी दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे गुळमिश्रित रसायन, कच्चा माल आणि उत्पादन साहित्य मोठ्या प्रमाणावर जप्त करण्यात आले. जप्त केलेले हजारो लिटर रसायन व दारू निर्मितीचे साहित्य नष्ट करण्यात आले असून अनेक आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. या मोहिमेतील सर्वात मोठी कारवाई रेणापूर पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेच्या संयुक्त पथकाने वसंतनगर तांडा परिसरात केली. जिल्हाभरातील विविध कारवायांमध्ये एकूण ८ गुन्हे दाखल करण्यात आले असून अंदाजे ३ लाख १२ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक विशेष मोहीम

# लातूर विभागाने पटकावले ५ पारितोषिके

## हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ४ जून : हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान लातूर विभागाने एकुण ५ पारितोषिके पटकावली आहेत. संपूर्ण राज्यभरात लातूर विभागाने हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानात उत्तम काम करुन लातूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.



राज्य परिवहन महामंडळात प्रवाशांना स्वच्छ, सुंदर बसस्थानके उपलब्ध व्हावीत या हेतुने सन २०२५ पासून राज्य परिवहन महामंडळातील सर्व बसस्थानकांवर हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान राज्यभर राबविण्यात आले. दि. २३ मार्च २०२६ ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत चौथे सर्वेक्षण पूर्ण झाले असून त्याचा निकाल दि. २९ मे रोजी प्रसिद्ध झाला आहे.

या अभियानात औसा बसस्थानक : 'अ' वर्ग बसस्थानकामध्ये छत्रपती संभाजीनगर प्रदेशात पहिला, १० लाख रुपये बक्षीस, प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह. मुरुड बसस्थानक : 'अ' वर्ग बसस्थानकामध्ये छत्रपती संभाजीनगर प्रदेशात दुसरा, ५ लाख रुपये बक्षीस, प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह. लातूर रेणापूर नाका बसस्थानक क्रमांक-३ 'ब' वर्ग बसस्थानकामध्ये छत्रपती संभाजीनगर प्रदेशात दुसरा, २.५ लाख रुपये बक्षीस, प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह. लामजना बसस्थानक 'क' वर्ग बसस्थानकामध्ये छत्रपती संभाजीनगर प्रदेशात दुसरा, ५० हजार रुपये बक्षीस, प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह. शिरुरअनंतपाळ 'क' वर्ग बसस्थानकात छत्रपती संभाजीनगर प्रदेशात तिसरा, २५ हजार रुपये बक्षीस, प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह. लातूर विभागातील सर्व पुरस्कार प्राप्त बसस्थानकांचे आगार व्यवस्थापक बाळासाहेब राठोड लातूर आगार, शंकर स्वामी औसा आगार, अनिल बिडवे निलंगा आगार यांचे दि. ३ जून रोजी लातूर विभागाचे नियंत्रक विलास राठोड यांनी अभिनंदन केले व पुरस्क ार मिळवून लातूर विभागाचे राज्यात नावलौकीक केल्याबद्दल विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी व सर्व प्रवाशांचे अभिनंदन केले.

या प्रसंगी विभागीय वाहतूक अधिकारी संदीप पडवळ, प्रविण राठोड, विभागीय अभियंता स्थापत्य जगदीश कोकाटे, विभागीय लेखाधिकारी अमित गंडाळे व विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## बांधावरील अतिक्रमण हटवून रस्ता खुला करण्यासाठी शेतकऱ्याचा आत्मदहनाचा प्रयत्न

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. ४ जून : शेतात जाण्यासाठी बांधावरील अतिक्रमण काढून रस्ता खुला करण्यात यावा, या मागणीसाठी एका शेतकऱ्याने थेट तहसीलदारांच्या दालनात अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी घडली. या घटनेमुळे तहसील कार्यालयात एकच खळबळ गंभीर दखल घेत तहसीलने संबंधित उडाली. घटनेची नंबर बांधावरील अतिक्रमण हटवून शेतात जाण्यासाठी रस्ता खुला करण्याचे आदेश दिले.



यशवंतवाडी (ता. रेणापूर) येथील गट क्रमांक २५२/३ व २५२/४ मधील शेतांपर्यंत जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी नारायण सूर्यवंशी व इतर शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून करत होते. २०१४ पासून तहसील कार्यालयास निवेदने देऊनही प्रश्र्न मार्गी लागत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली होती. संबंधित नंबर बांधावर अनेक ठिकाणी अतिक्रमणे झाल्याने तसेच काही भागात काटेरी झुडुपे वाढल्याने शेतात जाणे कठीण झाले होते. ट्रॅक्टर, बैलगाडी घेऊन जाणे अशक्य झाले होते.

दरम्यान, प्रश्न निकाली निघत नसल्याने नारायण सूर्यवंशी यांच्या पत्नी मीरा नारायण सूर्यवंशी यांनी २५ मे रोजी रेणापूर तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण केले. त्यानंतर तहसीलदार प्रशांत थोरात यांनी २६ मे रोजी लेखी पत्र देत २८ मे रोजी भूमी अभिलेख व मंडळ अधिकाऱ्यांद्वारे

संबंधित गटाच्या हद्दी व खुणा कायम करण्यात येतील, तसेच २९ मे रोजी अंतिम सुनावणी घेऊन नियमानुसार निर्णय घेण्यात येईल, असे आश्र्वासन दिले होते. या लेखी आश्र्वासनानंतर उपोषण मागे घेतले. २८ मे रोजी अधिकाऱ्यांनी हद्दी व खुणा निश्र्चित केल्या. रस्त्यावरील अतिक्रमण हटविले नाही. शेतात जाण्याचा प्रश्र्न कायम राहिल्याने नारायण सूर्यवंशी यांनी संतप्त होत मंगळवारी तहसीलदारांच्या दालनात अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या हस्तक्षेपाने अनर्थ टाळला. घटनेनंतर तहसीलने तातडीने अतिक्रमण हटवून रस्ता उपलब्ध करण्याचे आदेश दिले.